
१५ एप्रिल १९६६
चाळीस पैसे

# माणूस



# दारू म्हणजे -
# घरादाराचा नाश!
# शरीराची नासाडी!!




मनुष्यबळ व साधनसंपत्तीचा काटेकोर वापर
हीच देशाची आज महान गरज!

संचालक प्रसिद्धी विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई




वर्ष पाचवे : अंक बाविसावा : १५ एप्रिल १९६६
किंमत चाळीस पैसे : वार्षिक वर्गणी दहा रुपये
संपादक : श्री. ग. माजगावकर
पत्ता : ४१९ नारायण, पुणे २. : दूरध्वनी : ५७३५९.

## अवतरण !

**संपादक 'माणूस' यांस—**

मी तुमच्या पाक्षिकाचा नियमित वाचक आहे. मला तुमचं हे पाक्षिक मनापासून आवडतं—अगदी मनापासून !

पण एक गोष्ट फारच खटकते. 'लतिका-हमीद विवाह' आणि भलं मोठं प्रश्नचिन्ह टाकून स्वातंत्र्यवीर सावरकरांची काही वाक्ये उद्धृत करून आपण आपलं (गेल्या अंकाचं) मुखपृष्ठ "सजवलं" आहे.

संपादक आपला जवळचा मित्र समजावा असं म्हणतात. या नात्याने लिहितो—

आपल्यासारख्या स्टँडर्ड म्हणविणाऱ्या मासिकानं (पाक्षिकानं !) इतका प्रतिगामीपणा दाखवावा हे आपल्याला शोभत नाही. **—कुमार केतकर, मुंबई.**

[स्वा. सावरकरांचे गेल्या अंकाच्या मुखपृष्ठावरील अवतरण वाचून लतिका—हमीद विवाहाचा पुरस्कार करणारी, त्यांचा सत्कार घडवून आणणारी काही मंडळी हे 'मार्मिक' अवतरण योग्य वेळी दिल्याबद्दल 'माणूस'ला धन्यवाद देऊन गेली. या मंडळींना अवतरणात 'पुरोगामित्व' दिसले, तर कुमार केतकर यांना ते 'प्रतिगामीपणा'चे वाटत आहे. गंमत आहे ! दृष्टीतील फरक असा असतो. वास्तविक अवतरण सरळ आहे. त्यात आहेत फक्त 'सारासारविवेकाचे' चार खडे बोल.

या वेळी मात्र घोटाळा नाही. चित्रकार सालकर यांनी केवळ एका आकृतीने मुखपृष्ठ सजवले आहे. आक्षेप घेण्यासारखे यात काही सापडेल असे वाटत नाही. **—सं.**]

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन.
अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' पाक्षिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही.
ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

# दे श-वि दे श

## □ स्टालिनचे पुनरुज्जीवन

रिंगमास्तरच्या चाबकाच्या फटकाऱ्यावर सर्कशीतील जनावरांनी फेर धरावा, त्याप्रमाणे जागतिक कम्युनिस्ट चळवळीतून चीन फुटून निघेपर्यंत सारे कम्युनिस्ट पक्ष सोविएट रशियाच्या तालावर नाचत असत. आजही बहुतेक देशांच्या कम्युनिस्ट पक्षाची ठळक धोरणे आणि ध्येये सोविएट कम्युनिस्ट पक्षाच्या इशाऱ्यावर बदलतात किंवा ठरविली जातात. त्यामुळे सोविएट कम्युनिस्ट पक्षाचे अधिवेशन ही कम्युनिस्ट जगतातील एक महत्त्वाची घटना समजली जाते. या अधिवेशनातील निर्णयाचा आणि चर्चेचा जागतिक कम्युनिस्ट चळवळीवर फार मोठा प्रभाव असतो. नियमां-प्रमाणे हे अधिवेशन दर चार वर्षांनी व्हावयास हवे, हे जरी खरे असले तरी ते नियमितपणे भरतेच असे नाही. स्टालिन त्याला वाटे तेव्हा आठ आठ वर्षांनंतरही हे अधिवेशन तो भरवीत असे. सध्या मॉस्कोला चालू असलेले सोविएट रशियन पार्टीचे २३ वे अधिवेशन पाच वर्षांनंतर भरत आहे.

सध्या चालू असलेल्या अधिवेशनात काय घडते आहे, त्यापेक्षा काय घडत नाही आणि काय टाळले जात आहे, यालाच राजकीय निरीक्षक महत्त्व देत आहेत. स्टालिन जेव्हा जिवंत होता तेव्हा त्याचीच छाया साऱ्या अधिवेशनावर पडलेली असे. इतर सभासद प्रतिनिधी आणि पाहुणे स्टालिनच्या नजरेच्या जरबेत काही तरी थातुर-मातुर बोलत आणि स्टालिन एकच रामटोला हाणल्याप्रमाणे आपला एखादा जाडजूड प्रबंध वाची आणि तो सर्वांना शिरसावंद्य मानावा लागे.

क्रुश्चेव्ह सत्तेवर आल्यानंतर मात्र त्याने ही प्रथा बदलली. इतकेच नव्हे तर, तो सत्तेवर असतानाची १९५६ आणि १९६१ मधील दोन्ही अधिवेशने त्यातील चैतन्य-मय चर्चेने आणि धोरणातील नाटचमय बदलामुळे चांगलीच गाजली. १९५६ सालच्या विसाव्या अधिवेशनात एक गुप्त बैठक घेऊन गेली २५ वर्षे कम्युनिस्ट चळवळीवर अनिर्बंध सत्ता गाजविणाऱ्या स्टालिनवर क्रुश्चेव्हने हल्ला चढवून साऱ्या जगाला चकित करून टाकले. स्टालिनच्या दडपशाहीची, त्याच्या क्रूरपणाची भडक वर्णने केली आणि त्याने केलेल्या राजकीय आणि आर्थिक चुका रंगवून स्टालिनला कम्युनिस्ट चळवळीच्या इतिहासातून संपूर्ण नामशेष करण्याचा चंग त्याने बांधला. ही स्टालिनच्या नामशेषीकरणाची क्रिया क्रुश्चेवने सोविएट कम्युनिस्ट पक्षाच्या १९६१ सालच्या अधिवेशनात पूर्ण केली आणि त्या मुद्यावर चीनच्या चिथावणीने भांडायला उठलेल्या अल्बानियाच्या पूर्व युरोपियन कम्युनिस्ट पक्षाला अधिवेशनातून

बादही करून टाकले व कम्युनिस्ट चळवळीत फूट पाडण्यास कारणीभूत होण्याचे श्रेय ओढवून घेतले.

या पार्श्वभूमीवर क्रुश्चेव्हच्या पदच्युतीनंतर प्रथमच आणि चिनी-रशियन संबंध अत्यंत वाईट स्थितील असताना २३ वे अधिवेशन भरत होते. परंतु नाट्यमय प्रसंगांना, धोरणातील बदलांना वेळ अनुकूल असूनही रशियातील नवे नेतृत्व अद्याप स्थिर व्हावयाचे असल्याने तशी अपेक्षा करणे चुकीचेच झाले असते आणि तसेच झालेही. आतापर्यंत पाऊणहून अधिक पार पडलेल्या या अधिवेशनात विशेष क्रांति-कारक असे काहीच घडले नाही. ज्यावर मोठी चर्चा होणे व वादविवाद होऊन निर्णय घेणे आवश्यक आहेत, असे कितीतरी विषय सध्या जागतिक व रशियाच्या अंतर्गत परिस्थितीत आहेत. परंतु त्यांची उघड चर्चा करून निर्णय घेण्यास ही योग्य वेळ नाही, असे रशियन नेत्यांना वाटत असावे.

कम्युनिस्ट रशियाच्या इतिहासकारांचे काम मोठेच विचित्र आणि कठीण असले पाहिजे, यांत शंका नाही. ज्यांनी कम्युनिस्ट चळवळीवर आणि रशियन आर्थिक व राजकीय व्यवस्थेवर आपला कायमचा ठसा उमटवून ठेवलेला आहे, अशा स्टालिन आणि क्रुश्चेव्हचा नामोल्लेखही न करता इतिहास लिहिणे ही काही सोपी बाब नाही. पण हाही विक्रम सोविएट कम्युनिस्ट पक्षाचे फर्स्ट सेक्रेटरी लिओनिड ब्रेझनेव यांनी या अधिवेशनाला आपला अहवाल सादर करताना करून दाखविला. विशेषत: १९६१ पासून प्रगत झालेल्या रशियन अर्थव्यवस्थेचा आढावा घेताना तर त्यांनी एकदाही क्रुश्चेव्हचा उल्लेख केला नाही.

ही अडचण लक्षात घेऊनच स्टालिनचे पुनरुज्जीवन करण्याचे प्रयत्न रशियात चालू असल्याच्या बातम्या आहेत. अधिवेशनामध्ये जरी ही बाब चर्चेला आली नाही आणि पुढेही येण्याचे चिन्ह दिसत नसले तरी अधिवेशन सुरू होण्याआधी काही काळ स्टालिनचे पुनरुज्जीवन करण्याचे जवळजवळ निश्चित झाले होते, अशा वेग-वेगळ्या ठिकाणच्या खात्रीलायक बातम्या होत्या. इतकेच नव्हे तर, स्टालिनचे बरेचसे वाङ्मय विक्रीसाठी अगदी जय्यत तयार करण्यात आले होते. परंतु पूर्व युरोपातील कम्युनिस्ट देशांच्या दबावामुळे हा विषय तूर्त तरी तहकूब ठेवावा, असे ठरले. स्टालिनचे पुनरुज्जीवन करण्याने बरेचसे प्रश्न सुटण्याऐवजी अधिक गुंतागुंतीचे होतील, असा इशारा रशियन नेत्यांना देण्यात आला होता, आणि या मताला खुद्द रशियन बुद्धिवाद्यांचा पाठिंबा असल्याने या अधिवेशनापुरता तरी हा विषय तहकूब करण्यात आला असावा. फर्स्ट सेक्रेटरी लिओनिड ब्रेझनेव यांनी मांडलेल्या दोन सूचना मात्र स्वीकारण्यात आल्या. स्टालिनच्या मृत्यूनंतर जनरल सेक्रेटरी ही जागाच काढून टाकून फर्स्ट सेक्रेटरीची जागा हीच पक्षातील सर्वोच्च जागा करण्यात आली आणि 'पॉलिट ब्यूरो'चे मध्यवर्ती शक्तिशाली संस्थेचे नाव बदलून 'प्रेसि-

( पान ७० वर पाहा )

## एकात्म भारताचे नवे विभाजन !

# भारतातील राष्ट्रीय उद्याने

मो. ग. तपस्वी

[ दिल्ली ]

लेखाच्या मथळचावरून वाचक बुचकळचात पडू नयेत म्हणून प्रथमच सांगून टाकतो की या लेखाचा विषय वनस्पतिशास्त्र किंवा बागाईतशास्त्र नाही. या देशात राज्यकर्त्यांच्या मुलखावेगळचा धोरणामुळं भारताच्या कमरेभोवती केन्द्र-शासित प्रदेशांची जी सोनसाखळी बांधण्यात आली आहे आणि ती गाठवताना ज्या राष्ट्रीय उद्यान मनोवृत्तीचा प्रकर्षाने आविष्कार झाला आहे, तिचा परामर्ष ग्ग लेखात घेण्याचे मी योजले आहे.

दर वर्षी जवळजवळ एक अब्ज रुपयांचा खर्च सोसून सरकारने दहा छोटचा छोटचा इलाख्यांना स्वतंत्र राज्यव्यवस्था देण्याचा खटाटोप चालवला आहे, असे विधान ऐकायला कसे वाटेल ? विशेषत: आज देशाला पै-पैची गरज असताना, त्यासाठी लोकांवर वाढत्या प्रमाणावर कर बसवले जात असताना, अशा प्रकारे एक अब्ज रुपयांची नासाडी करण्याची ही चैन देशाला परवडणारी आहे का ? मग राष्ट्रपुरुषाच्या चेहऱ्यावर तारुण्यपिटिकापेक्षाही लहान असे हे उठावदार ठिपके जोपासून त्यांना प्रशासकीय मोहाचे बोट चाटवून नसती अधिकारलालसा त्यांच्या मनात अंकुरू देऊन आपण काय साधीत आहोत ?

हे असे प्रदेश निर्माण करण्यामागे सरकारची भूमिका अशी असल्याचे सांगण्यात येत असते, की यांपैकी प्रत्येक प्रदेशाची स्वत:ची अशी वेगळी अस्मिता आहे, त्यांना आपले असे खास एक वेगळे व्यक्तिमत्त्व आहे आणि अशा नाना व्यक्तित्वाच्या ढंगदार प्रदेशाचे जशाच्या तशा स्वरूपात जतन करणे अगत्याचे आहे. त्यामुळे राष्ट्रीय उद्यानात राष्ट्रात उपलब्ध असलेली सर्व फळेमुळे, वेलीवनस्पती जोपासाव्यात, तसे या नवोदित राष्ट्रानेही या प्रदेशाचे वेगळचाने जतन केले पाहिजे. याच भावनेने या दहा राष्ट्रीय उद्यानांचा आजवर जन्म झाला आहे. आणखी अशीच उद्याने जन्माला येणार नाहीतच अशी शाश्वती देता येण्याजोगी परिस्थिती अजूनही दिसत नाही.

या दहा प्रदेशांना केन्द्रशासित प्रदेश म्हटले जाते. अंदमान–निकोबार बेटे, लखदीव-मिनिकॉय-अमीनदीवी बेटे, दिल्ली, हिमाचल प्रदेश, मणिपूर, त्रिपुरा,

दादरा-नगरहवेली, गोवा–दीव–दमण, पाँडिचेरी आणि नेफा हे ते दहा प्रदेश. यापैकी लखदीव बेटांचे क्षेत्रफळ सर्वांत कमी म्हणजे फक्त ११ चौरस मैल आहे. या सर्व प्रदेशांचे मिळून क्षेत्रफळ ६० हजार चौरस मैलांपेक्षा किंचित जास्त भरते आणि त्यात ७४ लाख लोक राहतात. याचाच अर्थ असा झाला की, या केन्द्रशासित प्रदेशातील लोकांवर केन्द्र सरकार दरडोई १३५ रु. हून जास्त खर्च करते. भारतातल्या इतर कोणत्याही राज्यात सरकारी खर्चाचे दरडोई प्रमाण एवढे नाही. प्रश्न आहे सरकार हा सोस कशाकरिता करीत आहे ?

## दहा प्रदेशांच्या दहा तऱ्हा

या दहा प्रदेशांत फक्त नेफा हाच केवळ एक प्रादेशिक घटक मानला जातो आणि केन्द्र सरकारच्या वतीने आसामचा राज्यपाल त्याचा कारभार पाहतो. बाकी नऊ प्रदेशांपैकी चांगल्या पाच प्रदेशांत रीतसर विधानसभा स्थापन करण्यात आलेल्या आहेत आणि त्यांना तीन ते पाच मंत्र्यांची मंत्रिमंडळेही आहेत. हिमाचल प्रदेश विधानसभा ४३ सभासदांची आहे. मणिपूर ३२ सभासदांची आहे आणि त्रिपुरा, गोवा व पाँडिचेरी प्रत्येकी ३० च्या आहेत. शिवाय या दहांपैकी प्रत्येक प्रदेशातून लोकसभेवर निदान एक व जास्तीत जास्त पाच सभासद निवडणुकीने घेण्यात येतात. दिल्लीचे ५, हिमाचलचे ४, मणिपूर, त्रिपुरा व गोवा यांचे प्रत्येकी २ आणि उरलेल्यांचे प्रत्येकी एक असे २० खासदार या प्रदेशांना लाभले आहेत.

संसदीय कामकाजखात्याच्या अधिकृत माहितीनुसार दिल्लीत प्रत्येक खासदारावर त्याच्या पगारासकट किमान सरासरी दरमहा १००० रुपये खर्च सरकारला येतो. शिवाय या मंडळींना देण्यात येणाऱ्या बंगला, प्रवास, वगैरे सुखसोयी वेगळ्या. विधानसभेतील आमदारांप्रीत्यर्थ सरकारला कराव्या लागणाऱ्या अशाच खर्चाची मासिक सरासरी दरडोई ५०० रु. येते. म्हणजे या दहा प्रदेशांच्या खासदारांवर सरकार वर्षाकाठी अडीच लाख रुपये आणि आमदारांवर जवळजवळ १० लाख रुपये खर्च करते. यात मंत्रिमंडळाचा पगार अर्थातच धरलेला नाही.

या प्रदेशांची अस्मिता भारतीय अस्मितेपेक्षा वेगळी कशी, हा प्रश्न प्रत्येक राष्ट्रवादी वाचकाच्या मनात येथे येईल. याची जाणीव मलाही आहे; परंतु त्या मुद्याकडे वळण्यापूर्वी या प्रदेशांची भौगोलिक कुतरओढ कशी झाली आहे आणि तिच्याकडे सरकारचे कसे मुळीच लक्ष नाही, ते आधी पाहू.

जुन्या पेप्सू राज्यातून बनवलेला हा हिमाचल प्रदेश एकसंध नाही. पाकिस्तानप्रमाणे त्याचा एक भाग एकीकडे व दुसरा दुसरीकडे आहे. उत्तर प्रदेशाच्या वायव्य सीमेलगतच्या भागात त्याची राजधानी सिमला वसलेली आहे. त्याच्याही वायव्येकडे कांगडा व कुलू या जिल्ह्यांना जोडणाऱ्या निमुळत्या पट्टीने पाचर मारून हिमाचल प्रदेशाचा दुसरा भाग वेगळा केलेला आहे. हे असे द्विभाजित राज्य निर्माण

झाले तत्कालीन संस्थानी राज्यांच्या भावनांचे लाड करण्यासाठी. आता १० वर्षा-नंतर पंजाबची भाषिक आधारावर पुनर्रचना करावी लागत असल्यामुळेच हिमाचल प्रदेशाचे हे द्विभाजित स्वरूप जाऊन एकसंध हिमाचल प्रदेश बनण्याचा योग योगायोगाने येत आहे. राज्यकर्त्यांच्या दूरदृष्टीमुळे नव्हे.

दादरा आणि नगर हवेली यांची स्थिती पाहा. गुजरात आणि महाराष्ट्र यांच्या आग्नेय–वायव्य सीमेवर वसलेला हा इवलासा टापू जेमतेम १९० चौ. मैलांचा आहे. ५८,००० लोकवस्ती आहे. १६ टक्के लोक साक्षर आहेत. महाराष्ट्रातील एखाद्या लहान जिल्हा-केन्द्राएवढा प्रदेश. गुजराती व मराठी लोकांचे प्रमाण जवळ-जवळ सारखे. वास्तविक स्वतंत्र केन्द्रशासित प्रदेश म्हणून जोपासण्यासारखे यात काय आहे ? पोर्तुगीजांच्या तावडीतून सर्वात आधी मुक्त करण्यात आलेला हा प्रदेश आहे. परंतु त्याचे भाग्य असेच लोंबकळत आहे.

गोवा, दीव, दमण या प्रदेशाची तर अक्षरश: त्रिस्थळी यात्रा आहे. गोवा महा-राष्ट्राच्या कोकणटोकाच्या दक्षिणेला, तर दमण गुजरातच्या दक्षिणेला व महाराष्ट्रा-च्या वायव्येला, आणि दीव सौराष्ट्राच्या काठेवाड किनाऱ्यावर. आणि या तिघांची मोट बांधण्यात आली एका केन्द्रशासित प्रदेशात. कारण काय ? काही नाही. पोर्तुगीजांच्या शासनात हे भाग एका राजवटीखाली होते, तेव्हा आताही ते तसेच चालू ठेवायचे हे निव्वळ पोथीनिष्ठ त्रैराशिक कशाकरता ?

पाँडिचेरीचीही तीच रड आहे. जेमतेम १८५ चौरस मैलांचा प्रदेश पण चार ठिपक्यांत विभागलेला. मुख्य ठिपका पाँडिचेरीचा. पूर्व किनाऱ्यावर मद्रास राज्याच्या दक्षिण अर्काट जिल्ह्याच्या भूभागाने वेढलेला हा नकाशावरील ठिपका मद्रासपासून ९८ मैल दक्षिणेला आहे. दुसरा ठिपका कराइकलचा. तो पाँडिचेरीच्याही आणखी ९२ मैल दक्षिणेला तंजावर जिल्ह्याने वेढलेला. तिसरा यनाम हा भाग आंध्र प्रदेशाच्या पूर्व गोदावरी जिल्ह्याने वेढलेला, विशाखापट्टण व विजयवाडा यांच्या दरम्यान पूर्व किनाऱ्यावर वसलेला आहे आणि चौथा माहे एकदम पश्चिम किनाऱ्यावर केरळच्या कन्ननूर जिल्ह्याने वेढलेला आहे. संपूर्ण केन्द्रशासित पाँडिचेरीची लोकवस्ती सुमारे ३ लाख ७० हजार, म्हणजे पुण्याएवढीही नाही. पण त्यासाठी १ मुख्यमंत्री, ५ मंत्री आणि ३० आमदारांचा पसारा.

लखदीव-मिनिकॉय-अमीनदीवी बेटे प्रदेशाची तर मौजच आहे. १९ बेटांचा हा प्रदेश. जागा फक्त ११ चौरस मैल. त्यातही वस्ती फक्त ९ चौरस मैलांत. बाकी सर्व जंगल. लोकवस्ती २४ हजारांवर. लोक मागासलेले. प्राप्ती सरकारला काहीच नाही. अंदमान–निकोबार बेटांची स्थिती थोडी बरी, पण फार वेगळी नाही. सव्वा-तीन हजार चौरस मैलांपैकी अडीच हजार चौरस मैल जंगल. मैलागणिक फक्त २० माणसे वस्ती करतात. या दोन्ही द्वीपसमूहातून प्रत्येकी एक एक प्रतिनिधी लोक-सभेवर घेतला जातो. लखदीव समूहाला तर कारभार पाहण्यासाठी साधे मध्यवर्ती

ठिकाणदेखील नाही. त्याचा कारभार तात्पुरत्या स्वरूपात केरळच्या कोझीकोड येथून चालवण्यात येतो.

## खोटा व्यवहारवाद

आता प्रश्न आहे या राज्यांची भारतीय अस्मितेहून वेगळी अशी अस्मिता वा वेगळे असे व्यक्तिमत्त्व निर्माण झाले कसे? आणि झाले असेलच तर स्वतंत्र भारतात त्याचे जतन करण्याची आणि त्यासाठी भारतीय जनतेच्या कमाईचा इतका वारेमाप पैसा पाण्यात घालण्याची खरोखरच आवश्यकता आहे का? काँग्रेस खासदारांपैकी एक ख्यातनाम महाराष्ट्रीय खासदार (त्यांचे नाव प्रसिद्ध करणे त्यांना सध्या आवडणार नाही!) मला एकदा म्हणाले होते, "आंधळा दळतो आणि कुत्रे पीठ खाते अशातला भाग आहे. स्वातंत्र्यासाठी एवढे बलिदान करणाऱ्या या मंडळींनी काय आपली वेगळी अस्मिता टिकवण्यासाठी तो अट्टाहास केला होता?..." या वेगळ्या अस्मितेचे खूळ काढले नेहरूंनी.

त्यात खोटा व्यवहारवाद होता. व्यवहारवाद म्हटले, कारण गोव्यात ३ लाख ९० हजार हिंदू, तर २ लाख २८ हजार ख्रिश्चन. अंदमान निकोबार बेटात ३४ हजार ते ३५ हजार हिंदू, तर जवळजवळ १८ हजार ख्रिश्चन. लखदीव द्वीपसमूहात तर जवळजवळ सगळे लोकच बाटगे मुसलमान. पाँडिचेरी फ्रेंच वसाहतीतील मुलूख. त्यांनी धर्मांतर करण्याचा उद्योग केला नाही. फारसा केला नाही. म्हणून आजही तिथे हिंदू व ख्रिश्चनांचे प्रमाण १०:१ असे आढळते. सव्वातीन लाखांवर हिंदू व ३४ हजारांवर ख्रिश्चन आहेत. तरीही फ्रेंच संस्कृतीचा प्रभाव सर्वत्र. अंदमानात मुसलमानांचे प्रमाण २० टक्के. (ते एवढेच राहिले हा 'काळे पाणी' भोगीत असतानाही स्वातंत्र्यवीर सावरकरांनी चालवलेल्या शुद्धिमोहिमेचा परिणाम असावा.) तेव्हा या विधर्मीयांना सामावून घेण्याची भावनाच नेहरूंच्या मनातील या व्यवस्थेची प्रेरक शक्ती असल्यामुळे तिला व्यवहारवाद म्हणणे भाग आहे.

परंतु हा व्यवहारवाद खोटा होता. कारण भारताच्या नकाशावर पुरळासारखी जी संस्थाने होती, ती राष्ट्रीय अस्मितेशी विलीन करून स्व. सरदार वल्लभभाई पटेलांनी जो राष्ट्रीय व्यवहारीपणा दाखवला होता, त्याच्याशी आर्थिक आणि राजकीयदृष्ट्या सर्वस्वी परावलंबी अशी ही नवी पुरळ निर्माण करून नेहरूंनी प्रतारणाच केली. पोर्तुगीज आणि फ्रेंच यांच्या संस्कृतीचा वरचष्मा त्यांची राजकीय सत्ता येथून लयास जाताच संपुष्टात आणायलाच हवा होता. त्या संस्कृतीला राजकीय सत्तेचे अधिष्ठान देण्यात फार मोठी चूक झाली, हे मान्य करायला हवे. परदेशांशी सख्यसलोखा निर्माण करण्यासाठी आपल्या देशात त्या त्या देशांच्या संस्कृतीची कलमे जोपासून नवी उद्याने निर्माण करण्याची गरजच नव्हती. इतर कोणत्याही स्वतंत्र देशात असे घडले नाही, घडत नाही. शिवाय या धर्मनिरपेक्ष

[पृष्ठ ६८ वर चालू]

# विचार धारे

समीर

## • संततिनियमन आणि मानसिक स्वास्थ्य

" मनुष्यप्राण्याची शारीरिक गरज भागविल्याखेरीज त्याच्या मानसिक समस्या सोडविता येणार नाहीत. " आणि महत्त्वाची गोष्ट म्हणजे गर्भधारणेची भीती उत्पन्न न होऊ देता ही गरज भागविता आली पाहिजे. या भीतीचे निर्मूलन हा मानवी सुखाचा एक " फार मोठा भाग " आहे, असे स्पष्ट मत संततिनियमनासाठी पोटात घ्यायची गोळी शोधून काढणारे ब्रिटिश शास्त्रज्ञ डॉ. व्लाडिमीर पेट्रॉव्ह यांनी गेल्या आठवड्यात दिल्लीला एका पत्रकार परिषदेत मांडले. निदान ब्रिटनमध्ये तरी बरेचसे मानसिक रोग व वैवाहिक जीवनातील दुःख गर्भधारणेच्या भीतीतून निर्माण झाले आहे, असे सांगून पेट्रॉव्ह म्हणाले, गर्भधारणेची भीती नसणे हे मानसिकदृष्ट्या जसे आवश्यक आहे, तसेच कौटुंबिक व राष्ट्रीय पातळीवर आर्थिकदृष्ट्याही आवश्यक आहे.

मात्र संततिनियमनाची एकच पद्धत सर्व स्त्रियांना लागू पडेल, अशी अपेक्षा करणे चूक ठरेल. " कारण 'सर्व-साधारण स्त्री ' नावाची चीज अस्तित्वात नाही. प्रत्येक स्त्री आपापल्या परीने वेगळी असते. " संततिनियमन अगदी सोपे असल्याचा दावा कित्येकदा केला जातो, तोही खरा नाही. " वैद्यकशास्त्राच्या या व इतर क्षेत्रात एक मोठा फरक म्हणजे या ठिकाणी चांगल्या प्रकृतीच्या स्त्रियांना औषधोपचार करावयाचा असतो. " असे असले तरी संततिनियमनासाठी पोटात घ्यायची गोळी ही मानवी संबंधाच्या इतिहासातली एक मोठी विभाजन–रेषा आहे, असं म्हणता येईल. गोळी शोधून काढल्यानंतरचे मानवी जग पुष्कळच अधिक चांगले व अधिक सुखी होऊ शकेल. " माझ्या मते संततिनियमनाच्या गोळीने मानवी सुखात फार मोठी भर घातली आहे. "

ही गोळी शंभर टक्के परिणामकारक आहे काय ? नाही. वैद्यकशास्त्रात कुठलेही औषध शंभर टक्के परिणामकारक नाही. शिवाय एखादे औषध एका सबंध पिढीने वापरल्याखेरीज त्याच्या परिणामकारकतेचा जोरदार दावा करता येत नाही. " तुमची गोळी महाग आहे काय ? " संशोधनावर झालेल्या खर्चामुळे ती सध्या काहीशी महाग आहे, पण पुरेशी जागतिक मागणी निर्माण झाल्यावर ती इतकी राहण्याचे कारण नाही. शिवाय संततिनियमनाच्या या किंवा इतर कुठल्याही कार्यक्रमाच्या खर्चाचा विचार करताना अशा कार्यक्रमाच्या अभावी लोकसंख्येत जी भर पडेल, तिच्यामुळे खर्चात होणाऱ्या वाढीचाही विचार केला पाहिजे.

हिंदुस्थानात सुधारलेले शहरवासी पोटात घ्यायच्या या गोळीचा अवलंब कर-

तील, पण खेड्यांतली जनता 'लूप' अधिक पसंत करील. लूप हेही एक "अत्यंत महत्त्वाचे" साधन आहे आणि भारतातल्या परिस्थितीला ते अगदी योग्य आहे.

## ● भारताचा भाषाशास्त्रावर प्रभाव

पाश्चिमात्य विद्वान भारतीय संस्कृतीच्या सहवासात आल्यानंतरच त्यांना भाषाशास्त्राला आधुनिक स्वरूप देण्यात स्वारस्य वाटले. "भारताशी आलेल्या संबंधाचा हा एक लहानसा पण चांगला परिणाम आहे," असे उद्‌गार दिल्ली विश्वविद्यालयात काही दिवस अध्यापनासाठी आलेले अमेरिकन भाषाशास्त्रज्ञ डॉ. जेराल्ड केली यांनी नुकतेच काढले. "अमेरिकेत भाषाशास्त्राचा विकास" या विषयावर भाषण करताना ते म्हणाले, १८ व्या शतकापर्यंत पाश्चिमात्य देशांत व्याकरणाचे अध्ययन ग्रीक आणि लॅटिनच्या आधारे होत असे. अठराव्या शतकाच्या अखेर अखेरीस पाश्चिमात्य पंडितांना संस्कृतची माहिती झाली. संस्कृत व्याकरण आणि ग्रीक व लॅटीन व्याकरण यांच्यातले साम्य त्यांच्या ताबडतोब ध्यानी आले.

डॉ. केली यांनी आपल्या भाषणात इ. स. १७८६ साली सर जेम्स जोन्स या ब्रिटिश पंडिताने काढलेले सुप्रसिद्ध उद्‌गार उद्‌धृत केले ते असे : "संस्कृत भाषा कितीही जुनी असली तरी तिची मांडणी आश्चर्यकारक आहे. ती ग्रीकपेक्षा अधिक परिपूर्ण, लॅटिनपेक्षा अधिक समृद्ध आणि दोन्ही भाषांपेक्षा खूपच अधिक सुसंस्कृत आहे. तरीदेखील शब्दांचे मूळ आणि व्याकरणाचे स्वरूप या बाबतीत संस्कृतचे ग्रीक व लॅटिनशी इतके साम्य आहे, की ते केवळ कर्मधर्मसंयोगाने तसे असणे शक्य नाही. हे साम्य इतके ठळक आहे, की आता बहुधा नष्ट झालेल्या अशा एकाच उगमस्थानातून या तिन्ही भाषा निर्माण झाल्या असाव्यात, असे त्यांचे अध्ययन करणाऱ्या कुठल्याही पंडिताला वाटल्याखेरीज राहणार नाही." केली म्हणाले, हे अवतरण नेहमी उद्‌धृत केले जाते.

अमेरिकेत भाषाशास्त्राच्या इतिहासात दोन प्रवाह दिसतात– वाङ्मयीन व मानसशास्त्रीय. आणि विसाव्या शतकाच्या तिसऱ्या दशकापर्यंत हे प्रवाह निराळे निराळे राहिले. इ. स. १९२६ मध्ये या दोन्ही प्रवाहांचे मिळून एक नियतकालिक सुरू झाले. दुसऱ्या महायुद्धाच्या पूर्वी अमेरिकेतले भाषाशास्त्र–विशेषत: वर्णनात्मक भाषाशास्त्र–इतर अनेक गोष्टींप्रमाणे आपल्याच कवचात राहिले. इंडो-युरोपियन भाषांच्या अध्ययनावर आधारलेल्या युरोपीय भाषाशास्त्रविषयक प्रमेयांचा त्याच्यावर फारसा परिणाम झाला नाही, पण २५-३० वर्षांपूर्वी युरोपीय निर्वासित अमेरिकेला आल्यावर परिस्थिती पालटली. या निर्वासितांत काही भाषाशास्त्रज्ञ होते.

जगात साधारणपणे ३००० भाषा बोलल्या जातात. "पण त्यांपैकी फारच थोड्यांचे नीट अध्ययन झाले आहे. भाषेबद्दल एखादा सर्वसाधारण सिद्धान्त मांडण्यापूर्वी नैसर्गिक भाषा कशा वापरल्या जातात, याबद्दल आणखी खूपच ज्ञान प्राप्त करून घेणे आवश्यक आहे."



# ग्यानबाचं गुऱ्हाळ

## □ लता-हमीद यांचे शुभमंगल :

काय गंमत आहे पाहा. पुण्यासारखे सुधारलेले गाव. सर्व प्रकारच्या आधुनिक विचारांच्या सुशिक्षितांची येथे गर्दी आणि तरी लता-हमीद यांच्या विवाहाचा निषेध व्हावा अं ?... अरेरे ! पुण्यासारख्या एका अग्रेसर शहरात इतका मागासलेपणा अजून शिल्लक असावा, ही केवढी शरमेची गोष्ट आहे. मोठमोठ्या लोकांनी या लग्नाचा आणि त्याला पाठिंबा देणाऱ्या समाजवादी-प्रजासमाजवादी मंडळाचा धिक्कार करावा म्हणजे काय ! मला तर अशी लाज वाटली म्हणता. आठ दिवस मी खाली घातलेली मान वर केली नव्हती. एकूण या विसाव्या शतकातही 'बुर्झ्वा' मनोवृत्तीचा, भांडवलशाही समाजरचनेत जन्माला आलेल्या आणि भिक्षुकशाहीत वाढलेल्या लोकांचा प्रभाव पुण्यातून अजून कमी होत नाही ना ? 'धिक्कार मन साहिना' हेच खरे.

किती लहानशी गोष्ट. ही लता आणि हा हमीद दोघे एका ठिकाणी नोकरीस होते म्हणे (कदाचित अजूनही असतील). तेथे त्यांचे प्रेम जुळले. जुळणारच. बरे, प्रेम म्हटल्यावर लग्न हे आलेच. त्याप्रमाणे त्यांनी लग्न करायचे ठरवले. अशा लग्नात अडचणी थोड्याफार येतच असतात. इथेही त्या आल्या. लता ही हिंदू आणि हमीद हा मुसलमान. साहजिकच लताच्या आईवडिलांचा ह्या लग्नास विरोध होता. पण त्या विरोधास न जुमानता हे लग्न झाले. आता इतक्या रोमहर्षक पद्धतीने जे लग्न झाले, त्याचा आमच्या समाजवादी मंडळींना विलक्षण हर्ष व्हावा, हेही अगदी स्वाभाविक. हा आनंद अगदी पोटात मावेनासा झाल्यामुळे त्यांनी या जोडप्याच्या अभिनंदनपर सभा घेतली. निधर्मीपणाचे महत्त्व वर्णन केले. हिंदु-मुसलमान ऐक्याची महती सांगितली. सारांश, पुणे शहरात जिकडे तिकडे आनंदीआनंद झाला. पण याच गोष्टीमुळे हिंदुधर्माभिमानी आणि हिंदुत्ववादी म्हणविणाऱ्या मंडळींचे पित्त खवळले. त्यांनी या गोष्टीचा तीव्र निषेध केला. अजूनही त्याचे पडसाद उमटत आहेतच.

हिंदुत्ववादी मंडळीच्या कोत्या आणि संकुचित विचारसरणीबद्दल मला नेहमीच त्यांचा राग येत असतो. काय म्हणावे या शहाण्यांना? अरे, समाजवादी मंडळी काय सांगतात, त्याचे नीट मनन तरी करा. "धर्म ही वैयक्तिक बाब होय. त्याचा समाजाशी काही संबंध नाही. कुणीही कुणाशीही लग्न लावावे. समाजाने त्यात नाक खुपसण्याचे कारण काय?"—आता हे म्हणणे चुकीचे आहे, असे कोणता शहाणा माणूस म्हणेल बरे? धर्म हा ज्याचा त्याचा खुशीचा प्रश्न आहे. त्याचा समाजाशी काय संबंध? आम्ही शेंडी ठेवू नाही तर दाढी वाढवू. मुंज करू नाही तर सुंता करू. लग्न करू किंवा निका लावू. बाप्तिस्मा घेऊ नाहीतर अग्यारीत बैठक मांडून बसू. तुम्ही कोण विचारणारे हो? व्यक्तिस्वातंत्र्य, धर्मस्वातंत्र्य, आचारस्वातंत्र्य, ही तर आपल्या भारतीय घटनेची मूलभूत तत्त्वे आहेत. मग एखाद्या लतेने एखाद्या हमीदशी लग्न केले तर तुमच्या नाकाला मिरच्या झोंबण्याचे कारण काय? आज इतकी वर्षे या देशाची स्थिती पाहत असूनसुद्धा तुम्हाला हिंदु-मुसलमान ऐक्याचे महत्त्व समजलेच नाही म्हणायचे. असल्या लग्नाने जातीपातीचे निर्मूलन होईलच, पण धर्माचेही निर्मूलन होऊन जाऊन निधर्मीपणाचा दिव्य प्रकाश सर्वत्र पसरल्याशिवाय राहणार नाही. 'साधने'चे संपादक यदुनाथ थत्ते, अनुताई लिमये, ना. ग. गोरे, भाई वैद्य ही सगळी प्रजासमाजवादी थोर मंडळी केवढ्या उच्च आणि व्यापक दृष्टीने या प्रश्नाचा विचार करीत आहेत, हे तुमच्या बथ्थड टाळक्यात शिरत कसे नाही? या थोर लोकांनी लता-हमीद यांच्या अभिनंदनाची सभा घेतली हे योग्यच झाले. मी तर त्याच्या पुढे जाणारा माणूस आहे. माझे तर म्हणणे असे आहे, की या लोकांनी थोडी सबूरच केली. खरे म्हणजे पेशवे-उद्यानातील हत्ती भाड्याने आणून (आणि सरकारकडून खास परमिट काढून) या लोकांनी हत्तीवरून सर्व पुण्यात साखर वाटावयास हवी होती. म्हणजे सर्व पुण्यात या मंडळींचा जयजयकार होऊन जिकडेतिकडे प्रजासमाजवाद्यांच्या उदार आणि व्यापक विचारसरणीचा बोलवाला झाला असता आणि लवकरच होणाऱ्या निवडणुकीत त्यांची डिपॉझिटे जप्त न होता वाचली असती. समाजवादी मंडळीत राष्ट्रीय वृत्ती भरपूर असली तरी कल्पकतेचा अभावच दिसतो. ही फार मोठी संधी त्यांनी घालवली. आता पुन्हा तशी येईपर्यंत त्यांना थांबावे लागणार. मी जर त्यांच्या घोळक्यात सामील असतो तर हत्तीवरून साखर वाटलीच असती, पण या जोडप्याला मोठ्या सन्मानाने एखाद्या मशिदीत मिरवणुकीने पोचवले असते. तेथे हिंदु-मुसलमान ऐक्यावर सुंदर भाषण दिले असते. अशा प्रकारचे विवाह आणखीन झाले पाहिजेत, अशा आशयाचा सुंदर अग्रलेख साधनेत लिहिला असता. जेव्हा मुलगी हिंदू आणि मुलगा मुसलमान असतो, तेव्हा असे लिहिणे काहीच अवघड नसते. हां, मुलगा हिंदू आणि त्याची प्रेयसी मुसलमान असा विवाह जर चुकून झाला तर मात्र आपण काही लिहू नये किंवा अभिनंदनही करू नये, हे

मला कबूल आहे. कारण त्यामुळे विनाकारण आपल्या मुसलमान बांधवांच्या धर्म-भावना दुखावण्याचा जबरदस्त संभव आहे. जातीय सलोखा राहावा म्हणून त्यावेळी आपण गप्प राहिलेलेच बरे. पण लता-हमीदसारखे प्रकरण आपल्याला फारच सोयीचे. आपल्याला कसलाही त्रास होण्याची भीती नाही. येऊन जाऊन मूठभर 'बूर्झ्वा' ओरडतील; त्याचे काय एवढे मनावर घ्यायचे! हिंदु-मुसलमान ऐक्याचा प्रचार करण्याची हीच खरी वेळ. माझी प्रजासमाजवादी मंडळींना एक प्रेमाची विनंती आहे. त्यांनी या आरडाओरडयाकडे ढुंकूनही पाहू नये. आपला धंदा असाच चालू ठेवावा. किंबहुना असल्या निषेधाचा आपल्या मनावर काडीमात्र परिणाम होत नाही, हे दाखविण्यासाठी सामुदायिक सुंता वगैरेसारखा एखादा कार्यक्रम जाहीररीत्या करावा; म्हणजे या हिंदुत्वाभिमानी मूर्खांची खाशी खोड मोडेल.

## ☐ पंतप्रधानांचा नृत्यास नकार :

पंतप्रधान इंदिरा गांधी अमेरिकेची धावती भेट संपवून नुकत्याच भारतात परत आल्या. अमेरिकेत त्या कुणाकुणाला भेटल्या आणि त्यांनी काय काय बोलणी केली, या बातम्या मी वाचीत होतो. पण एका बातमीने माझे लक्ष खरे वेधून गेले. एके ठिकाणी त्यांच्या सन्मानार्थ मोठा समारंभ झाला. नृत्यही झालं. या नृत्यात भाग घेण्याची त्यांना विनंती करण्यात आली, तेव्हा त्यांनी नकार दिला. त्या म्हणाल्या म्हणे की, मी नृत्यात भाग घेणे ही गोष्ट माझ्या लोकांना फारशी आवडणार नाही. पूर्वी कॉलेजात वगैरे असताना मी नृत्यात भाग घेतलेला असला तरी आता मी तसे करणे इष्ट होणार नाही.

ही बातमी वाचून मला जो काही आनंद झाला आहे, तो काही विचारू नका. या एका लहानशा गोष्टीतून इंदिरादेवींनी किती गोष्टी अमेरिकन लोकांना हळूच सूचित करण्याचा प्रयत्न केला आहे, हे ध्यानात येऊन मला त्यांचे मोठे कौतुक वाटले. अमेरिकन लोकांना कळले की नाही कुणास ठाऊक, पण मला बरोबर कळले. मी नाचात भाग घेतलेला माझ्या लोकांना आवडणार नाही आणि म्हणून मी नृत्य करणार नाही, असे इंदिराबाई म्हणाल्या. यातून त्यांनी हेच सूचित केले नाही का, की आमचा देश हा लोकशाहीप्रधान देश आहे? आमच्याकडे लोकांच्या मताला फार महत्त्व आहे. लोक जे म्हणतील त्याप्रमाणे राज्यकर्त्यांना वागावे लागते. लोकांना पसंत नसलेली एखादी गोष्ट आमच्यासारख्यांनी करून चालत नाही. तुमच्याकडे लोकशाही म्हणजे आपली मतापुरती. निवडणुकीत पाहिजे तो अध्यक्ष आणि पाहिजे तो पक्ष निवडून दिला की संपले. मग राज्यकर्ते कसेही वागोत. लोक त्याची फारशी फिकीर करणार नाहीत. आमच्याकडे बारीकसारीक गोष्टीतसुद्धा

लोकमत प्रभावी आणि प्रखर आहे. थोडक्यात सांगायचे म्हणजे आमची लोकशाही ही तुमच्या लोकशाहीपेक्षा जास्त जागरूक आहे.

मित्रहो, इंदिरादेवींनी हे जे सूचित केले, ते किती यथार्थ आहे, हे आपण पाहतोच आहोत की नाही ? आपली लोकशाही ही खरोखर शंभर टक्के निखळ लोकशाही. जसे लोक तसे पुढारी, जसे पुढारी तसा देश, जसा देश तसे त्याचे धोरण. कोठेही कसलीही विसंगती म्हणून नाही. लोकांच्या मताचे, विचाराचे आणि आचारांचे हुबेहूब प्रतिबिंब आपल्या देशाच्या राजकारणात सतत पडत असते. आपण प्रेमळ, उदार, आतिथ्यशील; आपले राज्यकर्तेही प्रेमळ, उदार आणि आतिथ्यशील. चौ एन लाय, सुकार्नो, आयूबखान इत्यादी अतिथींचे आपण किती प्रेमळपणाने आतिथ्य करतो, हे सगळ्या जगाला ठाऊक आहे. हाजीपीर खिंड सोडून द्या म्हटल्याबरोबर आपण ती पाकिस्तानच्या ताब्यात देऊन टाकलीसुद्धा. अक्साई चीन तर मागेच आपण चीनसारख्या मित्राला दान म्हणून देऊन टाकला. आता नागा लोकांच्या बाबतीतही आपण तुळशीपत्र उचललेच आहे. मिझो लोकांचीही दया आपल्याला लवकरच येईल. आपले राज्यकर्ते अगदी लोकांच्यासारखेच प्रेमळ, दयाळू आहेत, हे सिद्ध करायला आणखी पुरावा कशाला पाहिजे ?

इंदिराबाईंनी नृत्याला नकार देऊन आणखी एक गोष्ट साधली. आम्ही भारतीय राज्यकर्ते दुसऱ्याच्या तालावर नाचणारे नव्हेत, ही गोष्ट त्यांनी या निमित्ताने स्पष्ट केली हे बरे झाले. आपल्या देशाबद्दलचे गैरसमज काढून टाकणे हाच थोरांचा परदेश-दौऱ्याचा हेतू असतो. अमेरिकन लोकांनाही आता हे सत्य उमगले असेलच. आम्ही आमच्या देशात कसेही नाचू, पण तुमच्या देशात तुमच्या पद्धतीने नाचणार नाही, हा राज्यकर्त्या पक्षाचा बाणेदारपणा या निमित्ताने प्रकट झाला, हे फार छान झाले. आमचा कॉंग्रेस पक्ष आहेच मुळी तसा. देशातल्या देशात स्वतः वाटेल तसा धांगडधिंगा घालण्याची शक्ती या पक्षाजवळ एवढी अमर्याद आहे, की दुसऱ्याच्या तालावर नाचण्याचे त्यांना कारणच काय ! निवडणुकीच्या वेळी तांडवनृत्य, निवडणुकी जिंकल्यावर भांगडा-नृत्य, लोकांनी चळवळी केल्यावर माघार-नृत्य, लोकसभेत, विधानसभेत विरोधी पक्षाला उत्तर देताना 'कथाकली' आणि प्रत्यक्ष राज्य करताना 'हल्लागुल्ला,' हे सगळे नृत्याचे प्रकार आमच्या राज्यकर्त्यांना जेवढे उत्कृष्ट अवगत आहेत, तेवढे जगात दुसऱ्या कोणत्याही राष्ट्रातील राज्यकर्त्यांना माहीत असण्याची शक्यता नाही.

मुसलमान, ख्रिश्चन वगैरे अल्पसंख्य जमाती दिसल्या, की कंबर हलवून 'ट्विस्ट,' डान्स करणे इ. तर आमच्या सत्ताधारी मंडळींचा आवडता खेळ आहे. 'नाच रे मोरा ' असे कौतुकाचे उद्गार कुणीही उत्स्फूर्तपणे काढावेत, इतके त्यांचे नृत्यकौशल्य असाधारण आहे. मग अमेरिकेत निराळा डान्स कशाला ? छेः छेः, इंदिराबाई, तुम्ही नकार दिलात हे फारच छान झाले !

## □ सावरकर-सदनाभोवती पहारा :

स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या घराभोवती गुप्तचरांचा पहारा होता. ते शेवटच्या दुखण्यात—म्हणजे अगदी मृत्युशय्येवर असतानासुद्धा त्यांच्या घराभोवती गुप्त पोलीस हिंडत होते, असा आरोप महाराष्ट्राच्या विधानसभेत आमदार केशवराव धोंगडे यांनी केला होता. महाराष्ट्राचे गृहमंत्री श्री. बाळासाहेब देसाई यांनी या गोष्टीचा इन्कार केला आहे.

वीर सावरकरांच्याभोवती सरकारने गुप्त पोलिसांचे जाळे पसरलेले नव्हते, असा खुलासा सरकारने अविकृतपणे केला असल्यामुळे मला काही बोलणे शक्य नाही. पण समजा, हे विधान सत्य आहे असे बाहेर आले असते तर? —— तर त्यात काही बिघडले नसते, असेच मला वाटते. खरे म्हणजे माझे उलटे मत आहे. सावरकरांच्या घराभोवती सरकारने गुप्त पोलीस ठेवलेले नसतील तर ती सरकारची चूक होय, असेच मी म्हणेन. अहो, कितीही झाले तरी सावरकर हे क्रांतिकारक. त्यातून क्रांतिकारकांचे मुकुटमणी का कायसे—अशा भयंकर प्रवृत्तीच्या माणसाच्या निवासापाशी गुप्तचर ठेवावयास नकोत असे कुणी म्हणू लागला तर त्यालाच वेडगळ म्हटले पाहिजे. गुप्तहेर ठेवल्याने सरकारचा फायदाच झाला असावा. त्यांच्याकडे कोण येतात-जातात, त्यांची भेट घेण्याची संधी कुणाला मिळते, या सगळ्यांची यादी सरकारजवळ राहिली असती आणि अनायसेच देशाच्या राष्ट्रीय हिताला विघातक असणारे लोक कोणकोण आहेत, हे आपोआपच समजून चुकले असते. बरे, गुप्तहेर जवळपास वावरणे ही गोष्ट सावरकरांना तशी काही नवीन नव्हे. अगदी नाशिक आणि पुणे येथील विद्यार्थिदशेपासून त्यांच्या ते अंगवळणीच पडलेले होते. त्यामुळे त्यांनाही चुकल्याचुकल्यासारखे वाटले नसते. सर्व काही सुरळीत चालू आहे, अशी त्यांचीही खात्री पटली असती आणि त्यांनाही बरे वाटले नसते का? छे: ! बाळासाहेब, तुम्ही ही फार मोठी चूक केलीत. आपले अंत:करण कनवाळू. कुणीतरी काही म्हटले असेल आणि आपण सावरकर-सदनाचे नाव 'ब्लॅक-लिस्ट 'मधून काढून टाकले असेल. राज्यकर्त्यांना अशी अनाठायी दया आणि करुणा बिलकुल शोभत नाही, हे तुम्हाला केव्हा उमगणार?

आता सरकारने निदान एवढे तरी जाहीर करावे, की अगदी अलीकडेच हा पहारा आम्ही उठवला होता. सावरकरांच्या निधनापूर्वी महिना-पंधरा दिवस, फार तर शेवटचे चार-सहा महिनेच आम्ही गुप्त पोलिसांची पाळत उठवली होती. तत्पूर्वी ती अगदी कायमच होती. कुणीही काळजी करू नये. सरकारने असे जाहीर केले तरच सरकारची अब्रू वाचणार आहे; नाही तर मोठा कठीण प्रसंग ओढवणार आहे. देशाभिमानी लोक तर सरकारला नावे ठेवतीलच, पण वरिष्ठ काँग्रेस नेतेदेखील हे वृत्त वाचून चवताळतील आणि महाराष्ट्र सरकारला याचा जाब विचार-

सीऊ. त्यांनी तो विचारलाच पाहिजे. पं. नेहरू गेले म्हणून काय झाले? वर अगदीच काही सामान्य मंडळी बसलेली नाहीत. पंडितजींची परंपरा चालविण्याची धमक त्यांच्यामध्ये निःसंशय आहे. त्यांनी महाराष्ट्र सरकारला या गोष्टीचा जाब विचारलाच पाहिजे.

खरोखरच महाराष्ट्र सरकारने ही मोठीच चूक करून ठेवली. सावरकर-सदनात कोणीही यावे-जावे आणि सरकारला त्याचा पत्ताही असू नये अं? अशा गलथानपणाने देश केव्हा संकटात येईल, याचा काही नेम आहे काय? सावरकर-सदन म्हणजे काय दिल्लीचे अशोक हॉटेल आहे? आणि सावरकर म्हणजे काय शेख अब्दुल्ला होते की पिझो? शेखसाहेबांची किंवा पिझोची गोष्ट वेगळी. ते काही क्रांतिकारक नव्हते. त्यांच्यापासून देशाला कसला आला आहे धोका? त्यामुळे त्यांच्यावर सरकारने पाळत ठेवली नाही तर ती गोष्ट समजण्यासारखी आहे; पण सावरकरांची गोष्ट तशी खास नव्हे. देशासाठी काय वाटेल ते करणारा पुरुष तो. केव्हा काय केले असते, याचा काही नेम होता का? मग सरकार असे गाफिल का राहिले?

आता सरकारने आपली अब्रू बचावण्यासाठी निदान एक गोष्ट तरी करावी. सावरकर जरी गेले असले तरी सावरकर-सदन उभे आहे. सावरकरांनी जन्मभर जथे वास्तव्य केले आणि अखेरीस आपला देह ठेवला, त्या वास्तूचे दर्शन घेण्यासाठी म्हणून संशयास्पद चारित्र्याचे लोक अजूनही येतच राहतील. नव्हे, यापुढे अधिक संख्येने येण्याचा संभव आहे. म्हणून सरकारने गुप्तहेरांची पाळत 'सावरकर-सदना'वर अजून तरी ठेवावी. सावरकरांचा अशांत आत्मा या वास्तूभोवती घुटमळत राहून येणाऱ्या लोकांना काही स्फूर्ती देण्याचाही संभव आहे. म्हणून सरकारने या कामी अजीबात हयगय करू नये. पहारा कडक ठेवावा. तेथे कोण येतो, जातो, याकडे बारकाईने लक्ष ठेवावे. त्याचे टिपण सदैव आपल्याजवळ राहू द्यावे. असे झाले तरच देशाचे रक्षण काही अंशी होईल आणि काँग्रेस सरकारला आपल्या सर्वोदयाच्या ध्येयाकडे झपाट्याने वाटचाल करता येईल. माझ्यासारख्या एका सामान्य माणसाची ही नम्र सूचना आहे. पण तरीसुद्धा आमचे महाराष्ट्र सरकार तिचा गंभीरपणे विचार करील, अशी मला आशा आहे.

—ग्यानबा

● ● ●



# पर्वणी

शरद विनायक काळे

उजाडता उजाडता जगू पेठेतल्या धान्यदुकानापाशी येऊन दाखल झाला आहे.

धुकं पडलं आहे. रस्त्यालगत पिंपळाच्या विशाल आश्रयाखाली असलेली दुकानाची पांडरट इमारत सुस्त झोपल्यासारखी वाटत आहे. जवळचा पिंपळ त्या मानानं लवकर जागा झाला आहे. त्याच्या फांद्याफांद्यांतले कावळे दबकत दबकत कलकलाट करू लागले आहेत. मधूनच ते जोराने फडफडतात. एखाद दुसरा या फांदीवरून त्या फांदीकडे उडत जातो, वरच्यावर थोडी फडफड करतो, चढ्या सुरात ओरडतो नि एकदम होता की नव्हता झाल्यासारखा तिथल्या तिथं गप्प होतो... काही वेळानं वाऱ्याचा शिरशिरी आणणारा जोरदार झोत जगूला जाणवतो. पिंपळ मोठ्यानं सळसळतो, तसे सगळे कावळे खडबडून उठतात, फडफड करतात नि तारस्वरात कावकाव करू लागतात...

जगूला हसू येतं. धान्यदुकानच्या किल्ल्यांचा घोस हाती गरगर फिरवीत, तो

तसाच वर बघत राहतो – आता थोड्या वेळानं याच पिंपळाखाली धान्यासाठी लोकांची झुंबड उडेल, आरडाओरडा होईल, हे त्याच्या लक्षात येतं. रेशनसाठी जमणारी ती भाऊगर्दी अगदी प्रथमपासून बघावी, असं जगूला फारफार वाटतं. म्हणून नेहमीप्रमाणं आज तो अगदी लवकर दुकान उघडायला आला आहे नि पिंपळाखालच्या रस्त्यावरल्या दुकानाच्या फाटकाला रेलून उभा राहिला आहे.

वातावरणात चांगलीच थंडी आहे. रस्त्यावरली रेती दवानं ओलीगार झाल्यासारखी वाटत आहे. इकडेतिकडे पडलेले धान्यदाणे उठून दिसताहेत. जगूला सहज वाटतं, ही रेती संध्याकाळपर्यंत, निदान दुपारपर्यंत अशीच भिजत ओली राहिली तर फार बरं होईल. इथे येणाऱ्या लोकांची पावलंच पावलं जिकडे तिकडे उमटून राहतील. कितीतरी ठसे अन् रुतलेले धान्यदाणे बघायला मिळतील.

म्हणजे इतक्या अगणित लोकांनी आपल्या हातून धान्य खरेदी केलेलं असेल,

☐

**जगूला राहवत नाही. आरडाओरड आणि तक्रारीचे सूर यांना न जुमानता तो बिल घ्यायला हात पुढे करतो. ते घेताना त्या बोटांचा ओझरता स्पर्श त्याच्या हाताला होतो.**

**—नि त्या क्षणी जगू ' जगू ' राहिलेला नसतो !**

☐

मोजून घेतलेलं असेल. इतक्या लोकांना काही काळ का होईना, आपल्यासमोर नमावं लागलेलं असेल, झोळी पसरणं भाग पडलेलं असेल. मोठमोठ्यांना, पोरासोरांना, सुशिक्षितांना, बायाबापड्यांना—सगळ्यांना इथं येऊन आपल्या तांबारल्या नजरेतली पेटती भूक व्यक्त करावी लागलेली असेल...त्यांचे हपापलेले हात, तप्त मस्तकं, मेलेली मनं, फाटकी कार्डं, मळक्या नोटा नि बडबडणारी नाणी—सर्वांचं लाजिरवाणं प्रदर्शन आपल्यापुढं मांडलं गेलेलं असेल,—या जगूभाऊपुढं !

जो जगू काही दिवसांपूर्वी याच लोकांच्या लेखी दीडदमडीचा जीव होता; कुणाच्या खिसगणतीतही नव्हता. वाटेल त्यानं यावं अन् हवं तसं हटकावं. जग्या काय अन् जगन्या काय ! एकेकाचे दिवस असतात म्हणायचे !...

नकळत जगूच्या हातातल्या किल्ल्यांची साखळी गरगरू लागली आहे नि एक हात हाफपँटच्या खिशात घालून ऐटबाजपणे तो धान्यदुकानासमोर उभा आहे...

धुकं निवळून वर सरकलं आहे. पेठेच्या दुतर्फा असलेली दुकानं दिसू लागली आहेत. दोन इमारतींपलीकडे असलेल्या 'दिलखूष उपाहारगृहा'तून रस्त्यावर पडलेला प्रकाशाचा झोत मात्र अजून जाणवतो आहे. जगूची नजर तशीच रस्त्यावरून पुढे सरकत जाते. पेठेच्या शेवटी शेवटी धुक्यात अंधुक दिसणाऱ्या, थोडं दूर

भासणाऱ्या गॅलरीवाल्या घरापाशी थबकते. रस्ता तिथं वळण घेऊन दिसेनासा होतो. जगू मग पुन्हा पिंपळाकडे बघू लागतो---कावळे एकेक उडताहेत नि कावकाव करीत कुठे दूर सटकताहेत...

हळूहळू वाऱ्याला माणसं येऊ लागली आहेत. 'दिलखूष'मवले कपबशांचे आवाज जास्त स्पष्ट ऐकू येऊ लागले आहेत. रेडिओवरली वाद्यं नि गाणी दुमदुमू लागली आहेत. वाऱ्याच्या झुळकेबरोबर खमंग वासही नाकी भिनू लागला आहे...

जगूची पावलं नकळत तिकडे वळतात.

ताजी भजी खाऊन नि चहा-ब्रेड घेऊन तो परत दुकानापाशी येतो, तेव्हा माणसं हळूहळू जमायला लागलेली त्याला दिसतात. कुलपं खोलून नागमोडी पत्र्याचं झडप तो वर ढकलतो. ते झटकन् वरच्या पोकळीत अंग आखडून बसतं. जगू मग दारात उभा राहतो नि जमायला लागलेल्या माणसांकडे बघू लागतो. चांगले चांगले, प्रतिष्ठित म्हणविणारे लोक त्यांत असतात, नट्टापट्टा करून मिरविणाऱ्या नटमोगऱ्या असतात, वृद्ध असतात, तरणेताठे असतात, पोरंसोरं असतात...जगूच्या लक्षात येतं — आता अर्ध्या तासाच्या अवधीत ही ऽऽ गर्दी जमेल, झुंबड उडेल. आडव्या-तिडव्या रांगा लागतील. मग थोडं खेकसणं, तक्रारी, घुसाघुशी, बोलाचाली, मारा-माऱ्या...टेबलावर उंचावत जाणारी रेशनकार्डांची चळत–मळकट, अस्ताव्यस्त... तापत जाणारी शरीरं, घामेजलेली अन् सुकून कोडग्या झालेल्या नजरा–वखवखल्या... कीड लागलेलं कोमट, पोचट धान्य. त्याचा इतस्ततः उडणारा भुगा–घुक्यासारखा, हलकाफुलका, भुराभुरा, कुबट, दवता वास. धान्यात तिरप्या मारल्या जाणाऱ्या बुट्ट्यांचे सपासप आवाज. खटाखट वाजणारी तराजूची पारडी, सर्रकन् ओतलं जाणारं, नरसाळ्यातून खाली घसरणारं धान्य...एखाद्याची पिशवी डगडगत्या फनेलाखाली नीट धरली नाही की फळ्ळ्कन् खाली सांडणारे, फरशीवर पसरणारे धान्याचे दाणे— दुकानात सुरू असणारी दिवसभराची ही घुमश्चक्री ! अशा वेळी मोठा हुरूप येतो. वाटतं, जास्तीत जास्त जोरानं, अतिशय वेगानं धान्य मोजावं अन् ओतावं. इतकं की खाली पिशवी धरलेल्या हातांना जबरदस्त हिसका बसावा नि धान्य सगळं भुईवर पसरावं––अनेकदा असं अभावितपणे होतंदेखील. विशेष म्हणजे– जगूला आठवतं, गेल्या आठवड्यातच असं घडलं होतं. पेठेच्या वळणावरल्या गॅलरीवाल्या घरातल्या दर्शन्यांची प्रभा आलेली असताना...अबोलीचा गजरा माळलेला, उन्हामुळं तसलाच शेंदरी रंग गालावर फुललेला नि पिशवी धरताना सरकणारा पदर सावरता सावरता तारांबळ उडालेली...धान्य खसकन् ओतलं जातंय् नि पिशवीचा बंद हातून निसटतोय्...फरशीवर पसरलेलं धान्य, ते जमविताना हलणारे गोरे सुबक हात, किणकिणणाऱ्या गडद बांगड्या, चमकणारी अंगठी...

जगू बेचैन होऊन जातो. त्याच्या नजरेसमोर फक्त ते हातच हलत असलेले दिसू लागतात...

नादिष्टासारखा तो मग शीळ घालू लागतो. मनोमन त्याला सारखं वाटत राहतं- या भुक्कड भासणाऱ्या गोष्टीतही गंमत आहे. अलीकडे जाणवू लागलेली एक गोष्ट त्याला आजही पुन: पुन्हा जाणवू लागते–या नोकरीमुळं आपल्याला मोठी मानाची जागा लाभल्यासारखं झालं आहे. एरवी या गावात आपल्याला कुणी विचारलंही नसतं. पण या सर्वांचे संबंध गुंतलेल्या ठिकाणी, हे सार्वसुखं, मापाऱ्याचं, बरबर हलकं वाटणारं काम मिळालं आणि आपल्या तोंडपाटीलकी करण्याच्या कौशल्या-मुळं आपला भावही वधारत गेला...

यापूर्वी खरं म्हणजे चक्क हमाली करण्याव्यतिरिक्त दुसरा मार्ग नव्हता. धड चांगला शर्ट कधी अंगाला नाही, पेट्रेरी कापडाच्या खरबरीत अंडर पॅंटवर नि फाटक्या गंजिफ्राकवर दिवस काढावे लागत होते. आता अभ्यासात लक्ष असतं तर एव्हाना शाळेतून बरेपणानं उद्धरून, चांगली सरकारी नोकरी मिळाली असती. आपल्या बरोबरचे लोक आता कुणी कॉलेजात, कुणी कुठं असे स्थिरावले आहेत; पण शाळेत एकंदरीन पहिल्यापासनंच आपल्याला गुदमरून जायला होई, त्यात दहावीलाच आपटी खावी लागली नि शाळा सुटली ती कायमची. जाऊ दे, जे जमलं नाही, त्या बद्दल हळहळ कशाला हवी ?

आणि मध्या जे काम आपल्याला मिळालं आहे, ते काय कमी सुखाचं आहे ?

त्यामुळंच तर खूप गोष्टी मनासारख्या होतात–घड्याळ घेणं, एरवी आपल्याला किती अशक्य होतं ? पण ' कंझ्यूमर्स सोसायटी 'च्या या दुकानात खूप जप्त स्मगल्ड माल येतो–आपलीही वर्णी त्यात लागली नि स्वस्त्यात ही चैन जमून गेली. स्पोर्टस्‌चे लोक घालतात तसला मऊ टी–शर्ट घेता आला...

जगू मग मोठ्या अभिमानानं कॉलर चाचपतो नि मनगटावरल्या रुंद, चमकत्या घड्याळाकडे बघतो. साडेसात होत आलेले आहेत...आठ वाजता वाटप सुरू करायला हवं; एवढ्यात अप्पा देसाई बिलं लिहायला येईल, तोवर सगळं आवरून ठेवायला हवं, असं स्वत:शी घोकीत जगू तागडीखालची जागा साफ करतो नि भुसकट उधळ-णार नाही, अशा बेतानं पोत्याजवळचा केर लोटू लागतो.

तोपर्यंत बिलं लिहिणारा अप्पा देसाई येतो, टेबलाचे ड्रॉवर्स सरकवतो, कागदपत्रं नि बिलबुकं बाहेर काढतो, कार्बनपेपर व्यवस्थित लावतो नि खुर्चीवर रेलून पुकारा करतो– ' जगुभाऊ, साखर लावायची नाही आज ! '

झाडणी रिकाम्या पोत्यांच्या ढिगावर टाकीत जगू म्हणतो, ' हो, आलं लक्षात. बाहेर बोर्डावर लिहून टाकूया तसं– ' हे म्हणता म्हणता त्याच्या हेही लक्षात येतं, की खरं म्हणजे अजून बरीच साखर शिल्लक आहे, वशिल्याच्या खास लोकांना ती द्यायची आहे. किंबहुना, असं जाहीर करणं हीच या गोष्टीची खूण आहे. आता चांगले, मी मी म्हणविणारे प्रतिष्ठित येतील अन् अप्पाकडे नि आपल्याकडे हसत

हसत मागणी करतील. काहीतरी ठरवल्यासारखं करून जगू टेबलावरली खडूची कांडी उचलतो नि दुकानच्या मागच्या पडवीत जातो; दरांचा बोर्ड घेऊन, खालच्या मोकळ्या जागी वेड्यावाकड्या पण मोठ्या अक्षरांत लिहितो – "साखरेचा स्टॉक संपला आहे." बोर्डावरलं उरलेलं लिखाण मग तो गिरवतो, दर ठळक करतो, 'साखर' या शब्दापुढं फुली मारतो अन् बोर्ड बाहेर आणून भिंतीला टांगून टाकतो. बाहेर जमलेले लोक काय म्हणणार, त्यांचे चेहरे कसे संशयित नि संत्रस्त होणार, याची त्याला कल्पना असते. त्याला उगीचच चीड येते लेकाच्यांना: धान्य हवं, साखर हवी अन् म्हणतील त्या वेळी, कोणतीही अडचण न येता विनतक्रार व्हायला हवं सगळं...असंच ताटकळत ठेवायला हवं सगळ्यांना......

मग असे अनेक ताटकळते चेहरे त्याला दिसू लागतात–लांबट, वाकडातिकडा असा त्या चेहऱ्यांनी बनलेला क्यूच्या क्यू त्याला दिसतो... काही चेहरे मग्रूर अन् मख्ख, काही चिडके पण दीनवाणे नि त्यांतले काही नाजुक, लोभस, आकर्षकदेखील–प्रभा दर्शनेच्या चेहऱ्यामोहऱ्यासारखे... त्या सर्वांच्या नजरेत आपल्यासाठी एक खास, राखीव भाव भरलेला जगूला दिसतो नि आपल्या महत्त्वपूर्ण स्थानाविषयी अत्यंत सुखद अशी जाणीव त्याच्या मनाला गुदगुल्या करू लागते. हात छातीशी दुमडून, पडवीतल्या खांबाला टेकून तो ऐटीत उभा राहतो. वेड्यावाकड्या रांगेवरून त्याची नजर भिरभिरत जाते–रांगेत मध्येच एक पगडं आड झालेलं असतं. जगू टांचा उंचावून बघतो. त्या पगड्याच्या पलीकडं एक लालसर हिरवा पदर किंचित उचलल्यासारखा हळू हलत असतो, त्यापलीकडं आळसामुळं ताणल्यासारखे, डोक्यावर घेतलेले दुमडलेले हात दिसतात–नि पुढे नुसती केसांची, टोप्यांची, मळकट लांबोडक्या पिशव्यांची गर्दी दाट होत गेलेली असते...

—' जगुभाऊ, सुरवात करायची ना ? '

अप्पा आतून विचारीत असतो. जगू भानावर येतो नि म्हणतो, ' हो– तर ! '

' चहा सांग दोन. '

जगू बाहेर येऊन रस्त्यावर थोडा पुढे जातो. ' दिलखूष 'समोरच्या सायकलच्या दुकानात कुणीतरी उभा असतो. जगू हाताची ओंजळ तोंडाशी आडवी धरून खुणेची दोन बोटं त्याला दाखवितो नि ' दिलखूष 'कडे संकेत करतो. चहा येईपर्यंत मग तो तिथंच रेंगाळतो. पुन्हा एकदा गर्दीवरून त्याची चौकस नजर फिरत राहते.

चहा घेऊन अप्पा देसाई कामाला सुरवात करतो. प्रत्येकाच्या सांगण्यानुसार पावत्या लिहू लागतो. जगू आत येऊन पोत्यांची तोंडं कडेला गोल दुमडून घेतो नि दोन-तीन बुट्ट्या आतून आणून तराजूपाशी सज्ज होऊन राहतो. अप्पा एकेका कार्डावरचं नाव वाचीत असतो अन् त्याच्या त्याच्या सोयीनुसार पावती लिहीत असतो. दर खेपेला साखरेबद्दलची पृच्छा पुन:पुन्हा होते नि तिचं उत्तर नकारात्मक हुंकारानं दिलं जातं. जगूकडे बिलं येतात. त्याचा हात सराईतपणे बाजूच्या पोत्या-

तल्या बुट्टीवर पडतो. पहिल्या बिलावर त्याची नजर फिरते नि धान्य खसकन् उपसलं जातं, तागडीत ओतलं जातं. त्याबरोबर पारडं दणकन् खालच्या फळीवर आपटतं. जगूची नजर वर काट्याकडे सरकते, मुठीनं पारड्यातलं धान्य कमीजास्त केलं जातं नि पारडं वाकडं होऊन खालच्या नरसाळ्यात रितं होतं, बिल फाडलं जातं अन् त्यासकट सगळं धान्य नरसाळ्यातून खालच्या पिशवीत सरकतं––मग दुसरं बिल–तिसरं, चौथं–

जगूच्या हाताडोळ्यांची यंत्रं वेगानं सुरू होतात. अप्पा वाचीत असलेली नावं त्याच्या कानांवर आदळत आहेत. गावातल्या प्रतिष्ठितांची नावं त्यांत असतात, श्रीमंतांची असतात अन् गरीबगुरिबांची देखील–ही सगळी माणसं, या ना त्या प्रकारे आता आपल्यापुढे निश्चितपणे लाचार आहेत, आपल्याला मान देत आहेत नि फार मोठी जबाबदारी आपल्याला पार पाडावी लागत आहे, असं जगूला राहून राहून वाटू लागतं. अभिमानानं त्याचा ऊर भरून येतो.

मध्येच समोरचा धान्य घेत असलेला माणूस शंकेखोरपणे विचारतो, 'काय हो, थोडीसुद्धा साखर शिल्लक नाही, असं कसं होईल ?'

जगूचा चेहरा नकळत मग्रूर बनतो. या कपाळावर उजव्या बाजूला टेंगूळ असलेल्या आगाऊ माणसाचा नाहीतरी त्याला अगदी पहिल्यापासनंच राग येतो. आपण बेकार अवस्थेत होतो, तेव्हा याच टेंगूळवाल्या माणसानं आपल्याला उंटावरल्या शहाण्यासारखा कुठेतरी प्यून होण्याविषयी सल्ला दिला होता. जगू तिडिकेनं सांगतो, 'बोर्ड बघा की बाहेरचा ?'

'ते झालंच...पण–'

'हं– आधी पिशवी धरा नीट, नाहीतर जोंधळा सांडेल सगळा.'

त्या माणसाकडे सराईतपणे बघत तागडीची बुट्टी जगू शक्य तितक्या जोरानं वाकडी करतो. तारांबळीनं पिशवी सावरणाऱ्या नि खट्टू झालेल्या त्या इसमाकडे जगू विजयी मुद्रेनं पाहून घेतो नि पुढल्या बिलाकडं वळतो.

तेवढ्यात अप्पानं पुकारलेलं नाव त्याला ऐकू येतं नि त्याचे कान सजग बनतात.

'पी. एस्. दर्शने.'

'हां–हां...' हजेरी दिल्यासारखा एक बायकी आवाज दुरून येतो. हा निश्चित प्रभा दर्शनेचा आवाज, हे जगूचे कान ओळखतात. एकीकडे त्याचे हात अन् डोळे आपलं काम अस्खलित बजावीत राहतात. अनेक बिलं येतात, माप केलं जातं नि धान्य ओतलं जातं. मध्येच जगूची नजर स्वतःपुढल्या स्त्रियांच्या घोळक्याकडे वळते. प्रभानं त्या घोळक्यात प्रवेश मिळविलेला असतो. जगूच्या हातांचा वेग अभावित वाढतो. काही वेळानं प्रभाचा किनरा आवाज त्याला सतावू लागतो, "अहो, हे बिल घ्याना जरा लवकर !" –

जगू लक्ष न दिल्यासारखं करतो. पण त्याचे डोळे मध्येच तिच्याकडे वळतात नि

वेणीत तिनं माळलेला अबोलीचा गजरा बघून घेतात. न कळत त्याची नजर थोडी खाली सरकते. तिचा चेहरा लाललाल होऊन गेलेला असतो. तिचा लहरी रंगाचा पदर सळसळत असल्याचं जाणवतं नि जगू दचकतो.

ती त्याच्याकडे बिल धरलेला हात उंचावून इतरांना न जुमानता बघत असते... जगू खालच्या मानेनं चालू बिल जोरानं टरकावतो नि धान्याची बुट्टी जोरानं पोत्यात आदळतो. तराजूची पारडी जास्त मोठ्यानं खालच्या फळीवर आदळतात.

प्रभानं तेवढ्यात गर्दीच्या तोंडाशी जागा करून घेतलेली असते नि तिचा हात चक्क तागडीखालच्या फळीवर सरकलेला असतो. तो सुबक हात, फळीच्या कडेवर दाबला गेल्यामुळं कोपराकडे त्याला आलेला गोंडस फुगीरपणा, रुतल्यासारख्या वाटणाऱ्या निळ्याभोर बांगड्या, चमकती नाजुक अंगठी, निमुळती रंगीत नखं नि नाजुक चिमटीत पकडलेलं रकान्यांनी, आकड्यांनी व्यापलेलं बिल—फुलपाखरासारखं...!

जगूला राहवत नाही. आरडाओरडा आणि तक्रारीचे सूर यांना न जुमानता तो बिल घ्यायला हात पुढे करतो. ते घेताना त्या बोटांचा ओझरता स्पर्श त्याच्या हाताला होतो—

—नि त्याक्षणी जगू 'जगू' राहिलेला नसतो!

संधी साधल्यासारखी नेमकी याच वेळी प्रभा विचारते, "साखर थोडीतरी मिळेल का हो? अडलंय् अगदी—देसायांना सांगता का जरा?"

'बोर्ड पाहिला ना बाहेरचा?' जगू काहीतरी बोलायला हवं म्हणून स्वगत बोलल्यासारखं म्हणतो; पण थोड्या वेळापूर्वी त्या टेंगूळवाल्या माणसाला दिलेल्या उत्तरातला बोचकपणा नि मग्रुरी या गोष्टी या वेळी कुठल्याकुठे पळालेल्या आहेत, हे त्याला कळून चुकतं. ती आर्त मुद्रा करून बघत राहते नि काहीही करून इतर वशिल्याच्या लोकांत हिचीही वर्णी लावावी, असा आतापर्यंत कधीही न शिवलेला विचार त्याच्या मनात येऊ लागतो—तो विचार करू लागतो, 'नाहीतरी इथं कोण लेकाचा विचारायला येतोय् आपल्याला?'

गर्दीतली इतर माणसं ओरडत असतात, 'अहो आटपा लवकर.' त्या कोलाहलाचा फायदा घेऊन जगू हळूच म्हणतो, "आधी इतर धान्य घ्या नि थांबा जरा बाहेर, किंवा थोड्या वेळानं या. मग बघू या!" तो हसू लागतो. प्रभाही हसते. धान्य मोजून घेऊन बाजूला होते.

गर्दीचा भर तासाभरानं जरा कमी होतो. अप्पाला जगू म्हणतो, 'जरा थांबतो बुवा आता—रग लागली पायांना.' तो मग बाहेर येतो. टाळी वाजवून दिलखुषवाल्याला खुणेची दोन बोटं दाखवितो नि त्याची नजर शोधकपणे इकडेतिकडे हिंडू लागते. कोपऱ्यातल्या स्टेशनरी मार्टमधून प्रभा बाहेर पडलेली तो ओळखतो नि अप्पाला बाजूला घेऊन तो कुजबुजत त्याला समजावू लागतो.

'तेव्हा अप्पा, काहीही कर नि निदान किलो–दीड किलोची व्यवस्था कर बघ !'

'अरे पण––'

'ते काही नाही–मला ठाऊक आहे सगळं.'

'पण एवढं काय अडलं आहे ?'

काय अडलं आहे, ते जगूला स्पष्ट करता येत नाही; पण स्वतःच्या पतीवर एक किलो साखरेची व्यवस्था करता येणं अशक्य नाही, हे त्याला माहीत असतं.

तोपर्यंत प्रभा पुढं येते.

'पिशवी आहे ना रिकामी ?' जगू हळूच तिला हटकतो नि आत येण्याविषयी खुणावतो. मग तो आतून सराईतपणे बुट्टीभर साखर राखीव पोत्यातून काढून आणतो नि माप करतो. प्रभा अलगद पिशवी धरते. जगूला वाटतं, 'आता साखर ओतताना मागच्यासारखी हिच्या हातातली पिशवी निसटावी नि शुभ्र साखर चौफेर पसरावी. ती गोळा करताना मग नुसते गोरे हात हलत राहतील. बांगड्या वाजत राहतील, अंगठी चमचमत राहील. तो मग हसत हसत प्रभानं धरलेल्या पिशवीत साखर ओतू लागतो. शुभ्र धार सर्रकन् पिशवीत पडते. प्रभा अप्पाजवळ पैसे देऊन


परसूच्या पशुकथा — वसंत सबनीस

सहा साहसे — दा. सी. देसाई

मूल्य प्रत्येकी दोन रुपये

राजहंस प्रकाशन, ४१९ नारायण, पुणे २

जायला निघते. तिच्या नजरेतली आभाराची जाणीव जगूला समजते. त्याची दृष्टी रस्त्यावरून जाणाऱ्या प्रभाचा मागोवा घेत राहते नि गॅलरीवालं घर त्याला स्पष्ट दिसू लागतं.

'दिलखूष'वाल्याच्या पोऱ्यानं चहा आणलेला असतो. तो पिताना आपल्या-सारख्या एका भणंगाला एका विशिष्ट परिस्थितीमुळं असं वागायला मिळावं, थोरामोठ्यांकडून चांगली वागणूक मिळावी, प्रभा दर्शनेसारख्या एका प्रतिष्ठिताच्या देखण्या मुलीकडून विनवणी करून घ्यायची संधी लाभावी, याचं जगूला सारखं अप्रूप वाटत राहतं.

आणि पुनश्च भरमसाट गर्दी जमावी, काम जोरसे सुरू व्हावं, शेकडो लोकांनी यावं अन् धान्य घेऊन जावं, प्रसंगी लाचारपणे बघावं, बेपर्वाईचं वागणं नि तुटक बोलणं सहन करावं अन् आपण या पर्वणीचा लाभ घेऊन मोठ्या ऐटीनं सगळ्यांना कस्पटाप्रमाणं लेखावं; अशी जबरदस्त इच्छा त्याच्या मनात निर्माण होते. स्वतःशी तो मग भलताच खूष होऊन जातो. त्या भरात पुन्हा कामाला सुरवात झाली केव्हा नि दुकान बंद होण्याची वेळ येऊन ठेपली केव्हा, हे त्याला कळतच नाही.

दुपारी अप्पा देसाईनं टेबलावरली कागदपत्रं आवरलेली असतात. जगूचं काम संपलेलं असतं. त्याला वाटतं, संध्याकाळी आता विशेष काही घडणार नाही. सकाळ-सारखीच गर्दी, आरडाओरडा नि कामाची तारांबळ. भराभर काम उरकून टाकलं की दिवस मजेत जाईल...मग नागमोडी पत्र्याचं झडप खाली ओढून जगू कुलपं ठोकतो अन् रस्त्यावर येतो.

रस्ता तापला आहे. पिंपळाच्या सावलीमुळं दुकानाजवळ मात्र शांतशांत वाटत आहे. कावळे सावलीला येऊन विसावले आहेत. सकाळसारखाच त्यांचा दबता कलकलाट चालला आहे. बाकी पेठेच्या टोकापर्यंतचा रस्ता तापून निघाला आहे... गॅलरीवाल्या घराजवळ रस्त्यानं वळण घेतलं आहे. जगूची नजर त्या घराच्या लाल मंगलोरी कौलांवर स्थिरावते. उन्हामुळं त्यांचा रंग भलताच भडक वाटतो—अबोलीच्या शेंदरी रंगासारखा ! तिथं मृगजळ लहरत असतं...

सारख्या वरखाली थरकणाऱ्या त्या उन्हाच्या लहरींकडे बघताना जगूला वरखाली हलणारी तराजूची पारडी दिसतात, धान्याचा धुक्यासारखा भुगा पसरत असल्यासारखं वाटतं, साखरेच्या शुभ्र धारा उसळल्याचा भास होतो नि त्याचे डोळे दिपतात.

मग शीळ घालीत तो 'दिलखूष'कडे वळतो.

• • •

# घरसंसार आणि ऑफिस



## या दोन्ही जबाबदाऱ्या सांभाळणाऱ्या भगिनींना

स्त्री जीवनांत अत्यंत जरूरीच्या वेळीं विश्रांती घेता येत नाहीं. परिणामीं त्यांच्या नेहमींच्या तक्रारी वाढतात. बाळंतपणानंतर तर जीव नकोसा करणारी अशक्तता, ओटीपोटदुखी,, बेचैनी आणणारी पाठ व कंबरदुखी वगैरे तक्रारी विशेष त्रास देतात. मिसेस आनंदीबाई देसाई यांच्या अबलामृत गोळ्या असल्या तक्रारींवर चांगल्या उपयोगी पडतात. मध्यम वयानंतर एकंदर आंतर स्त्री इंद्रियांची शक्तीच कमी झाल्यामुळें उद्भवणाऱ्या बऱ्याच तक्रारींवर अबलामृत गोळ्या चांगल्या गुणकारी ठरल्या आहेत. वर्षांतून १/२ वेळां अबलामृताच्या सहा बाटल्या घेतल्यास फार श्रमामुळें येणारा शारीरिक व मानसिक थकवा लवकर दूर होतो. **कुमारीजीवनापासून कौटुंबिक जीवनाच्या सर्व महत्त्वाच्या काळांत**




**मिसेस आनंदीबाई देसाई यांच्या**

# अबलामृत गोळ्या

**आपणांला निरोगी, आनंदी, सुखी व सफल स्त्रीजीवनाचा लाभ करून देतात.**

**पर्ले आणि कंपनी मुंबई २७.**

STUSA 8/65

# एलियाची सुंदर दुनिया

शरद द. वैद्य

आपणहून एलियाकडे कधी अशील आलं नाही, आणि एलियानं जाणून तसा प्रयत्नही केला नाही. कोर्टातील वकिलांच्या खोलीत बसून काही तरी खरडत बसण्याचा नाद त्यानं लावून घेतला होता. आपल्या पत्नीवर त्याचं खूप खूप प्रेम होतं. कॉलेजमध्ये असताना तो कविता करायचा. त्याच्या या गुणांवरच एक वर्ग-मैत्रीण मुग्ध झाली. लौकरच या मैत्रीचे रूपांतर प्रथम प्रेमात आणि नंतर विवाहात झाले. एलिया वकील झाला नि त्याच्या घरात पहिलं अशील आलं, ते दारिद्र्य. परंतु ती केस जिंकणं एलियाला सुतराम शक्य नव्हतं. काळच फिरला होता. मोठ-मोठ्या वकील-बॅरिस्टरांवर हात जोडून बसून राहण्याची पाळी आली होती, तिथं एलिया कोराईसारख्या नवख्या वकिलानं करावं तरी काय ?

एलिया संध्याकाळी घरी येईस्तोवर त्याची पत्नी दारातच उभी असायची. आज तरी आपला पती नक्कीच काही पैसे मिळवून आणील अशी आशा तिच्या मनात फुलायची. परंतु तिच्या हातात पडणारा कागद अपेक्षेप्रमाणे नोट काही नसायची. एखादी शृंगाररसानं ओथंबलेली कविताच तेवढी हाती आलेली असायची. कविता कितीही चांगली असली, तरी तिनं पोट काही भरत नसतं आणि नेमकी हीच गोष्ट एलियाच्या ध्यानात येत नसे.



वहाणा फाटल्या होत्या.
नवी कोरी बुटांची जोडी
असली तरच काकाची
संपत्ती मिळणार होती–
सुंदर पत्नीला दिलेलं
वचन पूर्ण करता येणार
होतं–पण–

अशीच एकदा त्यानं एक कविता तिच्या हाती दिली. ती अशी :

सुंदरी, सुंदर ही दुनिया–
काय उद्या घडणार कळे मज
कवि मी, मजहाती किमया – सुंदरी०
मरेल काका उद्या सकाळी
मिळेल दौलत मलाच सारी
फुलेल येथे वसंत अवघा
राणी तू, मी राजा – बघशील त्या समया––
सुंदरी, सुंदर ही दुनिया ––

एलियाच्या पत्नीनं तो कागद आपल्या दुमत्याच्या कपाटात एकीकडे फेकून दिला, तेव्हा आज घरात चहा मिळण्याची आशा नसल्याचे त्याने ताडले. तो मुकाट्यानं उठला आणि जिना उतरून रस्त्यावर गेला. काय करावे तेच त्याला कळत नव्हते. तोच त्याच्या खांद्यावर कुणाचा तरी वजनदार हात पडला. दचकून त्यानं मागे पाहिलं, तर म्हातारा गाडीवान इवान. नेहमीच्या घाईघाईनं बोलण्याच्या पद्धतीनं बोलत इवान म्हणाला, " अरे वकीलसाव, मी नुकताच टेर्सनोवाहून वापस येऊन राहिलो आहे.

तुझा चाचा लई बिमार हाय.–" एलियानं तेवढं ऐकलं मात्र नि त्याचे डोळे लकाकले. घापा टाकीतच त्यानं आपलं घर गाठलं. दारातच त्याची बायको उभी होती. तिच्या पायात भारी किमतीचे सँडल्स होते. अंगावर उंची कपडयाचा नव्या फॅशनचा फ्रॉक होता. परंतु त्या फ्रॉकवर ठिकठिकाणी ठिगळं लागलेली होती. सँडल्समध्ये अनेक खिडक्या निर्माण झाल्या होत्या. कित्येक दिवसांत तेलाचा स्पर्शही न झालेले केस वाऱ्यावर भुरभुर उडत होते. रक्तहीन पांढरा चेहरा नि निस्तेज बनत चाललेले डोळे तिच्या व्यक्तित्वाला अधिकच उदासीनतेची झाक देत होते.

" जाऊन यावं म्हणतो––" एलिया म्हणाला, " काका मरणार बहुतेक––"

" पण भाडं ? दिडकी तरी आहे का घरात––"

" त्याची नको काळजी. माझ्या एका कवितेचा मोबदला आहे माझ्याजवळ–"

गावापासून सुमारे बारा मैल अंतरावर काका राहत असे. चालत जाणंच अधिक योग्य होतं. अनवाणी चालण्याचे अनेक प्रसंग त्याने भोगले होते.

चालता चालता त्याच्या मनात विचारांची गर्दी उसळली. आपले फाटके बूट एवढी मजल मारण्याचा ताण सहन करू शकतील का, या शंकेनं त्याला बेजार केलं होतं. शक्य तेवढया वेगानं परंतु सांभाळून पावलं टाकीत त्यानं ओरोसीसपर्यंतची वाटचाल केली. इतक्यात रात्र झाली. थंडगार वारे वाहू लागले. एव्हाना बूट फाटून चिंध्या झाले होते. चालताना खडे बोचत होते; पण त्याला चालणं भाग होतं. काका मरण्यापूर्वी तेथे हजर व्हायला हवं होतं. वारसा सांभाळायला हवा होता. काकाला भेटून त्याच्या मनात स्वत:विषयी चांगला ग्रह निर्माण करायला हवा होता. त्यासाठी तरी एखादी कोरी करकरीत बूटजोडी मिळविणं आवश्यक होतं, परंतु–

काळोख पसरत होता. पाऊस रिमझिम लागला होता. रस्त्यावरची रहदारी पांगू लागली होती. रानातून एकटं चालणं अवघड होणार होतं. कुठं तरी आसरा घ्यायला हवा होता. थोडं पुढं गेल्यावर एक देऊळ लागणार होतं. तिथं ओसरीवर टेकता येण्यासारखं होतं. एलिया तिथं पोचला, तेव्हा देवळाच्या बाहेरच्या बाजूला आणखी दोघंजण आधीच येऊन झोपलेले होते. अंगावरच्या कपडयांसहितच एलिया तिथं लवंडला.

बाहेर पाण्याचा जोर वाढला होता. शेजारच्या माणसाला शांत झोप लागली असावी. एलियाच्या डोक्यात विचारांचं वादळ उठलं होतं. डोळा केव्हा लागला ते एलियाला कळलं नाही. झोपेत त्याला स्वप्न पडत होतं. त्याचा काका भयंकर भडकला होता. त्यानं अनवाणी चालण्याची शिक्षा केली होती. काकानं पुढेच असंख्य चपला-बुटांचा ढिगारा उभारला होता. परंतु त्यानं त्याला स्पर्श करायचा नव्हता. झोपेतच त्याचा जीव गुदमरला. दबलेला हुंदका गळयात अडकला नि एलियाला जाग आली. वर आकाशात चंद्र होता. चांदण्यानं छाया–पडछायांची जाळी फेकली होती. दूरवरून कसले तरी चित्रविचित्र आवाज कानी येत होते.

कसला तरी विचार त्याला शिवला नि एलियानं टुणकन् उडी मारली. मांजरीच्या पावलानं तो त्या घोरणाऱ्या माणसाच्या जवळ गेला. अंधारातच चाचपडून पाहिलं. त्या माणसाच्या पायाजवळच त्याचे बूट निखळून पडले होते. एलियानं हलकेच ते उचलले. पायांत अडकवून पाहिले, पण वाजवीपेक्षा तो पाय बराच मोठा असावा. निराशेनं काळवंडून तो मागे फिरणार, तोच बाहेर कुणीतरी खरकन् काडी ओढली. पिवळसर-तांबड्या प्रकाशाच्या दर्शनानं तो दचकला. धडधडत्या हृदयानं तो जमिनीवर आडवा झाला आणि त्याच्या लक्षात आलं की, पायरीजवळच एक बूटजोडी पडलेली आहे.

क्षणभर तो निपचित पडून राहिला. सर्वत्र शांत झाल्याची खात्री करून घेऊन एलिया पाठीवर सरकत सरकत पायरीकडे गेला. चटकन् उचललेली बूटजोडी कोटाच्या लोंबत्या अस्तरात लपविली आणि मग आवाज न होईल इतक्या बेतानं तो रस्त्यावर आला. पहाट होत आली होती. कोंबडी आरवू लागली होती. क्वचित रस्त्यावरून एखादी गाडी रखडत चालली होती.

शेजारून वाहत जाणाऱ्या नदीच्या पाण्यातून त्यानं चूळ भरून टाकली. तो पुढं चालू लागला. पण त्याचा पाय सरळ पडत नव्हता. मनातून एक भलतीच भीती डोलावू लागली होती. जर बूटजोडीच्या मालकानं पाठलाग केला तर ? चोर म्हणून समाजात तोंड दाखवायला जागा उरणार नाही. आणि जर काका मेला तर त्याच्या अफाट संपत्तीची मालकी एलियाला मिळणार होती. पण-पण पलीकडून एक खेडूत येताना दिसत होता. एलियाला पाहून त्यानं रामराम घातला, पण एलिया त्याच्या डोळ्याला डोळा भिडवू शकला नाही. खेडूत निघून गेला अन् एलियानं त्याच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पाहिलं. निरनिराळे उलटसुलट विचार त्याच्या डोक्यात गिरक्या घेत होते.

पूर्वेकडे लालसर गोळा वर येत होता. परंतु सकाळची ती प्रसन्नता आज एलियाच्या मनाला स्पर्शही करू शकत नव्हती. त्यानं आपलं मन दाबून धरण्याचा खूप प्रयत्न केला. काही कविता आठवून पाहिल्या. कोर्टातील गमती आठवण्याचा प्रयत्न केला. काकाची मूर्ती डोळ्यांपुढे आणून पाहिली. परंतु हृदय त्याला चोर चोर म्हणून पुकारू लागले. त्याला सारं असह्य झालं. त्यानं आपले नवे कोरे बूट मोठ्या उद्वेगानं रस्त्याच्या कडेला फेकून दिले. जुनेच बूट परत चढविले. फेकून दिलेल्या नव्या बुटांकडे न पाहताच शक्य त्या त्वरेनं त्याला दूर जायचं होतं.

एकाएकी त्याच्या पायांची गती थांबली. कावऱ्याबावऱ्या नजरेनं तो चौफेर पाहू लागला. रात्रीचा तो क्षण पुन्हा पुन्हा आठवत होता. टोचत होता. कुणीतरी उजळलेल्या त्या काडीनं एलियाच्या जीवनातलं सारं मांगल्य, सारी सद्भावना जाळून टाकली होती. एलिया चटकन मागे वळला. फेकून दिलेले नवे बूट त्यानं उचलले अन् मागे मागे तो देवळाच्या दिशेनं चालू लागला. आता त्याच्या चालीत तेज नव्हतं.

अपराधी मनानं शरीराची शक्तीच जणू नष्ट केली होती. वाऱ्याच्या झोतासवे गवताच्या काडीनं हेलकावे खावे, तसा त्याचा देह हेलकावत होता.

तो देवळात पोचला तेव्हा दुपार झाली होती. आरती केव्हाच संपली होती. देवळात कुणीच नव्हतं. आवारात एक-दोन कुत्री तेवढी पेंगत होती. एलियानं काल चोरलेले बूट गुपचूप पायरीवर ठेवून दिले आणि मग त्याला आठवण झाली की आता काही तरी खायला हवे. अन्नाच्या विचारानं डोक्यात थैमान घातलं. हाताच्या स्पर्शानं त्यानं खिशातली नाणी मोजून पाहिली. परंतु याच क्षणी त्याच्या पायांनी असहकार पुकारला. थांबलेलं शरीर उठायला तयार नव्हतं. एलियानं ते तिथंच लांबविलं अन्—

संध्याकाळच्या आरतीला लोक जमू लागले, तेव्हा वृद्ध पुजाऱ्यानं एलियाला हलवून जागं केलं. आरती संपून प्रसाद ग्रहण करून एलिया बाहेर पडला, तेव्हा अंधार पडला होता. शक्य तेवढे लौकरच काकाच्या घरी जाऊन पोचणे त्याला आवश्यक होते. आजचा चंद्र लौकर असावा. वाराही नव्हता. शक्य त्या त्वरेनं तो चालू लागला.

काकांच्या घराची पायरी चढला नि एका म्हाताऱ्यानं त्याचा मार्ग रोखला.

" आपण आलात ? "

एलियानं नुसतीच मान हलविली नि तो घरात जाऊ लागला. परंतु म्हाताऱ्यानं त्याचा हात धरीत म्हटले, " अरेरे ! तुम्ही थोडेसे लौकर आला असता तर– "

म्हातारा बडबडत होता. एलियाला काहीच समजले नव्हते, पण मग हळूहळू त्याच्या डोक्यात प्रकाश पडला. तशी त्यानं काकांच्या नावानं बोंब ठोकली. याचवेळी म्हाताऱ्याचे शब्द एलियाच्या कानांत लोखंडाच्या रसाप्रमाणं शिरत होते–" आज सकाळपर्यंत तुम्ही त्यांची चौकशीसुद्धा केली नाही, असं पाहून शेवटी त्यांनी आपली सगळी संपत्ती देवळाला—– "

एलियाचा शोकावेग या क्षणी अनावर झाला होता. धाडकन त्याचे शरीर जमिनीवर कोसळले आणि त्याच्या त्या फाटक्या वाहणा पायरीवरून खाली घरंगळून पडल्या.

● ● ●



श्री. ब. मो. पुरंदरे

यांची नवी ऐतिहासिक कादंबरी

# शिलंगणाचं सोनं



मूल्य तीन रुपये

**राजहंस प्रकाशन**

४१९ नारायण, पुणे २

१५ एप्रिल १९६६

# गाय आल्फरेड आल्ड्रेड

लेखक

वि. श्री. जोशी

## भारतीय स्वातंत्र्यासाठी झगडलेले

१७ ऑक्टोबर, १९६३ ला ग्लास्गो येथून प्रसिद्ध होणाऱ्या 'दि वर्ड' (शब्द) या जहाल मतप्रणालीच्या प्रख्यात इंग्रज मासिकाचे संपादक गाय आल्फ्रेड आल्ड्रेड हे दिवंगत झाले. हिंदी स्वातंत्र्याचा ब्रिटिश साम्राज्याच्या प्रत्यक्ष राजधानीमध्ये—लंडन येथेच सर्वप्रथम सतत पुरस्कार करणारा, त्या मतप्रचारामुळे राजद्रोहाचा आरोप पत्करून खडतर कारावास भोगलेला आणि तरीही शेवटपर्यंत आपली ध्येयनिष्ठा तशीच ठेवणारा आल्ड्रेड यांच्यासारखा दुसरा श्रेष्ठ इंग्रज झाला नाही. पण तरीही त्यांच्या निधनाचे वृत्तही हिंदुस्थानात बरेच दिवस आले नाही. कारण सत्ताधारी पक्षाच्या कृपाकक्षेत नसणाऱ्या नितांत स्वातंत्र्यवाद्यांविषयीही रॉयटर्स आणि पी. टी. आय. या प्रमुख वृत्तसंस्था नेहमी झोपाळूपणेच वागत आलेल्या आहेत. त्यामुळे त्यांनी ते वृत्तही इकडे पाठवले नाही आणि नोव्हेंबर, १९६३ चा 'दि वर्ड'चा अंक येथे येऊन ते वृत्त त्यातून कळले नसते तर आपण अजूनही कदाचित या शोचनीय घटनेविषयी अंधारातच राहिलो असतो. स्वतंत्र हिंदुस्थानाने गाय आल्फ्रेड आल्ड्रेड यांचे नाव नेहमी कृतज्ञतेनेच स्मृतीत ठेवले पाहिजे. कारण सत्ताधाऱ्यांच्या वंशाचे नि जातीचे इंग्रज असूनही त्यांनी तसाच उज्ज्वल त्याग हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासाठी केला आहे आणि अमर्याद कष्टही भोगले आहेत.

गाय आल्फ्रेड आल्ड्रेड यांचा जन्म ५ नोव्हेंबर १८८६ ला लंडन येथेच झाला. त्यांचे वडील ब्रिटिश नौदलात लेफ्टनंट होते. पण नौ–सेनानीच्या भटक्या आयुष्यामुळेच त्यांनी स्वतःच्या पत्नीसाठी आणि मुलासाठी स्थिर घर कधीच केले नाही;



# एक जहाल व्यक्तिमत्त्व

त्यामुळे गाय ओल्ड्रेड पाच वर्षांचे असतानाच त्यांच्या आईने पतीचे बिऱ्हाड सोडले आणि लहान गायला घेऊन ती आपल्या वडिलांच्या घरीच राहण्यास गेली.

गायचे हे आजोबा म्हणजेच प. वा. दादाभाई नौरोजी यांच्या ब्रिटिश पार्लमेंटच्या निवडणुकीचे वेळी त्यांना मौलिक सहाय्य करणारे चार्ल्स विल्यम होल्ड्स्वर्थ हे होत. आल्ड्रेड यांच्या कुटुंबात लोकशाही आणि बंडखोर प्रवृत्ती वंशपरंपरेनेच जणू चालत आलेली होती. क्रॉमवेलच्या काळात त्यांचे पूर्वज लोकपक्षाच्या बाजूनेच लढले होते. आपली बंडखोर आणि क्रांतिप्रेमी प्रवृत्ती गाय आल्ड्रेड यांनी या आपल्या पूर्वजांकडूनच उचलली होती. ठराविक चाकोरीतून जाणारे हे बाळ नव्हते शाळेतील गणित इ. नेहमीच्या विषयात त्यामुळेच त्यांचे मन रमेना आणि वयाच्या पंधराव्या वर्षीच त्यांनी शालेय शिक्षणाकडे पाठ फिरवली. पण प्रत्यक्ष जीवनाच्या विश्वविद्यालयात आणि अमर्याद वाचनाच्या आणि ज्ञानलालसेच्या वाटेने त्यांनी असे ज्ञान संपादन केले, की पदवी धारण करणाऱ्या एखाद्या पंडित राजकारण्याच्याही त्याने तोंडात मारावी. या दृष्टीने पाहता आपल्याकडच्या मानवेंद्रनाथ रॉय यांच्याशीच त्यांची तुलना करावी लागेल.

**गीतेचा प्रभाव**

आल्ड्रेड यांचे घराणे सनातनी ख्रिश्चनांचे होते आणि आल्ड्रेड यांनी तर उपाध्याय (priest) व्हावे असाच त्यांच्या नातलगांचा विचार होता. पण आजोबा होल्ड्स्वर्थ यांनी मात्र निरीश्वरवादावरील आणि अराजकवादावरील विपुल पुस्तकेच आल्ड्रेड

यांच्या हातात दिली. विज्ञानवादी बुद्धिवाद हा आल्ड्रेड यांचा ठाम मित्र असल्यामुळे त्यांनीही ही पुस्तके अगदी आधाशाप्रमाणे वाचून काढली. त्यामुळे सनातनी ख्रिश्चन धर्म हाच सर्वश्रेष्ठ धर्म ही त्यांची भावना लुप्त होऊन इतर धर्मांचाही ते तौलनिक अभ्यास करू लागले. प्रो. मॅक्समुल्लर यांचे पौर्वात्य तत्त्वज्ञानाचे श्रेष्ठत्व प्रतिपादणारे वाङमय आणि सर एडविन अॅर्नाल्ड यांच्या भगवद्गीतेच्या भाषांतरासारखी पुस्तके त्यांनी आत्मसात केली. रे. बस यांची जगातील धर्मांवरील व्याख्याने त्यांनी ऐकली. इतर धर्मप्रवर्तकांचे थोरपण त्यांना मान्य होते. पण त्या सर्वांत वीरत्व, तत्त्वज्ञान, न्यायप्रीती आणि आध्यात्मिक मोठेपणाच्या दृष्टीने पाहता भगवान श्रीकृष्णाच्या श्रेष्ठत्वाने त्यांच्यावर अपार मोहिनी घातली. त्याच्या चरित्रापुढे इतर धर्मपुरुष त्यांना नेहमी खुजेच वाटू लागले. या मानसिक घडणीमुळे श्रीकृष्णाचाच कर्मयोग फलाची आशा न् ठेवता त्यांनी सत्तर वर्षे आचरणात आणला यात काही नवल आहे काय ? कारण ऐहिक दृष्टीने वैभव आणि संपत्ती अशी त्यांनी कधी भोगली नाही. ही सुखे देणाऱ्या पक्षांवरची आणि सत्ताधाऱ्यांवरची ध्येयनिष्ठ टीका त्यांनी कधी थांबवली नाही. चार्ल्स व्हॉयसे यांच्या ख्रिश्चन विचारसरणीविरोधी तत्त्वज्ञानाचीही त्यात भर पडली आणि गाय आल्ड्रेड हे पक्के निरीश्वरवादी आणि जहाल क्रांतिकारक आणि समाजवादी बनले !

शाळेला रामराम ठोकून विशीच्या आतच लंडनमधील हॉलोवे भागात त्यांनी तत्कालीन श्रोत्यांना हादरविणारे पहिले प्रकट व्याख्यान दिले. सत्यशोधन आणि वैचारिक स्वतंत्रतेचे भोक्ते म्हणून आपले वर्णन करून खऱ्या समाजवादावाचून जग सुखी होणार नाही, हा संदेश त्यांनी त्यात आणि त्यापुढील भाषणांतून दिला. इंग्लंडमध्ये नंतर अधिकारावर आलेल्या श्रमिक शासनामधील मंत्री जेव्हा आपल्या राजकीय आयुष्याचा श्रीगणेशा करीत होते, त्यावेळी गाय आड्रेड यांनी हे त्यांचे ध्येय मुक्तपणे प्रचारिले होते.

लंडन येथील हाईड पार्क ही उदयोन्मुख चळवळयांच्या जहाल भाषणांची प्रसिद्ध जागा. त्या पार्कमधील "वक्त्यांच्या कोपऱ्यात" ('Speaker's Corner') गाय आल्ड्रेड हे आपली जहाल भाषणे श्रोत्यांना आता अनिर्बंधपणे ऐकवू लागले. समाजवादाच्या प्रचाराच्या जोडीला युद्धविरोधी मतप्रणालीही त्यांच्या भाषणांतून व्यक्त होऊ लागली. कारण, लवकरच बोअर युद्ध सुरू झाले, तेव्हा साम्राज्यवाद्यांना ते या मतांनी झोडपू लागले. ते म्हणत असत, "युद्धे ही स्वार्थी लोकांनी चालविलेली फसवेगिरी आहे. युद्धाने कोणाचाच लाभ होणार नाही. युद्धपिपासूंची (War mongers) प्रतिष्ठा युद्धांवर अवलंबून असल्यामुळे ते ती घडवून आणतात. त्यांना नेहमी विरोधच केला पाहिजे. या युद्धविरोधामुळे ते रंगरूटभरतीच्या (Consaription) विरुद्ध वळवळ करू लागले. सैन्यसत्तावादा (Militrism)ला ते शाप समजतात. पन्नास वर्षांपूर्वीच, आता प्रतिष्ठा पावलेल्या "एका जागतिक

सरकार" (One world Government)च्या कल्पनेचा त्यांनी पुरस्कार केला. त्यांच्या या पुरस्सरतेविषयी राजकीय निरीक्षकांना मोठे आश्चर्य वाटते.

## हिंदी स्वातंत्र्याचा पुरस्कार

१९०६-१९०७ मध्ये आल्ड्रेड हे अराजकांच्या गुप्त संघटनेत शिरले आणि त्याच वेळी इंग्लंडमध्ये असलेल्या रशियन आणि हिंदी क्रांतिकारकांशीही त्यांचा परिचय आला. लंडनमध्ये त्या वेळी स्वातंत्र्यवीर सावरकर हे हिंदी क्रांतिकारकांचे नेते होते. शामजी कृष्ण वर्मा, वीरेंद्रनाथ चट्टोपाध्याय, लाला हरदयाळ अशा तेजस्वी नररत्नांना जहाल क्रांतिकारक बनविणाऱ्या सावरकरांच्या व्यक्तिमत्त्वाची छाप आल्ड्रेड यांच्यावरही लागलीच पडली आणि ते सावरकरांचे आणि हिंदी स्वातंत्र्याचे कट्टर पुरस्कर्ते झाले.

इंग्लंडमध्ये हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याला संपूर्ण पाठिंबा देणारे आल्ड्रेड यांच्यासारखेच दुसरेही काही जहाल ध्येयनिष्ठ होते. त्यांत सर वॉल्टर स्ट्रिकलंड हे बॅरोनेट होते. सरदार आणि श्रीमंत घराण्यात जन्माला येऊनही ध्येयनिष्ठ मते प्रकट केल्यामुळे त्यांना अनंत हालअपेष्टा भोगाव्या लागल्या. ते १८५१ मध्ये जन्मलेले, ट्रिनिटी कॉलेज केंब्रिजमधून बी. ए. झालेले आणि आपल्या बॅरोनेट पदवीचा त्याग केलेले गृहस्थ होते. १९०२ मध्ये त्यांनीच प्रथम हिंदुस्थानात " इंडियन फेडरल रिपब्लिक " स्थापन झाले पाहिजे असा हिरीरीने प्रचार केला. त्यांनी सर्व जगभर प्रवास केला, तोही नेहमी तिसऱ्या वर्गातून, आणि ते राहत ते श्रमिक वस्तीत. त्यांना बऱ्याच भाषा येत. ते त्या उत्तम बोलतही. त्यांनी भिन्न भिन्न भाषेत बरेच निबंध लिहिले होते. १९०९ मध्ये गाय आल्ड्रेड यांचा त्यांच्याशी परिचय झाला. हिंदी स्वातंत्र्याचा, अराजकवादाचा आणि सैन्यसत्ताविरोधाचा पुरस्कार करणाऱ्या आल्ड्रेडना त्यांनी आपल्या संपत्तीचा काही भाग विश्वस्त म्हणून दिला. त्यातूनच आल्ड्रेड यांनी आपले तेजस्वी नियतकालिक वेळोवेळी चालविले. आपल्या ' बकुनिन प्रेस 'ला त्यांचेच नाव आल्ड्रेड यांनी त्यांची स्मृती म्हणून पुढे दिले. ते पुढे जावामध्ये बुइतेनझोर्ग येथे १९३८ मध्ये वारले. त्यांच्या हिंदी स्वातंत्र्याच्या पुरस्काराने नि ब्रिटिश साम्राज्यवाद्यांच्या निंदेने संतप्त होऊन लॉर्ड कर्झन याने १९२० मध्ये तो फॉरीन सेक्रेटरी असता त्यांची ब्रिटिश देशाटनदर्शिकाच (पासपोर्टच) काढून घेतली आणि त्यांना देशवंचित केले. पण शेवटपर्यंत त्यांनी त्याची पर्वा केली नाही. उलट १९३७ पर्यंत निरनिराळे प्रक्षोभक निबंध लिहून त्यांनी आपली ध्येयनिष्ठा कायम ठेवली !

त्यांच्यासारख्यांच्या खंबीर पाठिंब्याने आपल्या मुद्रणालयाचे काम आल्ड्रेड स्वतःच्या ध्येयप्रचारासाठी करीत असताच त्यांना कुठून तरी शासन करण्यास टपलेल्या ब्रिटिश सरकारास तशी संधी १९०९ मध्ये मिळाली. पंडित शामजी कृष्ण वर्मा हे त्या वेळी इंग्लंडात " इंडियन सोशियॉलॉजिस्ट "मध्ये क्रांतिकारक पत्र

चालवीत असत. त्याचा संपादक होर्सले यास विग्रांच्या गौरवपर त्या पत्रात आलेल्या लेखावरून राजद्रोहाच्या आरोपावरून ब्रिटिश सरकारने अभियोग करून तुरुंगात पाठवले. कृष्ण वर्मांना दुसरा कोणी मुद्रक लंडनमध्ये मिळेना. हिंदी क्रांतिकारकांची ही अवस्था पाहताच आल्ड्रेड यांनी ३० मार्च १९०९ ला कृष्ण वर्मा यांना पत्र लिहिले की, "... छळाच्या काळात मला आपल्या कार्यास हातभार लावता येतो की नाही, ते पाहण्याचे मी ठरविले आहे. हें माझे (लंडन) येथील घरच "इंडियन सोशियॉलॉजिस्ट"चे लंडन येथील कार्यालय होऊ द्या. मी स्वत: ते पत्र येथे विक्रीस ठेवीन. मग माझा काय व्हावयाचा तो छळ सोसण्यास मी सिद्ध आहे." दुसऱ्या पत्रात आल्ड्रेड यांनी शामजींना लिहिले, "... वरील अभियोगाचा हेतू तुम्हाला तुमचे पत्र प्रसिद्धच करता येऊ नये हा आहे. मी तुमच्या पाठीशी उभे राहण्याचे ठरविले आहे. ब्रिटिश संस्कृतीने आज अवलंबिलेल्या सर्व धिक्कारार्ह ढोंगांविरुद्ध आपल्यासमवेत राहणारा–आपला आल्ड्रेड."

१९०८ चा "इंडियन सोशियॉलॉजिस्ट" चा अंक मग पुढील आव्हानात्मक टीपेसहित आल्ड्रेड यांनी प्रसिद्ध केला. "हे पत्र घन्यासाठी गाय ए. आल्ड्रेड यांनी बकुनिन प्रेस, ३५ सॅनलेक रोड, शेफर्ड्स् बुश, वेस्ट येथे मुद्रित आणि प्रकाशित केले."

## धावते विचार

याच अंकात आल्ड्रेड यांनी काही ("Passing Reflections") 'धावते दृष्टिक्षेप' लिहिले होते. त्यांतील काही तेजस्वी अवतरणे अशी होती :

"कृष्ण वर्मा यांनी स्वसंरक्षणासाठी लिहिलेली काही पत्रे प्रसिद्धून "टाईम्स" ने राजद्रोह केला आहे, असे अॅटर्नी जनरल म्हणतात. कृष्ण वर्मावर सर्व प्रकारचे हल्ले चढविणे हे वैध होय. त्यांना स्वत:चा बचाव करू देणे हा मात्र अक्षम्य गुन्हा! न्याय असाच असतो!"

"आरोपाविना किंवा अभियोगावाचून केवळ लाचखाऊ आणि अविश्वसनीय म्हणून प्रसिद्ध असलेल्या पोलिसांच्या सांगण्यावरून घरादाराला पारखे करण्यात येत आहे. हिंदुस्थान देशाबाहेर तेथील पैसा ओढून नेणाऱ्या ६५०० विदेशीय सत्ताधाऱ्यांकडून ३००,०००,००० तद्देशीय जनतेचे जीवित आणि स्वातंत्र्य यांची विल्हेवाट लावण्यात येत आहे."

"कृष्ण वर्मा जर लंडनला आलेच तर त्यांना पकडले जाईल. या पत्राला हिंदुस्थानात बंदी झालेली आहे. घरी त्यांचा छळ चालला आहे. स्वतंत्र वृत्तपत्रसंस्थेच्या संरक्षणासाठीच मी त्यांचे मुद्रण अंगीकारले आहे!"

याच अंकात "राजद्रोह" या विषयावर एक लांबलचक लेख आल्ड्रेड यांनी लिहिला. त्यात एमेट, होमर, हेलवेटियस् मॉंटेस्क्यू इ. राजकारणपंडितांच्या लिखाणाच्या आधारे हिंदी स्वातंत्र्याची मागणी कशी न्याय्य आहे, ते मूलभूत मानवी हक्कांच्या अनुरोधाने त्यांनी स्पष्ट केले होते आणि त्या लेखाचा असा

प्रक्षोभक शेवट केला होता– " हिंदुस्थानात ब्रिटिश राजवटीमुळे तेथील अशांततेचे अवैध मूळ कारण जर इतर न्याय्य मार्गांनी नष्ट करता येत नसेल, तर दुसऱ्या मार्गाच्या अभावी, व्यक्तीच्या स्वातंत्र्याआड येणारे अरिष्ट प्रत्यक्षपणे नष्ट करणे हे न्याय्य आहे. सरकारनेच हुकूमशाही आणि अनैर्बंधिक सत्तेची घोषणा केल्यामुळे हुकूमशाहीला क्रांतीनेच उत्तर देण्यास लोकांना जणू उद्युक्त केले आहे ! "

हे विचार भर लंडनमध्ये व्यक्त करणाऱ्या आल्ड्रेडना ब्रिटिश सरकार सुटे कसे सोडणार ? "इंडियन सोशियॉलॉजिस्ट" चा हा अंक बाहेर पडताच सरकारने " राजद्रोहा "च्या आरोपाखाली त्यांना पकडून त्यांच्यावर अभियोग भरला. आल्ड्रेड यांचा हा अभियोग "बोस्ट्रीट" पोलीस-कोर्टात आणि नंतर "ओल्ड बेली" कोर्टात न्या. कोलरीज यांच्यापुढे चालला. या अभियोगात पुढे सावरकरांविरुद्ध काम करणारे मि. रौलट हे सरकारचे वतीने उभे राहिले होते. आल्ड्रेड यांनी स्वतःचा बचाव स्वतःच केला. त्यांनी ज्यूरीला उद्देशून पन्नास मिनिटे भाषण केले. त्यात हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचा निर्भय पुरस्कार केला. ज्यूरीने विचारविनिमयासाठी बाहेरही न जाता त्यांना दोषी ठरवले. अभियोगाचा निर्णय देताना न्या. कोलरीज गाय आल्ड्रेड यांना उद्देशून म्हणाले, " गाय आल्फ्रेड आल्ड्रेड ! तू तरुण, पोकळ बढाईचा आणि मूर्ख आहेस. तुझ्या विधानांना त्यांच्या वास्तविक पात्रतेपेक्षा फाजील महत्त्व इतरांकडून दिले जाते, हे तुला माहीत नसेल. हे न्यायालय तुला पहिल्या वर्गात बारा महिन्यांची शिक्षा ठोठावत आहे ! "

आल्ड्रेड यांचा हा अभियोग पुष्कळ गाजला. नैर्बंधिक प्रतिवृत्तांतही त्याची नोंद झाली, पण न्यायाधीशांचे वरील उद्गार आल्ड्रेड यांनी भूषणाप्रमाणे मस्तकी धारण केले. १९४७ मध्ये हिंदुस्थान स्वतंत्र झाल्यावर ते उद्गारले, "माझी विधाने न्या. कोलरीज यांना वाटली तेवढी मूर्खपणाची नव्हती एकंदरीत ! आणि ती जर असती तर ब्रिटनमधील अॅटली यांच्या सरकारनेही तोच मूर्खपणा आता केलेला आहे. कालगतीच्या चक्राने एक संपूर्ण फेरा केलेला दिसतो." त्यांनी १९०९ मध्ये म्हटले होते, " १८५७ चे बंड एक दिवस हिंदुस्थानात स्वातंत्र्य-युद्ध म्हणून गणले जाईल; धिंग्रासारखे देशभक्त हिंदी स्वातंत्र्य-युद्धातले हुतात्मे ठरतील आणि हिंदुस्थान स्वतंत्र राष्ट्र होईल !" त्यांचे हे शब्द अक्षरशः खरे ठरले होते.

## सावरकरांच्या मुक्ततेसाठी

आल्ड्रेड हे वरील शिक्षा ब्रिक्स्टन कारागारात भोगीत असतानाच स्वा. सावरकरांनाही १३ मार्च, १९१० ला ते पॅरिसहून व्हिक्टोरिया स्थानकावर येताच अटक करण्यात येऊन त्याच कारागारात आणण्यात आले. त्यांना पकडणारा इन्स्पेक्टर मॅकार्थी यानेच आल्ड्रेड यांना पकडले होते. पुढे हिंदुस्थानात परत नेले जात असता सावरकरांनी मार्सेलिस येथे निसटून जाण्याचा प्रयत्न केला. पण त्यांना पकडून हिंदुस्थानात नेण्यात आले. आल्ड्रेड तुरुंगातून सुटून आले, ते हिंदी स्वातंत्र्याविषयीचे

त्यांचे प्रेम अधिक गाढ झालेले असेच. सुटून येताच त्यांनी स्ट्रिकलँड यांच्या नावाने चाललेल्या मुद्रणालयात "Herald of Revolt" ("बंडाचा उद्घोषक") हे आपले नवे मासिकपत्र १९१० च्या ऑक्टोबरमध्ये सुरू केले. हे मासिकही तशाच जहाल मतप्रणालीचे होते.

याच वेळेस सावरकरांची मार्सेलिस येथील अटक अनैर्वधिक होती म्हणून त्यांच्या सुटकेसाठी त्यांनी "सावरकर मुक्तता समिती" स्थापन करून तिच्या वतीने पहिले पत्रक काढले. त्याचा मथळा होता–"To the English Proletariat." ("इंग्लिश श्रमिक जनतेस!") त्या जनतेला उद्देशून काढलेल्या या पत्रकात सावरकरांच्या धाडसी उड्डाणाचा सर्व वृत्तांत सांगितल्यावर पुढे म्हटले होते, "फ्रान्सच्या किनाऱ्या-वर उतरल्यावर सावरकरांना आश्रयाचा हक्क होता. सर्व फ्रेंच वृत्तपत्रांनी त्याचा पुरस्कार केलेला आहे. इंग्रज समाजवाद्यांनीही त्याचा पुरस्कार करण्यास आता पुढे आले पाहिजे" 'हेरल्ड ऑफ रिव्होल्ट'मध्ये त्यांनी फ्रेंच मुख्य प्रधान ब्रियाँ यांच्या विश्वासघातावर झोड उठवून म्हटले होते, की त्यांनीच "सावरकरांना इंग्रजांना विकले." ("Sold Savarkar to the English!") आणि "फ्रेंच सरकारने फ्रान्सच्या अधिराज्यत्वाचा (Sovereignity) सुद्धा द्रोह केला" आणि म्हणून त्याचाही त्यांनी धिक्कार केला.

१९११ च्या नोव्हेंबरमध्ये सावरकरांना अंदमानात नेण्यात आल्याचा वृत्तांत देऊन "सावरकरांना सोडा" हे आंदोलन त्यांनी जगद्व्यापी केले. बेल्जियममधील "La Societe Nouvelle," डोरा मार्सडेन यांचे स्वित्झर्लंडमध्ये झूरिच येथून प्रसिद्ध होणारे "Der Wanderer" हे जर्मन मुखपत्र, "Le Libertaire" हे फ्रेंच वृत्तपत्र आणि इंग्लंडमधील आग ओकणारे "Justice" पत्र यांनी त्या विषयावर लेख लिहून तीच मागणी उचलून धरली आणि ("Savarkar Infamy") "सावरकर प्रकरणातील कुप्रसिद्धी" या विषयावर ब्रिटिश आणि फ्रेंच सरकारवर निकराचे हल्ले चढविले.

'हेरल्ड ऑफ रिव्होल्ट'च्या ऑक्टोबर १९१२ च्या अंकात आल्ड्रेड यांनी आता प्रसिद्ध असलेले सावरकरांचे एअर-गन हातात असलेले दुर्मिळ छायाचित्र प्रथमच प्रसिद्ध केले आणि त्याखाली वर्णन लिहिले, 'V. D. Savarkar, the Hindu patriot, who will be released from the Andaman prizon on 10th December 1960'. [वि. दा. सावरकर, हिंदू देशभक्त–१० डिसेंबर १९६० ला अंदमानच्या कारागारातून ज्यांची सुटका होईल!] त्याच अंकात सर वॉल्टर स्ट्रिक-लँड यांनी 'अंदमानमधील जिणे' हा लेख लिहून प्रत्येक महिन्यात एक दोन राजबंद्यांचे तरी येथे वैध वध होतात, अशी माहिती दिली. स्वत: आल्ड्रेड यांनी पुण्याच्या 'मराठा'आणि कलकत्त्याच्या इतर पत्रांवरून इंदुभूषण रॉय यांच्या खाल्लेल्या फाशीचा हृदयद्रावक वृत्तांत दिला. या लिखाणामुळे जगभर जी आग पसरली

त्याने चिडून जाऊन हिंदुस्थानात त्याच्या सहस्रावधी प्रती जरी आल्या तरी तो अंक येताच राजद्रुत केल्याचे हिंदुस्थान सरकारने घोषित केले. तरीही आपल्या पत्राचे दोन सावरकर–विशेषांक काढून सावरकरांच्या सुटकेचा आल्ड्रेड यांनी पाठपुरावा केला.

हे आंदोलन आल्ड्रेड यांनी पहिले महायुद्ध सुरू होईपर्यंत चालवले. त्यांचे पत्र हे नेहमी आर्थिकदृष्टचा लाभकारक नव्हतेच, पण प्रसंगी जेवणासही टाळा देऊन त्यांनी ते स्वतःचा पैशांतील शेअरची पै व्यय करूनही टिकवून धरले होते. प्रथम महायुद्ध सुरू होताच त्यांनी रंगरूट भरतीविरोधी (Anticonscription) मोहीम उघडली, त्या वेळी नंतरच्या श्रमिक सरकारातले वसाहतमंत्री सर आर्थर क्रीच जोन्स हे त्यांचे सहकारी होते. त्यांचेसह आल्ड्रेड यांना त्या प्रकरणी सरकारने अटक केली नि दोघांनाही कारावास भोगावा लागला. त्यांचे ' हेरल्ड ऑफ रिव्होल्ट ' पत्रही नंतर बंद पडले.

## समाजसत्तावादी आल्ड्रेड

युद्ध संपल्यावर आल्ड्रेड हे ' Red Commune ' (रेड कम्यून) या पत्रात समाजसत्तावादाचा प्रचार करू लागले. त्यांतील लेखामुळे १९२१ मध्ये त्यांना राजद्रोहाच्या आरोपावरून पुन्हा पकडले गेले. त्यांच्यावर अभियोग भरला गेला आणि त्यात त्यांना पुन्हा एक वर्ष कारावासाची शिक्षा भोगावी लागली. त्या वेळी त्यांच्यासमवेत इतरही कम्युनिस्ट आरोपी होते. या अभियोगातही त्यांनी स्वतःचा बचाव स्वतःच केला आणि वृत्तपत्रांच्या स्वातंत्र्याची बाजू न्यायालयात मांडली.

१९२२ पासूनच आल्ड्रेड यांनी ब्रिटिश पार्लमेंटची निवडणूक लढविण्यास प्रारंभ केला. पैसा जवळ नाही. पक्ष नि पक्षतेने यांना खूष करणारी मतेही ते व्यक्त करीत नसत. त्यामुळे आल्ड्रेड यांनी सहावेळा निवडणुका लढवूनही ते कधीही विजयी झाले नाहीत, पण त्याची त्यांना खंत वाटली नाही. आपण जिंकणार नाही हे माहीत असूनही ते निवडणूक लढवीत राहिले. याचे कारण सांगताना ते म्हणाले, " माझा जन्मच मुळी चौकसपणा, युयुत्सु वृत्ती आणि समताप्रेम यांच्यासाठी झालेला आहे. मी सर्वत्र आयुष्यभर विचित्र गटातच वावरत आलेलो आहे. माझ्याशी संबंध आलेल्या भिन्न भिन्न गटाच्या नेत्यांचा रोष पत्करत वावरत आलेलो आहे ! पण माझ्या दृष्टीने निवडणूक हीच प्रचाराची संधी आणि आपल्या मताचा प्रसार करण्याचा मोका देते आणि त्या वेळीच जनतेला मी शिक्षित करू शकतो !" त्यांच्या सर्व निवडणुकीत त्यांची तारणे (Deposits) बुडाली, तर ते म्हणाले, " ही बुडालेली तारणे म्हणजे प्रचारात घातलेले भांडवलच होय !"

१९३६ मध्ये जनरल फ्रँको याच्या सेनाविपत्याचे स्पॅनिश लोकशाहीवाद्यांशी यादवीयुद्ध सुरू झाले, त्या वेळी अपेक्षेप्रमाणे आल्ड्रेड यांची सहानुभूती लोकपक्षाकडेच होती. बॉब रॉबर्टस आणि जरव्हिस या त्यावेळच्या दोन प्रसिद्ध इंग्रज वक्त्यां-

समवेत हाईड पार्क (लंडन) येथे आल्ड्रेड यांची प्रत्यही त्या विषयावर भाषणे सुरू झाली. त्यांचा प्रचार आंतरराष्ट्रीय समाजवादाच्या आघाडीवरून केलेला असे. सभा संपल्यावर त्या विषयावरील प्रचार वाङ्मय (Marble Arch) ते स्वतःच वाटीत. 'मार्बल आर्क 'जवळ त्यांनी तशी दिलेली व्याख्याने अजूनही श्रोत्यांच्या स्मरणात आहेत.

इतकेच नव्हे, तर त्यांच्या एक निकटच्या स्त्री-सहकारी एथेल मॅक्डोनल्ड या तर स्पॅनिश लोकपक्षाच्या बाजूने लढण्यास थेट स्पेनमध्येच गेल्या. बार्सिलोना नभोवाणी-वरची त्यांची भाषणे स्पॅनिश क्रांतिकारकांच्या कैवाऱ्यांना भारून टाकीत. स्पेनमधील यादवीयुद्धानंतर एथेल परत इंग्लंडला आल्या आणि आल्ड्रेड यांचेसमवेत कार्य करीत राहिल्या. त्या १९६० पर्यंत आल्ड्रेड यांच्या 'दि वर्ड' पत्राच्या कार्यालयांतही काम करीत होत्या. नंतर त्या अतिशय रुग्णाइत झाल्या तेव्हा रशियातूनही विशेष औषधे मागवून त्यांची आल्ड्रेड यांनी शुश्रूषा केली; पण शेवटी त्या डिसेंबर १९६२ मध्ये मृत्यू पावल्या.

आल्ड्रेड यांनी स्वतः प्रचाराची आघाडी शेवटपर्यंत सोडली नाही. १९३८ मध्ये त्यांनी आपले शेवटचे मासिकपत्र 'दि वर्ड' (The Word) हे ग्लॅसगो येथे संयुक्त समाजवादी आंदोलनाचे मुखपत्र म्हणून काढले. त्यातूनच ते आपली मतप्रणाली शेवटपर्यंत प्रचारीत राहिले. दुसरे महायुद्ध सुरू होताच हिंदुस्थानच्या स्वातंत्र्य-लढ्यालाही जोर चढला. त्याची प्रगती आल्ड्रेड हे आस्थेने पाहत होते. १९४७ मध्ये हिंदुस्थान स्वतंत्र झाला, तेव्हा त्यांच्या आनंदाला पारावार राहिला नाही. पण १९४६ मध्ये मुसलमान जातीयवाद्यांनी येथे हिंदूंची कत्तल आरंभली, तेव्हा त्या अत्याचारांची प्रसिद्धी वर्डमधून सतत करून हिंदुस्थानच्या फाळणीलाही त्यांनी शेवटपर्यंत विरोध केला. याच काळात ३५ वर्षांनंतर त्यांनी स्वातंत्र्यवीर सावरकरांशी पुन्हा संबंध प्रस्थापिले. त्यांच्याविषयीचा त्यांचा आदर शेवटपर्यंत तसाच राहिला. १९४८ मध्ये सावरकरांना गांधीवधाच्या अभियोगात गोवण्यात आले, तेव्हा त्यांच्या-साठी बचाव-निधी उभारण्याची आणि सावरकरांना हिंदुस्थानात येऊन भेटण्याची त्यांनी सिद्धता दाखविली, पण हिंदुस्थान सरकारने त्यांना तसे करण्यास अनुज्ञा दिली नाही. 'दि वर्ड 'चा पसारा, आज गेला, उद्या कसा जाईल या विवंचनेत हाकारणाऱ्या आल्ड्रेड यांचे केवढे हे ध्येयप्रेम नि मित्रप्रेम !

## जहाल आणि विरोधी भूमिका

पुष्कळदा अपेशी ठरलेल्या मोठ्या ध्येयासाठी एकाकीच लढलेल्या आल्ड्रेड यांनी समाजवाद, 'नाहीरे' जनतेचे हित आणि सच्च्या लोकशाहीचा पाठपुरावा इ. ध्येयां-साठी सर्वप्रथम लढा दिला. त्यामुळे त्यांच्याविषयी सार्वत्रिक प्रशंसा वसत असे. 'स्कॉटिश एक्स्प्रेस ' या वृत्तपत्रात १७ नोव्हेंबर, १९६२ च्या अंकात त्यांचे आलेले हेच वर्णन पाहा ना ! पत्राचा वार्ताहर चार्ल्स ग्रॅहॅम त्या वेळच्या वुडसाईड विभागाच्या

पार्लमेंटच्या पोट-निवडणुकीविषयी म्हणतो, " ग्लॅसगो विश्वविद्यालयात भरलेल्या सभेला शिक्षण या विषयावरील प्रश्नांना उत्तरे देण्यासाठी पाच किंवा सहा उमेदवार आले होते, पण वक्त्यांना मोठे आश्चर्य वाटले, की त्या संध्याकाळची मुख्य व्यक्ती मात्र स्वतंत्र समाजवादी गाय आल्ड्रेड हेच होते. त्यांच्या राजकीय बंडखोरीचा पाठपुरावा करणाऱ्या श्रोत्यांनी त्यांचे उत्सुकतेने स्वागत केले. कारण, तशा तऱ्हेची नास्तिक भाषणे ब्रिटिश विश्वविद्यालयाच्या अत्युत्तम परंपरांमध्ये चांगलीच बसतात." 'ग्लॅसगो हेरल्ड' याच दिवसांत म्हणाले, "वुडसाईड पोट-निवडणुकीतील पहिली सलामी झडली. ती झाडली स्वतंत्र समाजवादी उमेदवार गाय आल्ड्रेड यांनी—शक्य त्या सर्व बाजूंनी. आपल्या ७६ व्या वाढदिवसापूर्वी आणि पहिल्या सार्वजनिक भाषणाच्या ६० व्या वाढदिवशी बोलताना आल्ड्रेड यांनी श्रमिक पक्षाचे (Labour party) वर्णन 'अप्रामाणिक लोकांचा (crooks)' पक्ष असे केले आणि हुजूर पक्षाला त्यांनी 'ठगांचा पक्ष' म्हटले. ... ते म्हणाले, की भांडवलदारी व्यवस्थेने निर्माण केलेली घाण नाहीशी करण्याच्या प्रयत्नातच त्यांनी आपले जीवन व्यतीत केले आहे. तेच पत्र दुसऱ्या एका अंकात म्हणाले, "त्यांचे 'दि वर्ड' या नावाच्या मासिकपत्राची ज्या शब्दांत जनतेत प्रसिद्धी केली जाते, त्याच शब्दांत म्हणायचे तर आल्ड्रेड हे अती डाव्या परंपरेत बसतात. त्यांच्या सभांना श्रमिक किंवा इतर पक्षांच्या सभांपेक्षा अधिक गर्दी जमे. त्यांच्या अनिर्बंध समाजवादी, लोकसत्तावादी आणि निःसंकोचपणे केलेल्या तारस्वरातील प्रचाराची भाषणे ऐकण्यासाठीच ती जमे. 'बेलफास्ट न्यूजलेटर' पत्राच्या लंडनच्या संपादकाने लिहिले, "महायुद्धापूर्वी कितीतरी वर्षे आधी आल्ड्रेड हे पार्लमेंटविरोधी कम्युनिस्ट फेडरेशनचे सदस्य होते. मला वाटते, की ते एकटेच सदस्य असे आहेत की जे, ज्या कम्युनिस्टांची ते निंदानालस्ती आणि धिक्कार करीत त्या कम्युनिस्टांपेक्षाही इतके कडवे आहेत, की त्यांच्यापुढे हॅरिपॉलीट हेसुद्धा एक प्रतिगामी टोरी भासावेत !"

विश्वविद्यालयाची कोणतीही पदवी नसतानाही आल्ड्रेड हे उत्तम इंग्रजी लिहीत आणि साठ वर्षांवर राजकारणात घालविलेल्या आयुष्यामुळे माणसे आणि घटना यांची सूक्ष्म माहिती त्यांच्या कराग्रावरच जणू वसत असे. गरिबांचा कळवळा त्यांच्या नसानसांत भरलेला असे. अन्याय झालेल्या व्यक्तीला आसरा हवा असेल तर तिने आल्ड्रेड यांचेकडे जावे, अशी परिस्थिती होती. तिच्या अन्यायाला ते व्यास-पीठावरून आणि 'दि वर्ड' या पत्रातून त्वेषाने वाचा फोडीत असत. एका अपघातात ट्रॅम कंपनीमधील एका नोकराचे निधन झाले; तर त्याच्या विधवेला भरपाई मिळावी म्हणून त्यांनी एक प्रकरण सतत दोन वर्षे सर्वोच्च अधिकाऱ्यापर्यंत झुंजवले.

आल्ड्रेड यांचे व्यक्तिमत्त्व भव्य आणि आव्हानपूर्ण होते. त्यांची भव्य मुद्रा, सरळ नाक, अर्धवट अंतर्मुख दृष्टीचे डोळे, रुंद जबडा, गौरवर्णी धिप्पाड बांधा

पाहणाऱ्यावर चटकन् छाप पाडी. ७७ व्या वर्षीसुद्धा वार्धक्याची विशेष छटा त्यांच्यामध्ये दिसत नसे. त्यांची मते न पटणाऱ्यांनाही त्यांच्याविषयी आदर वाटे. 'दि वर्ड'च्या कार्यालयात मोडक्या टेबलावरील मुद्रित पत्रके, मासिके आणि कात्रणे यांच्यामागे ते काम करीत बसलेले असता किंवा व्हिक्टोरिया राणीच्या काळातील गुडघ्यापर्यंतच्या तुमानीत, घोटा बंद करणाऱ्या बुटांत ग्लॅसगोच्या रस्त्यावरून ते जात असत, म्हणूनच लोकांमध्ये त्यांच्याविषयी आस्था असे. 'स्कॉटिश डेली मेल'मध्ये त्यांचे सुंदर शब्दचित्र रंगविताना एडवर्ड अॅशटन म्हणाले, "निवडणुकीत मिळालेल्या पराभवानंतरही आल्ड्रेड हे अजून आनंदी, बंडखोर, हास्यवदनाचे दुर्दम्य आडमुठेच राहिले आहेत. कारण, आयुष्यातील ७६ वर्षांपर्यंत ते कोणत्या ना कोणत्या गोष्टीविरुद्ध पण लढत आलेले आहेत. हा सुदृढ, वृत्तीने स्वमत प्रतिपादन करणारा माणूस ७६ वर्षांचा असेल यावर विश्वास ठेवणेच अशक्य आहे. त्यांचे सरळ मागे फिरविलेले काळे केस फार पिकलेलेही नाहीत. त्यांच्या काळचामोर दाट भुवया ते एखादा मुद्दा स्पष्ट करू लागले, की खालीवर होतात त्या पाहताना गंमत वाटते.

"पण त्यांच्याजवळ सुवर्णाप्रमाणे मौल्यवान गोष्ट कोणती असेल तर ती त्यांच्या शब्दांचा अखंड ओघ ही होय. ध्वनिक्षेपक नव्हते, तेव्हा लोकांना काही संदेश द्यावयाचा असेल तर मनुष्यास आपल्या आवेशाच्या आणि छातीच्या सामर्थ्याच्याच जोरावर आपले भाषण लोकांपर्यंत पोचवावे लागत असे. त्या काळी, रस्त्याच्या कोपऱ्यावरील सभांतून सभावक्तृत्व शिकलेल्या वक्त्याच्या आवाजातील खणखणीतपणा आणि आपले म्हणणे मान्य करावयास लावणारा आग्रह त्यांच्या आवाजात आहे.

"राजकारणातील अगदी निरनिराळ्या टोकांकडच्या लोकांनाही ते भेटलेले आहेत. चळवळीच्या इतिहासात त्यांपैकी काहींची आता नुसती नावेच राहिली आहेत. दुसऱ्या काहींना अधिक मोठे नाव मिळाले आहे. गाय आल्ड्रेड यांचे वैयक्तिक सामर्थ्य आणि सार्वजनिक परिणामहीनतेचे कारण माझ्या मते हे, की ते नेहमी विरोधी विचारसरणीच अंगीकारतात आणि कोणाशीही समझोता करणे त्यांना शक्य नसते !"

### स्फुट लेखन

आल्ड्रेड यांनी बरीच पुस्तके नि राजकीय पत्रके लिहिली आहेत. 'Dogmas Discarded' (अव्हेरलेल्या पुरातन समजुती), 'At grips with war' (युद्धविषयांशी झोंबी), 'Socialism and Parliament' (समाजवाद आणि पार्लमेंट) ही त्यांतील प्रमुख होत. मृत्यूपूर्वी तीन वर्षे त्यांनी आत्मचरित्राचे दोन भागही पुरे केले, ते 'No Traitor's Gait' (ध्येयनिष्ठाची वाटचाल) या नावाखाली होत. ते अत्यंत वाचनीय आहेत. हे आत्मचरित्र पुरे करावयास आल्ड्रेड जगले असते तर इतिहासाचा फार लाभ झाला असता.

गेल्या ६ ऑक्टोबरला आल्ड्रेड यांनी आपले सार्वजनिक सभेतील शेवटचे भाषण

केले. ५ नोव्हेंबरला येणाऱ्या आपल्या ७७ व्या वाढदिवसाच्या आधी काही दिवस आपली शेवटची सभा होईल, असे त्यांनी त्या वेळी श्रोत्यांना सांगितले होते. ते म्हणाले, "त्यानंतर दुसऱ्या कोणीतरी हे कार्य चालवायला पुढे आले पाहिजे."

आल्ड्रेड हे विवाहित होते. त्यांना एक मुलगा आहे. गेल्या फेब्रुवारीत त्यांना हृदयविकाराचा झटका आला आणि त्यांना रुग्णालयात हलविण्यात आले. पण तेथे फक्त एकच रात्र राहून वैद्यकीय सल्ल्याविरुद्धही तेथून ते घरी निघून गेले. फक्त थोडया दिवसांच्याच विश्रांतीनंतर स्ट्रिकलँड प्रेसमध्ये ते जाऊ लागले आणि प्रत्यही बरेच तास कामात तेथे घालवीत. हा त्यांचा क्रम मृत्यूपूर्वी एक आठवडा-पर्यंत चालला होता. वरील सभेच्या वेळीही ते फार थकले होते आणि त्यांच्यासाठी आणलेल्या टॅक्सीपर्यंत त्यांना हात देऊनच पोचवावे लागले; पण तरीही ते त्यानंतर प्रेसमध्ये जातच राहिले आणि बराच पत्रव्यवहार त्यांनी लिहिला. नेहमी ते स्वत:च आपले लेखन करीत; पण नोव्हेंबर १९६३ च्या 'दि वर्ड'साठी लेख लिहीत असताना मात्र त्यांच्या हातात टाक नीट राहत नाहीसा झाला. नंतर त्यांनी आपल्या टंकलेखकास लेखाचा उरलेला भाग टंकलिखित करण्यास सांगितला. त्याचे नाव होते– "७७ व्या वाढदिवशी माझे विचार!" त्यांना स्वत:च्या मृत्यूची चाहूल लागली होती, असे त्यांच्या वरील उद्गारावरून दिसते. सरतेशेवटी बुधवार दि. १६ ऑक्टोबर, १९६३ ला दुपारी १२–१५ वाजता त्यांचे प्राण त्यांचा नश्वर देह सोडून गेला. आल्ड्रेड जन्मभर नास्तिक होते. त्यांनी मृत्यूनंतरही आपला देह वैद्यकीय विज्ञानाला दिला जावा अशी इच्छा व्यक्त केली होती! ती पूर्ण केली गेली.

गाय आल्फ्रेड आल्ड्रेड हे दारिद्र्याशी झगडत, विपत्तींशी टकरा देत दिवंगत झाले; पण त्यागाचा, ध्येयनिष्ठेचा आणि हालअपेष्टांना न भीता कार्य करीत राहण्याचा वारसा मागे ठेवून ते गेले. तो वारसा त्यांच्याच शब्दांत एकदा व्यक्त झालेला आहे. ते म्हणाले, "मी प्रतिगामित्वाचा अजिक्य आणि अजित असा शत्रू आहे. फक्त कबरच मला गप्प करू शकेल. माझा देह ज्वालेमध्ये नष्ट होईल; पण माझे लिखाण माझी आग पेटवील, की तीत प्रतिगामी वृत्ती जळून खाक होतील." त्यागाविषयी आणि ध्येयासाठी भोगलेल्या हालअपेष्टांविषयी ज्यांना ज्यांना म्हणून आदर आहे, अशी सर्वांची मस्तके हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासाठी आल्ड्रेड यांनी केलेला त्याग आणि भोगलेल्या हालअपेष्टा आठवताच त्यांच्या स्मृतीस आदराने प्रणाम केल्यावाचून राहणार नाहीत!

● ● ●

# ज्ञा न वि ज्ञा न

## □ रशियातील संशोधन-प्रगती

चंद्राच्या कक्षेत फिरणारा पहिला मानवनिर्मित उपग्रह निर्माण करण्यात यश मिळवून अंतराळ–संशोधनात आपण अमेरिकेच्या पुढे आहोत, हे रशियाने पुनः एकदा सिद्ध केले. स्टालिनच्या निधनानंतर शास्त्रीय संशोधनावर रशियात बराच भर दिला जात आहे. तेथे दरवर्षी अमेरिका व पश्चिम युरोपपेक्षा अधिक विद्यार्थी 'अप्लाइड सायन्स'मध्ये तयार होत आहेत. 'अॅकॅडमी ऑफ सायन्सेस' ही संस्था अडीच लाख शास्त्रज्ञांना संशोधनाच्या बाबतीत मार्गदर्शन करते. जगात निरनिराळ्या ठिकाणी चालू असलेल्या संशोधनाची माहिती रशियन शास्त्रज्ञांना लौकरात लौकर उपलब्ध व्हावी यासाठी अशा माहितीचे भाषांतरित उतारे प्रसिद्ध करण्याची रशियात व्यवस्था आहे. यासाठी खास विभाग असून, त्याच्या कार्यक्षमतेला जगात तोड नाही. स्टालिनच्या निधनानंतर १९५३ साली हा विभाग सुरू झाला. जगात शास्त्रीय विषयावर काहीही महत्त्वाचे प्रसिद्ध होवो, त्याचे भाषांतर रशियन शास्त्रज्ञांना काही महिन्यांतच उपलब्ध होते. 'ऑल युनियन इन्स्टिटयूट ऑफ सायंटीफिक इन्फर्मेशन' या संस्थेतर्फे 'एक्स्प्रेस इन्फर्मेशिया' नावाचे पत्र वर्षातून ४८ वेळा प्रसिद्ध होते, त्याची वर्गणी जवळजवळ शंभर रुपये आहे. दुसरी एक संस्था ब्रिटिश ज्ञानकोशाच्या ३५ खंडांएवढे साहित्य दरवर्षी प्रसिद्ध करते. त्यात चार लाख उतारे असतात. दोन्ही संस्था ८० देशांतील ८,००० पत्रे घेतात. त्यात अमेरिकेतील १,८०० शास्त्रीय नियतकालिकांपैकी १,४०० आहेत. त्यांच्या वर्गणीचाच खर्च वर्षाला जवळजवळ ५० लाख रुपये आहे.

या तुलनेने अमेरिकेचा प्रयत्न तोकडा आहे, अशी टीका विख्यात पत्रकार जॉन गुंथर यांनी 'इनसाइड रशिया टुडे' या आपल्या ग्रंथात रशियन संशोधनपद्धती-संबंधी वरील माहिती देताना केली आहे. अमेरिकेत काय चालू आहे, याची रशियास कल्पना असते, पण रशियात काय चालू आहे, याची अमेरिकेस फारशी कल्पना नसते. रशियातून २०,००० कागदपत्रे अमेरिकेत येतात, पण रशियन फारच थोडयांना येत असल्याने त्याचा फारसा उपयोग केला जात नाही. रशियात प्रसिद्ध होणाऱ्या १,२०० शास्त्रीय नियतकालिकांपैकी फक्त ३० अमेरिकेत येतात व त्यांचे भाषांतर होते. रशियन उपग्रहांच्या रेडिओ-लहरींची माहिती 'रेडिओ' या रशियन मासिकाच्या जून व जुलै १९५७ च्या अंकात प्रसिद्ध झाली होती; पण अमेरिकेत शास्त्रज्ञांना ते माहीत नव्हते.

रशियन शास्त्रीय संशोधन एवढ्या मोठ्या प्रमाणावर चालू असले तरी त्याचा अर्थ रशिया सर्वच क्षेत्रात अमेरिकेच्या पुढे आहे, असा नाही. पदार्थविज्ञान, गणित, महासागरशास्त्र, दूरगामी अस्त्रे व उपग्रह यात रशिया पुडे आहे, पण रसायनशास्त्र, जंतुशास्त्र, जननशास्त्र, इलेक्ट्रॉनिक्स, इंजिनीअरिंग, शेतकीशास्त्र आणि वैद्यक यांत अमेरिकेएवढी प्रगती रशियाला अजून करता आलेली नाही.

## □ कायदा, गुन्हा आणि शिक्षा

इटलीत तीन मुलांनी सफरचंदे चोरण्यासाठी एका दुकानाचा खिडका फोडली. या गुन्ह्याबद्दल त्यांना काय शिक्षा झाली असेल ? दोन-तीन महिने कैद किंवा थोडासा दंड त्यांना झाला असा अंदाज तुम्ही कराल तर तो अगदी चुकीचा ठरेल. त्यांना अडीच वर्षांची शिक्षा झाली. स्वत: शिक्षा देणाऱ्या न्यायमूर्तींनाच ती जबर वाटली, पण त्यांचा नाइलाज होता. टेलिव्हिजनवर या शिक्षेसंबंधी दिलेल्या मुलाखतीत ते म्हणाले, "घरफोडीच्या गुन्ह्याला इटलीच्या कायद्यात ही किमान शिक्षा आहे. शिक्षा कडक वाटली तरी ती देण्याशिवाय दुसरा मार्ग माझ्यापुढे नव्हता."

किरकोळ घरफोडीच्या गुन्ह्याला जर एवढी कडक शिक्षा तर माणसाला ठार करण्याच्या गुन्ह्याला इटलीत केवढ्या जबर शिक्षा असतील, असे कोणाच्याही मनात येईल. पण तसे काही नाही. तेथील दंडविधानात माणसाच्या प्राणापेक्षा मालमत्ताच अधिक मौल्यवान मानली आहे, असे दिसते. एका हॉटेलमालकाने एका मुलास आपल्या गिऱ्हाइकाच्या मोटारीतला रेडिओ चोरताना पकडले व त्या मुलास गोळी घालून ठार केले. हॉटेलमालकास या गुन्ह्याबद्दल तीन वर्षांची शिक्षा झाली. प्रत्यक्षात यापैकी एक वर्षच शिक्षा त्याने भोगली व नंतर त्याची मुक्तता झाली. दुसरा खटला सिसिलीमधील आहे. सिसिलीत कॅटानिया येथे एका शिक्षकाने आपल्या मुलीच्या प्रियकरास गोळी घालून ठार केले. मुलगी २३ वर्षांची कॉलेज-विद्यार्थिनी होती. तिच्याच कॉलेजातील भूगोलाच्या प्राध्यापकाचे तिच्यावर प्रेम होते. मुलीच्या बापाला हे समजताच एक दिवस त्या प्राध्यापकाचा तास चालू असता बाप सरळ वर्गात शिरला आणि एक शब्दही न बोलता त्याने त्या प्राध्यापकास गोळी घालून ठार केले. मुलीच्या बापाला या गुन्ह्याबद्दल दोन वर्षे अकरा महिन्यांची शिक्षा झाली. म्हणजे सफरचंदांची चोरी आणि मनुष्यवध हे दोन्ही गुन्हे इटलीत जवळजवळ सारखेच गंभीर मानले जातात, असे या निकालावरून दिसते. अब्रूला धोका असता रागाच्या भरात केलेला मनुष्यवध या गुन्ह्यास इटलीत 'लॉ ५८७' या नावाने ओळखतात. या कायद्यात तीन ते सात वर्षे शिक्षा आहे. या कायद्यावर व्हॅटिकन पत्रांनीही कडक टीका केली आहे. हा कायदा रद्द करावा, असे बिल आपण आणणार आहोत, असे कायदामंत्री सिनॉर रील यांनी जाहीर करताच त्यांना धमकीची पत्रे येऊ लागली. एका पत्रात म्हटले होते, "मी एक रिव्हाल्व्हर विकत

घेतले असून, रोमला जाऊन स्वत: मंत्र्याला न्याय देणार आहे."

कायद्याचा शब्दश: कीस काढला जाऊन इटलीत न्याय दिला जातो. त्यामुळे खटले दीर्घकाळ चालतात. सध्या न्यायालयांतून १७ लाख खटले तुंबले आहेत. दिवाणी दाव्यास पूर्वी सरासरी तीन वर्षे लागत. आता काही खटले दहा वर्षे चालतात. कित्येकदा तर आरोपीने प्रत्यक्षात आठ-नऊ वर्षे शिक्षा भोगल्यावर त्याच्या अपिलाचा निकाल लागतो व तो निर्दोषी सुटतो.

अशी आहे इटलीची न्याय-व्यवस्था. आधुनिक लोकशाही व न्यायदानाच्या कल्पनेनुसार या पद्धतीत अनुरूप बदल करण्यात यावा, अशी मागणी तेथे जोर धरू लागली आहे.

## □ मादक औषधांचे व्यसन

मादक औषधी गोळ्या घेण्याचे व्यसन अमेरिकेत वाढत असून, त्याला आळा कसा घालावयाचा असा प्रश्न अधिकाऱ्यांपुढे आहे. अमेरिकन समाजाच्या सर्व थरात हे व्यसन आढळते. शाळेतील मुले पेप पिल्स घेतात, ही या व्यसनाची सुरवात. शाळा संपताच शाळेच्या आसपास मुलांना अशी औषधे विकणारे विक्रेते असतात. कॅलिफोर्निया विद्यापीठाच्या सत्तावीस हजार विद्यार्थ्यांपैकी वीस ते चाळीस टक्के विद्यार्थी अशी औषधे घेत असल्याचे आढळून आले. इतर विद्यापीठांतील विद्यार्थ्यांतही जवळपास असेच प्रमाण आहे. कॉलेज विद्यार्थ्यांमध्ये मुख्यत: 'एल्. एस्. डी.' नावाचे औषध विशेष खपते, याचे कारण इतर औषधांच्या मानाने त्याला कमी किंमत पडते. त्याला रंग, गंध किंवा चव नसल्याने ते कोठेही चोरून किंवा दडवून सहज नेता येते. विद्यार्थ्यांच्या दृष्टीने फायद्याची आणखी एक गोष्ट म्हणजे कॉलेजच्या रासायनिक प्रयोगशाळेत ते तयार करता येते. या औषधामुळे मनोविकृती झालेले अनेक लोक न्यूयॉर्कमधील एका हॉस्पिटलात दाखल करण्यात आले. यांपैकी काहींना त्यांच्या मित्रांनी हॉस्पिटलमध्ये आणले होते; कारण औषधाच्या अमलाखाली त्यांना एकटेच सोडले तर ते स्वत:लाच अपाय करतील, अशी भीती या मित्रांना वाटली. पण अशा या औषधाचे समर्थन व पुरस्कार हारवर्डचे माजी मानसशास्त्रज्ञ डॉ. टिमोथी लिअरी यांनी केला. "एल्. एस्. डी. हे एक पवित्र जीवरसायन आहे. ते वापरण्याची कायद्याने परवानगी देण्यात यावी. या औषधाच्या उपयोगाने लोकांना गूढ गोष्टींचे आकलन होईल," असे त्यांचे म्हणणे. दुसऱ्या एका औषधाचा चोरटा व्यापार केल्याबद्दल लिअरी यांच्यावर टेक्ससमध्ये खटला भरण्यात आला, पण कॉलेज-विद्यार्थ्यांत त्यांना वाढत्या संख्येने अनुयायी मिळत आहेत.

काही मुले सातव्या वर्षापासूनच मार्जुलिनचे झुरके घेऊ लागतात. त्याचे गंभीर परिणाम होऊ शकतात. हर्षवायू होणे, वेडेचार करू लागणे, फार भीती,

दहशत वाटणे, श्वासारखे परिणाम तर होतात, पण विशेष घातक म्हणजे मेंदूवरही दीर्घकाळ परिणाम होण्याचा संभव असतो. या औषधाच्या अमलाखाली असलेला एक तरुण वेगाने जाणाऱ्या एका मोटारीपुढे चालत गेला आणि मोटारखाली सापडून ठार झाला. मोटार आपणास काही करू शकणार नाही, अशा भ्रमिष्ट अवस्थेत तो चालत असतानाच वरील अपघात घडला.

स्त्रियांमध्येही अशा औषधांचा प्रसार असून त्यांचा प्रतिकूल परिणाम जन्माला येणाऱ्या मुलांच्या आरोग्यावर होत आहे. गर्भवती असताना सारखे हेरॉइन घेणाऱ्या स्त्रियांची मुले जन्मत:च मलूल असतात. मादक औषध घेऊन गुंगी यावी त्याप्रमाणे ही मुले सतत गुंगीतच असल्याचे दिसून आले. न्यूयॉर्कमध्ये गेल्या वर्षी अशी ८०० मुले जन्मली; त्यांपैकी बरीच मरण पावली. हॉस्पिटलात जन्मत: अशा अवस्थेत असलेल्या अर्भकांचे प्रमाण एक वर्षात वीस टक्क्यांनी वाढल्याचे दिसून आले.

## □ गणितातील गमती

बुद्धिवळांच्या खेळाचा शोध लावणाऱ्या माणसास राजाने बोलावले व म्हटले, " तुला पाहिजे ते बक्षीस माग. "

बुद्धिवळाचा निर्माता म्हणाला, " मला फार काही नको. बुद्धिबळाच्या पटावरील पहिल्या चौकोनाला एक गव्हाचा दाणा. दुसऱ्या चौकोनाला दोन, तिसऱ्याला चार याप्रमाणे गहू धान्य मला द्या. "

राजा आनंदाने तयार झाला; कारण त्याला वाटले, आपल्याला काहीच धान्य द्यावे लागणार नाही. पण पुढे एकेका चौकोनाबरोबर गव्हाच्या दाण्यांचा आकडा दुपटीने वाढू लागला. तेव्हा आपल्याजवळचा सर्वच गहू संपवावा लागतो की काय अशी भीती त्याला वाटू लागली. एकविसाव्या चौकोनाला १०,४८,५७६ दाणे गहू त्या बुद्धिवळनिर्मात्यास देण्याची वेळ आली तेव्हा राजाच्या आनंदाची जागा संतापाने घेतली. त्याने त्या बुद्धिवळनिर्मात्यास फाशी दिले. शेवटच्या चौसष्टाव्या चौकोनाला राजास त्या बुद्धिबळनिर्मात्यास १८,४४६,७४४,०७३,७०९,५५१,६१५ इतके दाणे गहू धान्य द्यावा लागला असता!

ही अर्थात सत्यकथा नसून दंतकथा आहे. एकापासून सुरवात करून दुप्पट करता करता ६४ व्या वेळेस केवढी प्रचंड संख्या होते याची कल्पना देण्यासाठी ही गमतीची दंतकथा ' मॅथॅमॅटिक्स फॉर प्लेअर ' या पुस्तकात ओसवाल्ड जॅकोबी यांनी दिली आहे.

●

# भिंतीच्या तुकड्या

सुधाकर राजे

## ● बुवा म्हणजेच बाया ?

अस्मादिक अमेरिकेला गेले तेव्हा त्यांना एकच अडचण विशेष जाणवली व ती म्हणजे बुवा आणि बाया यांच्यातला फरक ओळखण्याची. कडेवरच्या बेंबीला खुलून दिसतील असे रंगीबेरंगी कपडे वापरणे, हा तेथल्या पुरुषांचा षोक, तर मांडीपासून फूटभर वर तंग चड्डी आणि तिलाच जोडलेला बिनबाह्यांचा ब्लाऊज हा तेथल्या बायांचा गणवेश. शिवाय अशा बाबासूटमधली अमेरिकन बाई खाडखाड टापा वाजवीत आणि लष्करी शिस्तीत हात हलवीत रस्त्याने निघाली, की एखादा पट्टीचा खेळाडू सामना जिंकण्याच्या ईर्ष्येने निघाल्यासारखे वाटायचे. तेव्हा मी आपली मनाशी अशी साधी सरळ खूणगाठ बांधली होती, की अधिक आडदांड वाटेल ती बाई समजायची.

आता बुवासारखी दिसते ती बाई हे एकदा ठरल्यावर बाईसारखा दिसतो तो बुवा, हे ओघानेच आले; नाही का ? याचे अगदी ताजे उदाहरण परवा इंग्लंडात झालेल्या निवडणुकीत घडले. क्विंटिन हॉम् नावाच्या उमेदवाराच्या निवडणूक-सभेत लांबलचक केस वाढविलेला एक फॅशनेबल मतदार जरा जास्तच गडबड करीत होता. हॉम् यांनी त्याच्याकडे एकदा निरखून पाहिले आणि ते म्हणाले, "गप्प बसायला काय घ्याल, महाशय—किंवा बाईसाहेब, 'अॅज् द केस मे बी' ?" तात्पर्य काय, ही बाई आहे की बुवा असा ज्याप्रमाणे भ्रम होऊ शकतो, त्याचप्रमाणे हा बुवा आहे की बाई, असाही भ्रम होऊ शकतो.

ब्रह्म तेथे माया आणि बुवा म्हणजेच बाया, हे आधुनिक अद्वैत जसे अमेरिकेतून वाटचाल करीत इंग्लंडपर्यंत पोचले, तसे तेथून मजल दर मजल करीत हिंदुस्थाना-पर्यंतही पोचले आहे असे दिसते. कारण परवा वर्तमानपत्रात वाचले, की पंजाबातले काही कॉलेज-युवक लिप्स्टिक् लावू लागले आहेत ! सर्वांगीण आधुनिकतेसाठी धडपडणाऱ्या आपल्या देशापुढे या पुरोगामी अर्धनारीनटेश्वरांनी ठेवलेले अत्याधुनिक-तेचे उदाहरण किती अनुकरणीय आहे, हे सांगायला एखादा शब्दसृष्टीचा ईश्वरच पाहिजे; माझ्यासारख्या येरा गबाळ्याचे काम नोहे. हातात नंगी तलवार घेऊन,

दाढीमिशांच्या जंगलातून वाट काढीत शत्रूवर तुटून पडणारा पूर्वीचा मागासलेला पंजाब कोणीकडे आणि गुलांबी कोडे सोडविण्यासाठी गुलाब-ओठांनी सज्ज झालेला आधुनिक पंजाब कोणीकडे ! स्त्री–पुरुषांची एकत्र सौंदर्य-स्पर्धा ठेवली तरी आम्ही हरणार नाही, अशी जी विजिगीषु वृत्ती आजच्या पंजाबी तरुणांत निर्माण झाल्या-सारखी दिसते, तिची नीट जोपासना झाली पाहिजे. त्यायोगे पाकिस्तानी पुरुष मोहित होऊन आपल्या गळचात पडतील व देशाचे रक्षण होईलच, पण बुवा तो बुवा व बाई ती बाई, हा फालतू भेदभावही नष्ट होईल. नाही तरी आजकालच्या पंजाबी तरुणी पुरुषांसारख्या घट्ट सुरवारी घालतातच. त्याच्या जोडीला तरुणांनी स्कर्ट घातले, की आधुनिक अद्वैताचा अंतिम साक्षात्कार होईल.

## ● साम्यवादाचा वास

माणूस आणि मेंबर या दोघात किती फरक असतो, हे मागे एकदा पु. ल. देश-पांडयांनी व्यवच्छेदक लक्षणासहित विशद केले होते. पण माणूस आणि साम्यवादी यांच्यातला फरक ओळखायला कुत्र्याचे तीक्ष्ण घ्राणेन्द्रियच पाहिजे असे दिसते. व्हिएटनामचेच उदाहरण घ्या. व्हिएटनाममधल्या अमेरिकन हवाईतळाचे व्हिएट-काँगच्या छुप्या हल्ल्यापासून संरक्षण करण्याची कामगिरी काही जर्मन कुत्रे इतकी चांगली बजावीत आहेत, की आता अमेरिकन मंडळींनी जर्मन कुत्र्यांना आपल्या वायुसेनेत भरती करण्याची मोहीमच आरंभली आहे.

पण प्रश्न असा की जेथे अमेरिकन सैनिकांनाच व्हिएटनामी आणि व्हिएटकाँग यांच्यांतला फरक ओळखता येत नाही, तेथे कुत्र्याला तो कसा काय ओळखता येतो ? देवाने माणूस जन्माला घातला तेव्हा त्याला कपडे घातले नाहीत, पण रणांगणावर सगळेच दिगंबर राहिले तर समजुतीचा मोठाच घोटाळा व्हायचा; म्हणून माणसाने आपल्या अक्कलहुशारीने गणवेष शोधून काढला. त्यामुळे आपल्या-सारखा गणवेष ज्याच्या अंगावर नसेल तो आपला शत्रू व त्याला मारायचे, असा एक सोपा सिद्धान्त ठरविता आला. पण कुत्र्याला रंगज्ञान नसते. तो माणसापेक्षा पटाईत असतो तो वास घेण्यात. आता अमेरिकन माणूस आणि व्हिएटकाँग यांचे वास निरनिराळे असू शकतील, पण व्हिएटकाँग आणि व्हिएटनामी – म्हणजेच साम्यवादी व्हिएटनामी आणि साम्यवादविरोधी व्हिएटनामी – यांच्या वासात काय फरक असतो ? साम्यवादाचा वास ओळखता आल्याखेरीज हे कोडे सुटायचे नाही. तेव्हा आमच्या मोत्यालाच विचारले पाहिजे.

● ● ●

# भक्कम संगीतामुळे 'धोका' टळलेलं 'सोळावं वरीस'



दौलती

**ग्रा**मीण चित्रपटांशी मराठी प्रेक्षक चांगलाच समरस होतो. 'जय मल्हार'पासून 'केला इशारा-' पर्यंतची परंपरा हेच सांगते. मग पडद्यावर जे यशस्वी होतं, ते रंगभूमीवर जिवंतपणं उभं केलं तर अधिक यशस्वी होईल, अशा भावनेतूनच जगदीश खेबूडकरांचे नवे नाटक 'सोळावं वरीस धोक्याचं' रंगभूमीवर आलेलं आहे.

**कथानक–**

**'सांगतो (त्ये!) ऐका!!'**

दौलती आणि चंदर हे दोघे जिवलग मित्र. चंदर जरा चंगीभंगी, तर दौलती पहिलवानी पेशातला, नुकताच नावारूपाला येत असलेला पहिलवान. दौलतीचे वडील आबा एक वृद्ध शेतकरी. मुलाला त्यांनीच मोठे केलेले असते. कर्ज काढून त्याच्या खाण्यापिण्याचा बंदोबस्त केलेला असतो. मुलानं खूप मोठा पहिलवान व्हावं, आपण काढलेलं कर्ज फेडावं व स्वतःचा व आपला लौकिक वाढवावा, एवढीच त्यांची अपेक्षा असते. एका मोठ्या कुस्तीत सोन्याचं मानाचं कडं मिळवून मुलानं वाटचाल तर योग्य दिशेनं केलेली असते, परंतु याच वेळी दौलतीची गाठ गजरा तमासगिरीणीशी पडते. चंदरच्या नादाने तो बारीला नियमितपणे जाऊ लागतो. पुढे चंदरही बाजूला होतो. गजरा-

दौलती अधिक जवळ येतात.

या गजरावर आशक झालेलं अजून एक पात्र आहे—ते म्हणजे गावचे सावकार.

गजरा-दौलतीचे वाढते संबंध सावकाराला खपणे शक्यच नसते. त्यात गजराच्या बारीमध्ये दौलती पहिल्या वेळी येतो, त्याच वेळी दौलतीचा व सावकाराचा खटका उडतो. दोघेही दौलतजादाच्या चढणीचा खेळ सुरू करतात. ईर्षेला पेटलेला दौलती बैठक जिंकण्यासाठी मानाचे कडे गजराला देतो व स्वतःच्या मनाजोगती लावणी ऐकून तृप्त होतो.

छद्मी सावकाराचा अहंकार दुखावला जातो. मनात काही योजना निश्चित करून तो थेट दौलतीच्या वडिलांकडे येतो. घडलेली हकीकत तिखटमीठ लावून त्यांना सांगतो. आपण दिलेल्या कर्जाची जाणीवही त्यांना करून देतो. पोरगा नको त्या वाटेला गेल्याचे ऐकून आबा हबकून जातात. इतक्यात दौलती येतो. सावकाराला बघून सर्व गोष्टींची त्याला कल्पना येते. तो सावकाराला उलटसुलट बोलतो. शेवटी गोष्ट मुद्यावर–' मानाच्या कड्यावर ' येते. आबा मुलाला कडे दाखवण्याचा आग्रह करतात. स्वतः त्याच्या वाह्या वर करतात. दंडात ते मानाचे कडे दिसते. गजराने आपण होऊन ते मानाचे कडे परत केलेले असते. सावकार फशी पडतो. बापाचा संताप पाहून दौलती घर सोडतो.

दौलती व गजरा यांच्यातील सहवासाचे प्रेमात रूपांतर होते. गजराशी लग्न करण्याचाच दौलतीचा विचार असतो. या वाढत्या सलगीला वेळीच आळा घालण्यासाठी सावकार गजराची खास बैठक वाड्यावर आयोजित करतात. सावकाराचा अंतस्थ हेतू गजरा ओळखते व वाड्यावर येण्याचा निरोप दौलतीला पाठवते.

ठरल्याप्रमाणे तमासगीर मंडळी वाड्यावर येतात. मोठे कॉंट्रॅक्ट मिळवण्यासाठी गजराचे वडील – वजाबा – निघून जातात. सावकार इतरांवर पैशाची जादू करतात. एकटी गजरा राहते. सावकाराच्या दाबून ठेवलेल्या वासना उफाळून येतात. गजरा प्राणपणाने विरोध करते, पण सावकार आवरत नाहीत. गजरा सावकाराच्या हाताला कडकडून चावते. इतक्यात दौलती दार तोडून आत येतो. सावकार व गजराला एकत्र पाहून त्याला निराळीच शंका येऊ लागते. गजराला तो वाटेल ते बोलतो. सावकारही आल्या संधीचा फायदा घेऊन सर्व गोष्टी दोघांच्या मर्जीनेच चालल्याचे भासवतो. परंतु सावकाराच्या मनगटावरील डंख मदतीस येतो. डंख पाहून गजराच्या निर्दोषपणाविषयी दौलतीची खात्री पटते व तो सावकारास मारावयास धावतो. गजरा मधे पडते. सावकार बचावतो.

चारही बाजूंनी अगतिक झालेला दौलतीचा बाप गजराकडे येतो. तिच्या हातापाया पडून दौलतीची भीक तिच्याकडे मागतो. दौलती संध्याकाळपर्यंत घरी परत येईल, असे वचन गजराकडून घेऊनच म्हातारा परततो.

निम्म्या अंकाचे शेवटी सावकार आबाचे घरावर जप्ती घेऊन जातात.

दौलतीचा दोस्त चंदर दोन हजार रुपये उभे करतो. घरच्या ओढीने व गजराला दिलेल्या शब्दाप्रमाणे दौलती घरी येतो. कुस्तीतील मानाचे कडे सावकाराकडे फेकतो. परंतु त्याची किंमत धरूनही दोन हजार रुपये बाकी राहतात.

## रहस्य हवेच !

याच वेळी गजरा व गजराचा बापही येतात. परिस्थिती आटोक्याबाहेर जात आहे, असे पाहून बजाबा—गजराचा बाप—तोंड उघडतो जुने रहस्य उकलले जाते.

बजाबा हा दरोडेखोर. फार वर्षांपूर्वीची जुनी कहाणी सावकारांना ऐकवतो. ' सावकार, वीस वर्षांपूर्वीची गोष्ट. आपल्या वाड्यावर दरवडा पडला. दरोडेखोरांनी तिजोरी-फोडून ऐवज तर गोळा केला, परंतु जाताना चाहूल लागली. सावकार, तुम्ही जागे झालात. सराईत दरोडेखोर सफाईने निसटले, परंतु एक नवखा दरोडेखोर पाच हजारांचा ऐवज घेऊन तुमच्यासमोर उभा राहिला. तुमच्या हातात भरलेलं पिस्तुल. काय करावं हे त्या नवख्याला उमगेना. इतक्यात त्याचं लक्ष जवळच झोपलेल्या तुमच्या अकरा महिन्यांच्या पोरीकडे गेलं. डोळ्याचं पात लवतं न लवतं तोच ती पोर त्यानं उचलली व ओरडला, ' बोल सावकारा, पोर पाहिजे का ऐवज ! ' आणि त्या नराधमानं उत्तर दिलं, 'पोर पुन्हा मिळेल, ऐवज टाक.' दरोडेखोर ऐवज टाकून पसार होत असताना सावकारानं गोळी झाडली. त्याच्याच पोरीच्या दंडाला ती लागली, पण सावकार हळहळला नाही. पोर खांद्यावर टाकून दरोडेखोर निसटला. सावकारा, मीच तो दरोडेखोर, आणि ही गजरा हीच ती तुझी पोर. " बजाबाच्या निवेदनाने वातावरण बदलते. सावकार अस्वस्थ होतो. ही हकीकत बनावट असल्याचे सांगतो, पण हकीकतीतील अचूकपणा व गजराच्या दंडावरील गोळीची खूण पाहून त्याची खात्री पटते.

दौलतीच्या मार्गातील अडसर दूर होतो. नाचणाऱ्या गजराला कुलशिलाचा मान मिळतो. दौलती—गजराचे लग्न सूचित करून नाटक संपते.

## राया, मी काय करू तुमच्यासाठी....

अशा स्वरूपाचे कथानक ग्रामीण चित्रपटांतून यापूर्वीच आपण अनेकवेळा पाहिले असल्याने प्रभावी कथानक पाहिल्याचे समाधान वाचकांस मिळत नाही. परंतु नृत्य व संगीत यांची मात्र उत्कृष्ट मेजवानी या नाटकात आहे. अर्थात संगीत याचा अर्थ लोक-संगीत. जगदीश खेबूडकरांच्या लावण्यांमध्ये ताजेपणा, सुलभ शब्दरचना, सूचक प्रणय इत्यादी अनेक वैशिष्टचे आढळतात. जवळजवळ सर्वच लावण्यांना दत्ता डावजेकरांनी उत्कृष्ट संगीत दिलेले आहे. 'सोळावं वरीस धोक्याचं', ' मैतरीणिंनो, मारु नका गालावर टिचकी ' या लावण्या तर सुरेख आहेतच, परंतु रसिल्या मनाची खरी पकड मात्र 'राया, मी काय करू तुमच्यासाठी ' हीच लावणी घेते. लावण्यांतील शब्दांमागे दडलेला आशय स्पष्ट करण्याचे काम लीला गांधी (गजरा) या नृत्यांगनेने कमालीच्या कौशल्याने केले आहे. तिची लावणी-नृत्ये प्रथम-

श्रेणीची आहेतच, परंतु नृत्य करीत असताना तिच्या डोळ्यांतून व चेहऱ्यावर जो भाव ओसंडतो, तो लावणीतील शब्दांना जे सांगता येणार नाही ते सांगून जातो.

गजरावर अत्याचार करण्याचा सावकाराचा प्रयत्न, दौलतीची भीक मागण्यासाठी गजराकडे आलेले आवा आणि बजाबा जुने रहस्य उघड करतो तो प्रसंग, ह्यांत नाटच भरपूर आहे. परंतु लेखक खेबूडकर व काम करणारे कलावंत ही दोन्ही अंगे या बाबतीत कमी पडतात. त्याच त्या गोष्टींची पुन्हा पुन्हा उजळणी होते. त्यामुळे अनेक नाटचप्रसंग—विशेषतः आवा व सावकारामधील तिसऱ्या अंकातील संवाद—कंटाळवाणे झाले आहेत. श्री. खेबूडकरांच्याजवळ शब्दसामर्थ्य आहे. काही ठिकाणी संवादामध्ये आवश्यक तो जोषही आहे. परंतु संवादाचे आधारे नाटचास गती देण्यास ते असमर्थ ठरले आहेत. त्यामुळे नाटकातील संगीत व नृत्य यांच्या गतीने कथानकाचा भाग पुढे जाऊ शकत नाही.

**भूमिका...**

हे सर्व झालं नाटचलेखन, संवाद, संगीत, नृत्य इ. दृष्टिकोनातून. परंतु जे काही खेबूडकरांनी उभे केले आहे, ते अतिरंजित करून दाखवण्याकडेच सर्वसामान्य नट-वर्गाचा कल आहे. एरन जोसेफ आवाचे कामात वास्तवता आणण्याऐवजी कमालीचा आक्रस्ताळेपणा आणून जणू काही ' बघा माझा अभिनय कसा आहे ' हे दाखवण्याचा प्रयत्न करतात. तमासगीर मंडळी सर्वसाधारणपणे समाधानकारक आहेत. गणपत पाटलांचा—मोतीराम (नाच्या) सुरेख आहे. तमासगिरांची विविध दुःखे या तमाशातील मंडळींच्या तोंडून लेखकाने वदवली आहेत, त्याला बहुतेकांनी न्याय दिल्याने तमासगिरांच्या व्यथा प्रेक्षकांपर्यंत पोहोचतात. अरुण सरनाईक दौलतीच्या भूमिकेमध्ये ठीक दिसतात, पण कामात त्यांचं मन आहे, असं निदान मी पाहिलेल्या प्रयोगाला तरी जाणवलं नाही. दिग्दर्शक बी. माजनाळकरांची चंदरची छोटीशी भूमिका समाधानकारक आहे. सावकार—कमलाकर टाकळकर—यांच्या चालण्या-बोलण्यात कमालीचा खोटेपणा, तर संवादफेकीत जयशंकर दानवे यांची उघड उघड नक्कल. त्यामुळे जाणकारांना ते आवडणार नाहीत, पण प्रेक्षकांना मात्र ते समाधान देतील.

नाटकाच्या तांत्रिक बाजू सामान्य आहेत. नेपथ्य, रंगभूषा, वेषभूषा तिन्हींची जबाबदारी रेखा मेकअप् सर्व्हिसकडे आहे, पण त्यात कोठेही खास लक्षात येण्याजोगे काही नाही. संगीताची बाजू मात्र चांगलीच भक्कम आहे. नाटकाला जे काही यश मिळेल, त्यात संगीत-दिग्दर्शक दत्ता डावजेकर, नृत्यांगना लीला गांधी व कवी जगदीश खेबूडकर यांचा वाटा मोठा असणार आहे, यात संशय नाही.

—**शरद गोखले**

# जीवन माझे गंगाजळ

## प्रेक्षक कोरडे पाषाण....

मुंबईच्या ' नाटय श्री ' या संस्थेने सादर केलेले श्री. वसंत देशमुख यांचे " जीवन माझे गंगाजळ " या नाटकाच्या प्रथम प्रयोगाला जाण्यापूर्वी थोडेसे उत्साहाचे वारे खेळत होते. कारण या नाटकाबद्दल बऱ्याच दिवसांपासून ऐकत होते, की हे नाटक अधिकाधिक प्रभावी होण्यासाठी लेखकाने फार श्रम घेतले आहेत. अनेकांना नाटक वाचायला देऊन त्यांच्याशी भरपूर चर्चा करून त्यात अनेक सुधारणा केल्या आहेत. खूप संस्कार केले आहेत. नाटक जास्तीतजास्त निर्दोष कसे होईल, हे पाहण्याचा प्रयत्न केला आहे. तेव्हा मनात म्हटलं, " लेखक जिद्दीचा दिसतो ! या वेळी तरी निराशा होणार नाही. कमीत कमी, लेखन सामान्य अशी तरी ओरड करायला कुणाला संधी सापडणार नाही ! " पण ! !

गंगा नदीची पवित्र उपमा देऊन सादर केल्या जाणाऱ्या या नाटकात काही तरी मंगल, पवित्र पाहायला सापडेल अशी प्रारंभी समजूत होती, ती आशा साफ खोटी ठरली. नाटकातून नक्की काय सांगायचे आहे, हेच प्रश्नचिन्ह प्रेक्षकांना अखेरपर्यंत भेडसावत राहिले. काही सुजाण प्रेक्षक तर नको ही डोकेदुखी म्हणून चक्क उठन गेले, तर काही मंडळी उठून जाणं बरं दिसणार नाही, या लाजेकाजेस्तव तशीच बसून राहिली.

या नाटकात एका श्रीमंत, प्रतिष्ठित वकिलाच्या कुटुंबाचे चित्रण केले आहे. त्याला द्वितीय पत्नी आहे. पहिल्या बायकोची तीन मुलं आहेत, असा एकंदर मोठा परिवार. पण विशेष असा, की प्रत्येकाचा स्वभाव वैशिष्टयपूर्ण आहे. वकीलसाहेब अत्यंत कडक, शिस्तीचे भोक्ते. लग्न झालेला मोठा मुलगा मकरंद हा साहित्य-वेडा, वकील असून वकिली करण्याच्या विरुद्ध. सून धनवती सुशिक्षित, पण मूल नसल्यानं अत्यंत दुःखी, दिरालाच मुलगा मानून त्यावर आईची माया करणारी. धाकटा मुलगा विक्रम मधूनच वेडयासारखं वागत असतो. त्याला डॉक्टर बन-विण्याची स्वप्नं वकीलसाहेब रंगवितात, तर हा चित्रकार होण्याचा विचार करीत आहे. धाकटी मुलगी नंदा ही व्याख्यानबाजी, काव्यवाचन यांवर प्रेम करणारी आणि नानासाहेबांची द्वितीय पत्नी अत्यंत खाष्ट; मुलांचा छळ करणारी ! एकं-दरीत या कुटुंबात कुणाचा पायपोस कुणाच्या पायात नाही. प्रत्येकजण स्वतःच्याच विचारात आणि छंदात दंग आहे. अशा या कुटुंबात नानासाहेबांच्या मित्राचा मुलगा विलास राहायला येतो. त्याचा स्वभाव मोठा कारस्थानी आहे. या घरात आप-ल्याला नाना उद्योग करून नानासाहेबांची इस्टेट गिळंकृत करता येईल, त्यांचा जावई बनता येईल, असा विचार करून तो आपले डावपेच लढवू लागतो. त्या

दृष्टीने प्रथमतः धनवती आणि विक्रम यांच्या पवित्र प्रेमाला पापाचं रूप देतो. त्याचा परिणाम एवढा होतो, की धनवती घर सोडून निघून जाते. नंदाचा प्रियकर सुधीर याच्यावर चोरीचा आळ घेतो, विक्रमला विष देण्याचा प्रयत्न करतो, परंतु अखेरीस ठरल्याप्रमाणे त्याची कारस्थाने बाहेर पडतात. पोलीस त्याला अटक करतात आणि कुटुंब पूर्ववत राहू लागते.

## कथानकातील कच्चे दुवे

असे हे कथानक ! यात कोणतीही गोष्ट प्रथमपासून अखेरपर्यंत व्यवस्थितपणे मांडली आहे का ? लेखकाने अनंत भानगडी निर्माण केल्या आहेत आणि त्या नीटसपणे न मांडता आल्याने तशाच अर्धवट सोडून दिल्या आहेत. काहीतरी असंभाव्य गोष्टी घुसडून कथानकाचा अधिकच बोजवारा मात्र उडविला आहे.

काही नमुने असे : चंदनशेठ नावाचा नानासाहेबांचा एक मित्र आहे. तो पाच लाखांचे सोने आणून नानासाहेबांकडे ठेवतो. हा खोटा व्यवहार आहे, हे जाणूनदेखील तो करण्यास नानासाहेबांना भीती वाटत नाही. यामुळे आपली प्रतिष्ठा बरबाद होईल, ही शंकाही येत नाही. पैशाच्या लोभानं हे कृत्य त्यांनी केलं, असं आपण समजू या ! मग त्यावर उपाय शोधायचा सोडून आपल्या घरात नुकताच पाहुणा म्हणून आलेल्या एका मुलाच्या खोलीत ही सोन्याची पेटी ते ठेवतील, हे कसे शक्य आहे ? बरं, या व्यवहारात काही आपत्ती आलीच तर त्या पाहुण्याच्या डोक्यावर चोरीचा माल ठेवल्याचं खापर फोडावं, असं करण्याचाही त्यांचा डाव नव्हता. एकंदरीत या चोरट्या सोन्याचं प्रकरण निर्माण का केलं ? उत्तर नाही. दुसरे उदाहरण धनवतीचे ! तिच्या पावित्र्याबद्दल शिंतोडे उडविले जातात. विक्रमशी तिचे वाईट संबंध असल्याचे कुभांड तिच्यावर रचले जाते; पण हा नाट्यपूर्ण प्रसंग अगदीच मिळमिळीत रंगविला आहे. एक आर्य-स्त्री आपल्या पावित्र्यावर आलेला खोटा आरोप निमुटपणे सहन करील ? कसलाही प्रतिकार करायचा सोडून घरातून निघून जाईल ? ही गोष्ट शक्य तरी वाटते का ? घरातून निघून गेल्यानं आपलं पावित्र्य सिद्ध होईल, असं तिला कसं वाटतं ? वास्तविक आपला पवित्रपणा सिद्ध करण्यासाठी जी कोणतेही दिव्य करायला तयार व्हावी, तिलाच नाटककाराने दुसऱ्या अंकात एकदा घराबाहेर काढली, ती परत कधी आणलीच नाही. आणखी एक दाखला पाहा : धनवती घर सोडून जाताना अंगावरील दागिने काढून ठेवते, हे मान्य, पण बाहेर पडताना आपले मंगळसूत्रही भिरकावून देईल, हे कसे शक्य आहे ? गंगेसारखे पावित्र्य यात कुठे येते ? लेखकाला अशी आर्यस्त्री कुठे भेटली ? सती–साध्वी समजल्या जाणाऱ्या स्त्रीचे हे कृत्यही मनाला पटत नाही. धनवतीला मूल नाही, त्याबद्दल ती वारंवार दुःख करीत असल्याचं सांगितलं आहे. त्यापुढे तिच्यावर झालेल्या अकारण चिखलफेकीचंही तिला काहीच वाटत नाही. वास्तविक कोणतीही स्त्री एकवेळ वांझोटीपणाचं दुःख सहन करील पण

पावित्र्याबद्दल घेतलेला आळ कदापि सहन करणार नाही. वांझोटीपणाचे दुःखच ती इतर गोष्टींपेक्षा अधिक बोलून दाखवीत आहे; ही गोष्टही मनाला पटत नाही.

धनवती आपले दुःख कोणत्या शब्दांत बोलून दाखवीत आहे, याचे उदाहरण म्हणून पुढील वाक्य पाहा : "आठ महिन्याचं कां होईना, एखादं जरी मूल मला झालं असतं आणि कुदळीच्या आठ आकड्यांनी त्याला धरतीमातेच्या कुशीत ढकलावं लागलं असतं ना, तरी कूस उजविल्याचं समाधान मला लाभलं असतं." हे उद्‌गार कोणती सुसंस्कृत स्त्री काढील ? आणि धनवती वेडी होती म्हणाल तर तसंही नाटकात आढळत नाही. एकूण काय, नाटकात दाखविलेल्या प्रत्येक गोष्टीत काहीना काही संदर्भ असतो, संगती असते, घटना पटणारी असावी लागते, या गोष्टींचा विसरच पडलेला दिसतो.

## इतर गोष्टी

बरं, भाषाशैली, संवादकौशल्य यामुळे दोषांवर पांघरूण घातले जावे, तर तेही घडत नाही. भाषेचे सौंदर्य तर लेखकाजवळ नाहीच, पण संवादरचनाही सुटसुटीत, खटकेबाज नाही. उलट प्रत्येक संवाद म्हणजे एक मोठा परिच्छेदच वाटतो. नाटककाराला व्यवहारातील गोष्टींचीही पुरेशी माहिती नाही. एका प्रसंगी तो म्हणतो, "केळ वाकली पण केळफूल काही लागले नाही." पण नाटककारमहाशयांना हे माहीत नाही, की केळफूल लागल्याखेरीज केळ कधी वाकतच नाही !

पात्रांच्या अभिनयातून काही फार मोठे समाधान मिळावे, असेही घडले नाही. सुमती गुप्ते, सूर्यकांत, चित्रा, रामचंद्र वर्दे यांसारखे मातबर कलाकार होते हे खरे, पण त्यांच्या व्यक्तिरेखाच अशा अस्पष्ट, अधुऱ्या लिहिल्या आहेत, की कलाकारांचे प्रयत्न निष्फळ ठरावेत. कुणाच्याही कामात रंगत म्हणून आली नाही.

दिग्दर्शनकौशल्यही बेताचेच होते. फक्त एक गोष्ट आवडली ती ही, की काही महत्त्वाच्या प्रसंगी व्यक्तीच्या मनात चाललेली खळबळ व्यक्त करण्यासाठी टेप-रेकॉर्डेड भाषणांचा उपयोग करून घेतला होता. ही गोष्ट निश्चितच प्रभावी ठरली असती, पण रेकॉर्डिंगमधील दोषांमुळे अगर त्याचा वापर नीट न केला गेल्यानेही भाषणे व्यवस्थित ऐकू आली नाहीत. संघर्ष तीव्रतेने जाणविण्याऐवजी कंटाळवाणा वाटला.

एकूण काय, नाटकाचे नाव आणि त्याचे कथानक यात यत्किंचितही मेळ नाही. नाटक संपले तरी आपण नक्की काय पाहिले, याचा थांगपत्ता लागत नाही. म्हणून प्रेक्षक मात्र कुणाचे जीवन गंगाजळ ? अशी चर्चा करून करून, कंठशोष पडून गंगाजलाच्या शोधार्थ बाहेर पडतात.

**सौ. जयश्री दामले**

●

# जे नव्हते ध्यानीमनी

– रा. म. शास्त्री

[ We never meant to go so far Mavis Ronson. ]

तिचे वय असेल १८-१९ वर्षांचे. वडील सुखवस्तू असूनही ती नोकरी करीत होती. पैसे शिल्लक पडले होते. नोकरी सांभाळून तिने फोटोग्राफीचे शिक्षण हौस म्हणून चालू ठेवले होते. परंतु त्याचाही आता कंटाळा आला होता. रजा घेऊन काही दिवस प्रवास करावा. अनोळखी ठिकाणी अनोळखी माणसांत राहावे, फिरावे, असा विचार करीत असताना कुणीतरी तिला सांगितले की, हंगेरीहून जीप घेऊन दक्षिण आफ्रिकेतला एक माणूस गावात आला आहे. एक-दोन दिवसात तो परतणार आहे. परतताना कुणी प्रवासी-गिऱ्हाईक तो शोधतो आहे. तिने त्या माणसाचा पत्ता काढला. त्याचं नाव होतं कालघन. परंतु त्याला पाहताच ती मनातून चांगलीच घाबरली.

तो फारसा उंच नव्हता. त्याने दाढी राखली होती. दाढी व डोक्यावरचे केस तांबूस होते. एका डोळ्यावर तिरकी ओढलेली हिरवी टोपी त्याच्या डोक्यावर होती. जरा मवालीच वाटत होता. तिने विचार केला, एकटी जाण्यापेक्षा मैत्रिणीलाही विचारावे. जीपमध्ये आणखी एक जागा आहेच. तिने मैत्रिणीला फोन केला –

" कोण बार्बारा का ? मी माविस बोलते आहे. हंगेरीला येणार का ? जीप आहे ... "

तिला वाटले होते बार्बारा कसची येते ? पण आश्चर्य म्हणजे बार्बारानं चटकन् होकार दिला. दोघींनी पुढचे आठ दिवस पासपोर्ट-व्हिसा मिळविण्यात घालवले.

तिच्या वडलांनी तिला प्रवासाला निघताना एकच सूचना दिली...

" प्रवासात नेहमी तापवलेले पाणी प्या... ! "

दोघी प्रवासाला निघाल्या तेव्हा बार्बाराची आई फक्त पोहोचवायला आली होती. माविसला वाटलं, बरं झालं, आपले आईवडील आले नाहीत. जीपचा अवतार पाहून त्यांनी प्रवासाची परवानगीच काढून घेतली असती.

जीपची एकंदर अवस्था विलक्षणच होती. ती शाकारलेली नव्हती. उघडीच होती. मागील भागात जुने टायर, खोकी आणि सटरफटर सामान कोंबलेले होते. त्यातच दोघींनी पिशव्या ठेवल्या. जीपचा रंग होता निळा आणि बसायच्या जागा होत्या ड्रायव्हरशेजारी.

जीपचा हा अवतार पाहून बार्बाराची आईदेखील चरकली. पण आता आयत्या वेळी दोघींचा विचार मोडून कसा काढणार ? बोलून चालून ४५ पौंडांना विकत

घेतलेली ती जीप बुडापेस्टला दोनशे–अडीचशे पौंडांना विकली जाईल इतपत डागडुजी केलेली होती झालं.

प्रवास सुरू झाला.

फक्त हंगेरीला जाऊन परतण्याच्या उद्देशाने सुरू झालेला हा प्रवास माविस आणि बार्बाराला कुठे कुठे घेऊन गेला ? अथेन्स, सायप्रस, अलेक्झांड्रिया, बैरूत, बगदाद, तेहरान, काबूलपर्यंत ! भारताचे आकर्षण टाळणे त्यांना अशक्य झाले. भारतात दिल्ली, मुंबई, हैद्राबाद, कलकत्ता, मद्रास येथील त्यांचे अनुभव विलक्षण होतेच; परंतु त्यांच्या सुदवाने त्या जेव्हा सिक्कीमला गेल्या तेव्हा पंडित नेहरूंशी त्यांची अचानक भेट झाली. त्याच प्रदेशात चौ एन् लायशी पण त्यांनी दोस्ती केली. सायगाव, फोर्मोसा उरकून त्यांनी थेट मलाया गाठले. इंडोनेशियाचा रंगेल शेख महमंद सुकार्नो याच्या स्त्रैणपणाचा योग्य तेवढा उपयोग करून त्यांनी तेथल्या यादवी-युद्धात वार्ताहराचे काम केले. गंमत म्हणजे एवढा मोठा प्रवास करावा, इतके देश हिंडावे असे काही त्यांच्या ध्यानीमनीही नव्हते. त्यांना हे सर्व शक्य झाले याचे कारण त्यांनी इंग्लंडात पाठवलेली वार्तापत्रे. इंग्लंडमधील प्रसिद्ध नियतकालिकांनी त्यांना भरपूर पैसे देऊ केले. जवळ असलेल्या कॅमेऱ्याचा त्यांनी धाडसी उपयोग केला आणि प्रवासासाठी भरपूर पैसा उपलब्ध झाला.

या लोकविलक्षण मुलींपैकी माविस रॉनसन (Mavis Ronson) या मुलीने आपल्या या प्रवासाची हकीकत— " We never meant to go so far " या शीर्षकाखाली पुस्तकरूपाने लिहिली आहे.

: २ :

प्रवासाचा पहिला दिवस मावळण्यापूर्वीच प्रवासातल्या थरारती सुरू झाल्या. दर पाच-दहा मैलांवर जीप बंद पडत होती. मशिन खोलावे, धक्के मारावेत, तेव्हा ती पुन्हा चालू होत होती. बंद पडताना किंवा चालू होताना तिचे होणारे भयंकर आवाज चांगले ओळखीचे झाले होते.

जीपचा ड्रायव्हर कालधन हा दिवसभर जीप चालवी. सायंकाळ झाली की एखाद्या बारजवळ थांबून तो चिक्कार पिऊन घेई. एके दिवशी त्याने पंचाईतच केली. एका रस्त्याकडेच्या हॉटेलजवळ सायंकाळी त्याने जीप थांबवली व तो अदृश्य झाला. थोड्या वेळात अनेकजण जीपपाशी येऊन दोघींना सांगू लागले,

" तुम्ही ड्रायव्हरची वाट पाहत किती वेळ बसणार ? खाली उतरा. रात्रभर इथेच राहा. आम्ही तुमची व्यवस्था करतो. "

त्या माणसांचे चेहरे, डोळे, आवाज हे निरखून पाहताच माविसच्या लक्षात आले, की ही माणसे निशाचर आहेत. आणि ज्याला हॉटेल समजून जीप तिथे थांबलेली होती तो कुंटणखाना होता. रात्रभर दोघी जीपमध्येच बसून राहिल्या. पहाट झाली



मा विस...

व कालघन परतला. अपराध्यासारखा काही न बोलता तो जीपमध्ये चढला व जीप सुरू झाली.

हळूहळू कालघनचा धीर चेपला. तो दोघींशी मोकळेपणाने बोलू लागला. त्याने आपला धंदा चोरटी आयात-निर्यात करण्याचा आहे, हे सांगून टाकले.

"तुमच्यासारख्या चांगल्या घरातल्या मुली मी माझ्या गाडीत एवढयासाठीच घेतल्या, की पोलिसांचे लक्ष मग सहसा माझ्याकडे जात नाही. माझा त्यांना संशय येत नाही."

जीप व्हिएन्नात पोचली. माविसला वाटत होते, हंगेरीतून प्रवास करण्याचा परवाना सहज मिळेल. परंतु तेथील वकिलातीतून कळले, की निदान तीन महिने वाट पाहावी लागेल. कालघनने तगादा लावला, की त्याला थांबता येणार नाही आणि तक्रार करीत पैसे घेऊन तो निघून गेला.

प्रवासाला निघाल्यापासून आठवडाभरात माविस व बार्बारा व्हिएन्नात अडकून पडल्या. पुढे काय करायचे ? तीन महिने करायचे काय ? असे त्यांना प्रश्न पडले होते.

माविसला पुष्कळ दिवसांपासून भारताचे आकर्षण होते. नकाशाकडे पाहत असताना एके रात्री तिच्या मनात आले की, इथेच तीन महिने काढण्यापेक्षा भारताला जावे. वाटेत फारसे देश नाहीत.

दुसऱ्या दिवशी पहाटे साडेपाचला दोघींनी आपले सामान एका खोक्यात भरले. खोका भलताच जड झाला. खोका उचलण्याकरता बांधलेली दोरी खोका उचलतानाच ताडकन् तुटली. खोका आदळला व फळ्या खिळ्यांचा आधार सोडून पडू लागल्या. पहाटे व्हिएन्नाच्या रस्त्यात दोघी खोक्यांची ठोकाठोक करीत असताना एका गृहस्थाला त्यांची दया आली. त्याने खोका दुरुस्त करण्यासाठी एका सुताराला दिला. इतकेच नाही, तर तोपर्यंत चांगले उजाडलेले असल्याने त्यांना चांगला नाश्ता दिला.

एका फळाच्या लॉरीतून दोघींनी युगोस्लाव्ह सरहद्दीकडे मोर्चा वळवला होता. रस्त्यावर खासगी मोटारी अशा दिसतच नव्हत्या. एखादी लॉरीच अधूनमधून भेटत होती. लॉरी बदलत बदलत दोघी पुढे पुढे चालल्या होत्या. ●

[ पुढील अंकी चालू ]

# वावटळ

## एक निवेदन......शांताराम आठवले

[ यंदाचे सरकारी स्पर्धेमध्ये 'चित्रसाधना'च्या 'वावटळ' या चित्रपटास दहा पारितोषिके देण्यात आली. या संदर्भात 'वावटळ'चे दिग्दर्शक श्री. शांताराम आठवले यांनी 'माणूस'चे प्रतिनिधी श्री. शरद गोखले यांच्याजवळ प्रकट केलेले विचार—]

शंकर पाटील यांच्या 'आभाळ' नावाच्या कथासंग्रहात 'वावटळ' नावाची छोटीशी कथा आहे. ही कथा चित्रपटासाठी निवडणे खरोखरच धाष्टर्याचे होते. परंतु ही वेगळी कथा 'चित्रसाधना'चे श्री. ना. ब. कामत यांनी निवडली व दिग्दर्शनाची जबाबदारी माझ्यावर सोपविली 'चित्रपटाचे प्रेक्षक व टीकाकार नेहमी पेक्षा वेगळे घ्या, चाकोरी सोडून द्या,' असा आरडाओरडा नेहमीच करीत असतात. आम्ही धाष्टर्य करून हा प्रयोग केला. अत्यंत वास्तव दृष्टिकोनातून कथेची हाताळणी केली. नेहमीच्या चित्रपटापेक्षा वेगळे, परंतु हृद्य असे काहीतरी देऊ, या आत्मविश्वासाने कार्य केले. आम्ही केलेल्या कामाची पावती टीकाकार व प्रेक्षक देतील, ही आमची रास्त अपेक्षा; परंतु टीकाकारांनी आमच्याकडे पाठ फिरवली. आम्हाला काय म्हणायचे आहे, चित्रपट कोणत्या दृष्टिकोनातून तयार केला आहे, हे काहीही समजावून न घेता टीकाकारांनी वेडीवाकडी लेखणी चालवली. त्यांना प्रेक्षकांनीही मनोभावे साथ दिली. अर्थातच आर्थिकदृष्टचा चित्रपटास मोठे अपयश आले. 'रसरंग' हे चित्रपट-विषयास वाहिलेले साप्ताहिक, परंतु त्यांनीही चित्रपटाची बोली 'महारी' आहे म्हणून आक्षेप घेतला; पण त्याबाबत विचारपूस मात्र केली नाही. ग्रामीण बोलीवर प्रभुत्व असणारे शंकर पाटील चित्रीकरणाचे वेळी उपस्थित होते व संवादावर कटाक्षाने लक्ष पुरवीत होते. पण हे काही समजावून न घेता चित्रपटाच्या संवाद–बोलीवर टीका झाली. तीच गोष्ट चित्रपटाच्या इतर अंगांबाबतही सांगता येईल. अर्थात 'स्क्रीन', 'मराठा', 'सकाळ', यांसारखे काही अपवादही आहेत. मात्र त्याचबरोबर हेही खरे, की 'वावटळ' पाहून, त्यावर विचार करून, अभ्यासपूर्ण समीक्षण कोठेही आढळले नाही.

सध्या मुंबई-पुण्यासारख्या शहरात दर आठवड्यास सरासरी दोन ते तीन चित्रपट प्रदर्शित होतात. खेरीज नाटकांचा सपाटा चालू आहेच. इच्छा असली तरी पैसा आणि वेळ यांच्या मर्यादेमुळे स्वाभाविकपणेच सर्वसाधारण प्रेक्षकांस विशिष्ट कार्यक्रमांची निवड करणे भाग पडते. ही निवड सुलभ करणे, प्रेक्षकांना अचूक मार्ग-

दर्शन करणे, नावीन्याबद्दल त्यांच्या मनांत आकर्षण निर्माण करणे व दूध आणि पाणी वेगळे करून दुधाचा प्याला प्रेक्षकांपुढे ठेवणे, हे नाट्य–चित्रपटसमीक्षकांचे कार्य; परंतु दुर्दैवाने टीकाकार विविध बंधनांत अडकल्याने हे परखड कार्य अपूर्ण राहते.



शांताराम आठवले

## वास्तव चित्रणाचा अट्टाहास

कथा-आशयाला धक्का न लावता 'वावटळ' चित्र समर्थपणे उभे करण्यासाठी आम्ही असंख्य प्रयोग केले. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे बाह्य–चित्रीकरणावर भरपूर भर दिला. कोल्हापूरजवळच्या एका खेड्याच्या परिसराची निवड केली व तेथेच बहुतेक चित्रीकरण केले. फक्त आम्हाला हवा असणारा तेथील वाडा तांत्रिक अडचणींमुळे वापरता आला नाही. त्यामुळे वाड्याचे स्केच् करून स्टुडिओमध्ये आम्हाला सेट लावावा लागला. चित्रपटाचा नायक मोट चालवतो, असे दृश्य हवे होते. हा मोट चालवणारा नायक शहरी न वाटता, खरा शेतकरी वाटावा म्हणून त्यास सतत आठ दिवस मोट चालवण्याचा सराव करावयास लावला. ग्रामीण चित्र म्हणजे लावणी–तमाशा, असे समीकरणच होऊ पाहत आहे. परंतु प्रत्यक्षात तसे खरोखरच असते का? 'वावटळ'च्या बाबतीत आम्ही हा मोह टाळला. खेड्यापाड्यांतून प्रत्यक्षात आढळणाऱ्या भारुडाकडे आम्ही वळलो व त्याचे नावीन्यपूर्ण पद्धतीने चित्रीकरण केले. 'वावटळ'मध्ये डोहाळ–जेवणाचे एक दृश्य आहे. विशिष्ट अभिरुची निर्माण झालेल्या प्रेक्षकांना व दूषित दृष्टिकोनातून चित्रपट पाहणाऱ्या टीकाकारांना कदाचित ते आवडले नसेलही; परंतु ग्रामीण भागात–विशेषतः कोल्हापूरच्या परिसरात–या दृश्याचे चांगलेच स्वागत झाले.

हल्ली चित्रपटामध्ये तंत्राचे वर्चस्व वाढत आहे; परंतु 'वावटळ'च्या बाबतीत कथेला प्राधान्य देण्याचे धोरण हेतुपूर्वक ठेवण्यात आले, दृश्याच्या गरजेप्रमाणे कॅमेऱ्याचा वापर करण्यात आला. कॅमेऱ्याचा वरचष्मा होणार नाही, याकडे सतत लक्ष पुरवण्यात आले. मोट चालवत असताना नायक गाणे म्हणतो असे दृश्य होते. नेहमीच्या पद्धतीप्रमाणे चित्रीकरण झाले असते तर नायकास फाजील प्राधान्य दिले गेले असते. परंतु ते टाळून मोट कशी असते; ती कशी चालते, आजूबाजूचे वास्तव वातावरण कसे असते, यांना प्राधान्य देऊन चित्रीकरण करण्यात आले. नायिकेच्या डोक्यावर मारा देण्याचे दृश्यही असेच वैशिष्ट्यपूर्ण पद्धतीने चित्रीत करण्यात आले. 'वावटळ'ला लाउड ट्रिटमेन्ट नाही. सरसकट आढळून येणारा मेलो ड्रामा नाही

अथवा मुद्दाम ओढूनताणून आणलेला क्लायमॅक्स नाही. मानसिक संघर्षाचे, खेड्यातील वास्तव जीवनाचे व खेडुतांच्या वेडगळ समजुतीचे जिवंत चित्र 'वावटळ'-मध्ये आहे. परंतु हा रुचिपालट मानवला नाही.

कथा दिग्दर्शकाच्या हातात पडल्यावर मूळ कथेचे वाटोळे झाले, अशी लेखकांकडून तक्रार केली जाते. परंतु 'वावटळ'च्या बाबतीत लेखक–दिग्दर्शकांनी एकत्र बसून निश्चित योजना आखून काम केले. परिणामी शंकर पाटील यांनी माझ्या व्यक्ति-रेखा अधिक सरसपणे साकार झाल्या, अशी मान्यता दिली. लेखक–दिग्दर्शक एकत्र आल्यावरच हे नवीन माध्यम प्रभावी बनते, असा अनुभव या चित्रपटाचे बाबतीत आला.

## नवीन कलावंत, नवे यश

चित्रपटात वास्तवतेला प्राधान्य देण्याचे ठरल्यानंतर नेहमीचे कलावंत टाळणेच योग्य असते. कारण लोकप्रिय कलावंतांच्या विशिष्ट भूमिका प्रेक्षकांसमोर असतात. अर्थात एखाद्या नावारूपाचा कलावंत चित्रपटाची गरज शंभर टक्के पूर्ण करू शकेल, असा विश्वास असल्यास तशी निवड करण्यास हरकत नाही. याच दृष्टीने आईच्या भूमिकेसाठी सुलोचनाबाईंची निवड केली, तर मुख्य भूमिकांसाठी कृष्णकांत दळवी व आशा पोतदार, हे नवे परंतु समज असलेले कलाकार निवडले. त्यांना कथा-विषयाची पूर्ण कल्पना देऊन त्यांच्याबद्दलच्या अपेक्षा स्पष्ट केल्या. भडक मेक-अप् सहेतुक टाळला. सुलोचनाबाईंना तर अजीबात मेक-अप् केला नाही. आपण काही तरी नेहमीपेक्षा वेगळे करतो आहोत, याची जाणीव कलावंतांमध्ये निर्माण झाल्याने त्यांचा उत्साह वाढून त्यांच्यामधील जे हवे होते, ते उत्कृष्टपणे पडद्यावर साकार होऊ शकले. आशा पोतदारचे एक नृत्य चित्रपटात आहे. त्यात मादकतेला वाव दिला नाही. पदन्यासही लोक-नृत्याचे पद्धतीवरच ठेवला. या वेगळेपणाचे, कलावंताच्या कष्टाचे चीज झाले. यशाचे नवे क्षितिज दिसू लागले. आशा पोतदार उत्कृष्ट अभिनेत्रीचे पारितोषिक घेऊन गेली.

चित्रपटावर पारितोषिकांचा वर्षाव झाला, त्यात आश्चर्य वाटण्याजोगे काही नाही. कारण चित्रपटाची हाताळणीच अशा पद्धतीने केली होती, की तो पारि-तोषिक–विजेता ठरावा. परंतु प्रथम वाटणारा हा आत्मविश्वास चित्रपट प्रकाशित झाल्यानंतर मात्र कमी झाला. टीकाकारांनी चित्रपटाबद्दल वेडेवाकडे लिहिले. प्रेक्षकांनी पाठ फिरविली. त्यामुळे पारितोषिकाची आशाही कमी झाली; कारण चित्रपटाच्या आर्थिक यशापयशाचा परिणाम स्पर्धेच्या परीक्षकांवर होत असतो. परंतु याही गंडांतरातून 'वावटळ' निसटला. केलेल्या प्रयत्नांचं चीज झालं. आपली वाटचाल योग्य दिशेने होत आहे, याची खात्री पटली. एक गोष्ट मात्र जरा विचित्र वाटली. ज्या वेळी पूर्ण तयार झालेलं चित्र आम्ही पाहिलं, त्या वेळी चित्रपट अगदीच ज्युबिली हिट गेला नाही तरी आर्थिक अपयश देणार नाही, असा अंदाज होता, पण

आमचा होरा चुकला. आज आमच्या प्रयत्नावर राजमुद्रा बसताच अभिनंदनाच्या अनेक तारा व पत्रांचा वर्षाव झाला. त्यानं अपयश पचवण्याइतकं हलकं झालं इतकंच. ' वावटळ ' संकलित करून परदेशांत व परप्रांतांत पाठवण्याची योजना आता विचारात घेता येईल, याचाच आनंद वाटतो.

## एक शंका

[ ▫ ' वावटळ 'वर चित्रपट-समीक्षकांनी अन्याय केला, चित्रपट समजून न घेता त्यावर समीक्षणे लिहिली गेली, असा आक्षेप श्री. आठवले घेतात, पण आपला चित्रपट प्रयोगक्षम आहे, त्यात समजावून देण्यासारखे बरेच आहे, असे जर श्री. आठवले यांना म्हणावयाचे असेल तर चित्रपटप्रदर्शनाचे आधी निर्मात्यांकडून त्यांनी एखादी पत्रकार-परिषद का घेतली नाही अथवा चित्रपटाचा दृष्टिकोन समजावून देणारी पुस्तिका प्रेस-शोचे वेळी का काढण्यात आली नाही ?

▫ बरे, आठवले म्हणतात त्याप्रमाणे चित्रपट-समीक्षकांकडून ' वावटळ 'वर अन्याय झाला, हे घटकाभर मान्य केले, तरी पारितोषिके जाहीर होईपर्यंत श्री. आठवले व ' वावटळ 'चे निर्माते स्वस्थ का बसले ? चित्रपटाचे निर्मितीसाठी इतके कष्ट घेतलेल्या या मंडळींनी त्यांच्यावर झालेल्या टीकेला सविस्तर उत्तरे का दिली नाहीत ? पारितोषिके जाहीर झाल्यावर श्री. आठवले आपल्या तक्रारी सांगतात, त्यामुळे त्यांच्या तक्रारींनाही गालबोट लागते.

समजा, ' वावटळ 'ला पारितोषिके मिळाली नसती तर......

–शरद गोखले ]

## ' वावटळ '– एकूण पारितोषिके

(१) सर्वोत्कृष्ट बोलपट.
(२) सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक–श्री शांताराम आठवले.
(३) सर्वोत्कृष्ट अभिनेत्री–आशा पोतदार.
(४) सर्वोत्कृष्ट पटकथा–शंकर पाटील.
(५) सर्वोत्कृष्ट संवाद–शंकर पाटील.
(६) सर्वोत्कृष्ट संकलन–चंद्रशेखर कामुलकर.
(७) सर्वोत्कृष्ट ध्वनिमुद्रण–विष्णुपंत चव्हाण,
[ विभागून ] रामनाथ जठार, मंगेश देसाई.
(८) सर्वोत्कृष्ट छायाचित्रकार–अरविंद लाड.
(९) सर्वोत्कृष्ट पार्श्वगायक– बाळकराम.
(१०) सर्वोत्कृष्ट पार्श्वगायिका–सौ. सुमन कल्याणपूर.

परीक्षक : श्री. गजानन जागीरदार, श्री. विश्राम बेडेकर, श्री. पु. ल. देशपांडे.

विदेशी चित्रपट

# हॉलिवुडची शोकांतिका

## □ हार्लो

हॉलिवुड–जगातील चित्र-निर्मितीचे सगळचांत मोठे केंद्र. संपन्नतेत न्हाऊन निघालेली ही मोहमय नगरी नामवंत कलावंतांच्या वास्तव्याने सतत गजबजून गेलेली असते. अनेक नामवंत कलावंत या नगरीत लहानाचे मोठे झाले, पुन्हा नामशेष झाले. परंतु ही सर्व स्थित्यंतरे पाहत हॉलिवुड मात्र स्थितप्रज्ञाच्या भावनेने उभे आहे. पैसा, कीर्ती पायांशी लोळण घेत असून, मेरिलीन मन्रोसारख्या काही कलावंतांना हॉलिवुडचे जीवन नकोसे होते. का ? हे गूढ उकलण्याचा प्रयत्न 'हार्लो' या चित्रपटात दिग्दर्शकाने केलेला आहे.

जीन हार्लो ही जुन्या काळची नामवंत नटी. सौंदर्यपूर्ण शरीरसौष्ठवाच्या जोरावर चंदेरी दुनियेत खळबळ माजवून देणारी म्हणून मन्रोच्या अगोदर हार्लोचे नाव घ्यावे लागेल. एक जमाना असादेखील होता, की जेव्हा जीन हार्लोच्या दर्शनासाठी लोक वेडे होत होते; तिच्या चित्रपटांना बेसुमार गर्दी करीत होते. विविध मासिकांवर तिची हजारो छायाचित्रे छापली जात होती. शेर्ले मॅक्लिन्सच्या गालावरील खळीप्रमाणेच जीन हार्लोच्या ओठाखालील तिळाने लाखोजणांना वेड लावले होते. वैभवाच्या अत्युच्च शिखरावर असतानाच जीनने आत्महत्या केली. मात्र आत्महत्येचा प्रयत्न लगेच यशस्वी न झाल्याने त्यानंतरच्या विटंबनेच्या भेसूर परिस्थितीतूनही तिला जावे लागले. हार्लोच्या जीवनाची दुःखांतिका ती हीच.

मन्रोच्या मृत्यूमागील मानसिक संघर्ष उलगडण्यासाठी तिचा भूतपर्व पती आर्थर मिलर याने एक विचारप्रधान नाटक लिहिले; पण त्याने मन्रोच्या मृत्यूवर प्रकाश पडू शकला नाही; ते गूढ गूढच राहिले.

आर्यविंग शौलमन याने हार्लोच्या खासगी जीवनाविषयी माहिती मिळवून तिची तिच्या कलाआयुष्याशी सांगड घालण्याचा यशस्वी प्रयत्न 'हार्लो' या आपल्या कादंबरीमध्ये केला आहे. हे पुस्तक अफाट लोकप्रिय झाले. हजारो प्रती हां हां म्हणता उडाल्या.

हॉलिवुडच्या चाणाक्ष निर्मात्यांनी हे पुस्तक अचूक हेरले व जोसेफ इ. लेव्हिन याने त्यावर 'हार्लो' हा चित्रपट तयार केला. केरॉल बेकर या मदनिकेचे पर्व या चित्रपटामुळे सुरू झाले.

बाजाराकड......

मोठ्या विचित्र कौटुंबिक परिस्थितीमध्ये जीन लहानाची मोठी झाली. ती लहान असतानाच वडील वारले. संसारसुखाच्या मध्यावरच एकाकी झालेली जीनची आई (अॅनला लान्सबरी) हा आघात सहन करू शकली नाही. एका अमेरिकन गृहस्थाशी तिने लग्न केले. परिणामी जीनच्या वाट्याला कमालीची उपेक्षा आली. ज्या वयात आईकडून माया व मार्गदर्शनाची अपेक्षा, त्याच वयात जीनला कामासाठी बाहेर पडावे लागले. तिचे नवीन वडील मोठे धोरणी. पोरीचे रंगरूप पाहून ही छोकरी चित्रपटक्षेत्रात नाव काढील, आपल्याला खूप पैसा मिळेल व मग आपण कॅलिफोर्नियात इस्टेट घेऊ, अशा स्वप्नरंजनात ही स्वारी दंग होती. विचारापाठोपाठ आचारही आलाच. त्याप्रमाणे हे पिताजी प्रयत्न करू लागतात. जीन काम मिळवण्यासाठी स्टुडिओच्या खेपा सुरू करते. मॅजेस्टिक स्टुडिओमध्ये काम मिळवण्यासाठी जाते. दिग्दर्शक अनेक मुलींतून तिची निवड करतो. बिचारीची आशा वाढते. पण 'ट्रायल' च्या नावाखाली जीनला पाच दिवस फुकट राबवण्यात येते. 'टबबाथ 'चे दृश्यही चित्रित करण्यात येते आणि नेमक्या याच वेळी दिग्दर्शकाच्या मनात नको ते विचार येतात. एका विशिष्ट पद्धतीच्या 'बॅकलेस' पोशाखात जीन कशी दिसते, हे पाहण्यासाठी म्हणून तिला दिग्दर्शक आपल्या चेंबरमध्ये बोलावतात. जीन त्याप्रमाणे तेथे हजर होताच तिला विविध 'पोझेस' घेण्याच्या सूचना मिळतात. अगतिक झालेली जीन त्याप्रमाणे वागते. मद्य घेण्याची विनंती ती नाकारते. ज्या वेळी दिग्दर्शकाचा दुष्ट हेतू तिच्या लक्षात येतो, त्याच वेळी रागाने थरथरत जीन दिग्दर्शकाच्या चेंबरबाहेर पडते. दुसऱ्या दिवशी स्टुडिओत काम देतेवेळी हार्लोला वगळण्यात येते. पण परिस्थितीमुळे सौंदर्याचा बाजार मांडण्यास तयार झालेली जीन शीलाचे मात्र कठोरपणे रक्षण करते–निदान या वेळी तरी ती बचावते.

याच वेळी एक नवीन व्यक्ती हार्लोच्या आयुष्यात येते. मि. आर्थर लँडर्न (रटङ् बटन्स) हा एक नटींचा एजंट जीनचे बारकाईने निरीक्षण करीत असतो. तिच्या सौंदर्याने तो हरखून जातो. ही पोरगी पुढे नाव मिळवणार, याची अटकळ बांधून तो स्टुडिओतील संकटांतून जीनची सुटका करून तिच्यासाठी काम मिळवण्याच्या खटपटीस लागतो. लँडर्न तिच्याशी अतिशय चांगुलपणाने वागतो. तिला एक कामही मिळवून देतो. नंतर तिला मोटारीतून घरी सोडत असताना ती त्याचे चुंबन घेते. 'That wasn't necessary' (जीन, खरोखरच त्याची काही आवश्यकता नव्हती.) भरलेल्या आवाजात जीन म्हणजे, 'Still I feel.' (हे माझ्या भावनेचे प्रतीक समजा.) कृतज्ञतेने भरलेले ते चुंबन असते.

जीनला काम मिळावे म्हणून लँडर्न जिवाचे रान करतो. जॅक हॅरिसनशी तिची ओळख करून देतो. कदाचित त्यामुळे जीनला एकदम नायिकेचे काम मिळेल असे त्याला वाटते. पण हॅरिसनचा अनुभवही अत्यंत कडवट येतो.

जीनची छोटी-मोठी कामे चालूच असतात. आईचे व सावत्र बापाचे राहणीमान सुधारत असते. दमली-भागलेली जीन स्टुडिओतून घरी येते, तो घरी बडिलांच्या मित्रमंडळींना चहापार्टी चालू असते. जीन संतापते. आईला वेडेवाकडे बोलू लागते. त्या वेळी आई सांगते, ' आज तरी तू असे बोलू नकोस. आज आमच्या लग्नाचा वाढदिवस आहे. माझ्या भावनांची कदर करणारे दुसरे कोण आहे ?' आईचे उत्तर ऐकून जीन हतप्रभ होते–उतारवयातही आई फक्त स्वत:पुरताच विचार करते. माझ्या भावनांची तिला काहीच कदर वाटत नाही का ? आईच्या स्वार्थी स्वभावाने जीन अस्वस्थ होते, पण उपयोग काही नाही, हे जाणून मानसिक कोंडमाऱ्याच्या विचित्र अवस्थेत बिछान्यात अंग झोकून देते. इकडे पार्टी चालूच राहते. जीनचे उपेक्षित जीवन हेच तिचे दु:ख !

बिचारा लँडर्न इकडे प्रयत्न करीतच असतो. अशाच एका प्रयत्नात तो जीनला एका लक्षाधीशाकडे घेऊन जातो. पुन्हा तोच किळसवाणा प्रकार. जीनला स्वत:चाच तिटकारा येऊ लागतो. त्या धनिकाच्या–रिचर्ड मॅनलेच्या श्रीमुखात भडकावून जीन बाहेर येते. लँडर्नजवळ जाते व म्हणते–' He supposed I should shoot that sin in his bed room ' (त्या नराधमाला वाटले, त्याच्या शय्यागृहातच मी ते किळसवाणे पाप करावे.) लँडर्नचा चेहरा पडतो. जीन मुसमुसून रडू लागते.

### यशाची कमान !

अखेरचा प्रयत्न म्हणून Sin-City या नावाने लँडर्न जीनच्या नृत्याचे कार्यक्रम घडवून आणतो. कमीत कमी पोशाखात जीन प्रेक्षकांसमोर येते. प्रसिद्धी मिळवते. तिचे फोटो व मुलाखती प्रसिद्ध होऊ लागतात. लँडर्नची ही मात्रा लागू पडते. निवडक कात्रणे गोळा करून लँडर्न स्टुडिओच्या मालकाकडे जातो. जीनच्या भाग्योदयास सुरवात होते. मॅजेस्टिक स्टुडिओ जीनशी सात वर्षांचा करार करतो. स्टुडिओत तिची राहण्याची व्यवस्था होते. स्वत:ची ' किचन ' पाहून जीन खूष होते. मनामध्ये आदर्श गृहिणी होण्याचे स्वप्नाळू विचार डोकावून जातात; पण आता ते कठीण असते. एके काळी तिचा अपमान करणारा जॅक हॅरिसन तिला लग्नाची मागणी घालतो. सावत्र बाप तिचा ड्रायव्हर म्हणूनही काम करण्यास तयार असतो. जीनची वाटचाल झपाट्याने सुरू होते. चित्रपटामागून चित्रपट निघू लागतात. शुटिंग, प्रिमीअर्स, मुलाखती, यात गुरफटलेली राहूनही आपल्या एकाकी जीवनाची तिला टोचणी लागून राहते. मि. बर्ड या दिग्दर्शकाशी ती लग्न करते. परंतु आपल्याला मातृत्व देण्यास हा वृद्ध दिग्दर्शक अपात्र आहे, हे लक्षात येताच ती पळ काढते. भांडण मिटवण्याचे लँडर्नचे प्रयत्न अयशस्वी होतात. लोकनिंदा टाळण्यासाठी बर्ड आत्महत्या करतो. लोकनिंदेचा प्रवाह अधिकच कटू होऊन जीनकडे वळतो.

आपले मनोगत स्पष्ट करण्याची संधीही जीनला मिळत नाही. जीनच्या स्वभावात, वागण्यात कमालीचा फरक पडतो. ह्या विशिष्ट धुंदीतच पूर्वी जीनने ज्याच्या श्रीमुखात भडकावलेली असते, त्या मॅनलेकडे ती जाते. त्याची शैय्या-सोबतीण होते. तरीही मानसिक ताण वाढतच जातो. मद्याच्या नशेतच ती समुद्रावर आत्म-हत्या करण्यास जाते. किनाऱ्यावरच बेहोष होऊन पडते. रात्रभर लाटांमध्ये भिजत पडल्याने व्हायचे तेच होते. मृत्यूही इच्छेप्रमाणे नाही व मृत्यूच्या उंबरठ्यावरील थोड्या कालातही विटंबनाच वाट्याला येते. शेवटी मृत्यू येतोच, पण वेळ न सावता, बदनामीचे माप पूर्ण पदरात घालून येतो. विविध पोशाखांतील जीनची चित्रे पडद्यावर साकारू लागतात. गाणे चालू राहते– 'She was lovely girl dressed in sadness' (दुर्दैवाच्या कपड्यात गुरफटलेल्या सुंदर तरुणीची कहाणी, ही कहाणी ही–)-चित्रपट संपतो. एक वास्तववादी चित्र पाहिल्याचे समाधान मिळते.

दिग्दर्शक गॉर्डन डग्लस् याने जीनच्या विविध मानसिक अवस्थांचा पूर्ण अभ्यास करून, तिच्या व्यक्तिरेखेस कोठेही अवास्तवता येणार नाही, अशा हळुवार पद्धतीने कथा हाताळली असल्याने चित्रपट संपल्यावरही समजूतदार प्रेक्षकांचे मनावर एक प्रकारच्या विषण्णतेची छटा पसरलेली दिसते. जीन हार्लोची भूमिका कॅराल बेकरने अत्यंत जबाबदारीने पार पाडलेली आहे. या चित्रपटाचे दुसरे वैशिष्टय असे, की हार्लोची अनेक मादक (Sexy) दृष्टी असूनही जीनच्या मानसिक भूमिकेबरोबर प्रेक्षक एकरूप झाल्याने या मादक दृश्यांचा प्रभाव पडत नाही. दिग्दर्शकाचे व कथा-लेखकाचे हे मोठेच यश आहे.

स्वादिष्ट मिठाईसाठी
आम जनतेची निवड

शर्मा स्वीट मार्ट

दत्तमंदिराशेजारी,
मंडई रस्ता, पुणे २.

## भारतातील राष्ट्रीय उद्याने.... [ पृष्ठ ७ वरून चालू ]

भारतात धर्मनिरपेक्षता किंवा सेक्युलरिझम या शब्दाला परधर्मसहिष्णुता हाच एकमेव विशुद्ध भारतीय अर्थ राहिला पाहिजे. परसंस्कृतीचे जतन करण्याच्या नावाखाली परदेशांच्या अप्रत्यक्ष प्रभावाची केन्द्रे येथे निर्माण करणे राष्ट्रीय अस्मितेला मारक ठरेल आणि स्वतंत्र भारतात राष्ट्रीय अस्मितेपुढे इतर सर्व अस्मिता न्याय आणि नीती या दोन्हींच्या तत्त्वाने गौण व दुय्यमच ठरल्या पाहिजेत, या चिरंतन जागतिक सिद्धान्तालाही त्यामुळे बाध येईल. नेहरूंच्या राजवटीत सरकारने या इतिहाससिद्ध धडयाची उपेक्षा केली.

### नवी संस्थाने

या सर्व व्यवस्थेकडे आणखी एका दृष्टीने पाहिले पाहिजे. वडिलोपार्जित अफाट मालमत्तेचा धनी बनलेल्या नव्या तरुणाने सर्वप्रथम आपल्या संपूर्ण मालमत्तेच्या चतु:सीमा निश्चित, पक्क्या आणि संरक्षणदृष्टया मजबूत करायला हव्या असतात. आपल्या सरकारने स्वातंत्र्य मिळताच नेमके हेच करायचे टाळले. त्यातून अनेक सीमातंटे निर्माण झाले. त्यावरूनच आजही चीन व पाकिस्तान यांच्याशी आपल्या कटकटी चालू आहेत. ज्या देशाच्या सरहद्दीवर त्याचा ध्वजदंड खोलवर गाडलेला राहत नाही, त्या राजाची सत्ता खिळखिळी होण्याच्या मार्गावर आहे, अशा अर्थाचा एक सुंदर श्लोक महाभारताच्या नीतिपर्वात आहे, त्याची आठवण राज्यकर्त्यांनी ठेवली नाही. शिवाय, जर विमोचनानंतर तावडतोब पाँडिचेरी व कराइकल यांचे मद्रास राज्यात, यनामचे आंध्रात आणि माहेचे केरळात विधिवत विलीनीकरण करून टाकले असते तर फ्रेंच संस्कृतीला काय तडे थोडेच जाणार होते ? पश्चिम बंगालमधील चंद्रनगर या फ्रेंच वसाहतीचे विलीनीकरण नाही का त्या राज्यात करून टाकण्यात आले ? तिथे फ्रेंच संस्कृतीची कोणती परागती झाली ?

तद्वतच मुंबईत जसे लाखो ख्रिश्चन राहतात, गुण्यागोविंदाने नांदतात, तसेच गोव्याचे ख्रिश्चन महाराष्ट्रात काय राहू शकणार नाहीत ? मग गोव्याच्या ख्रिश्चनांचा, त्यांच्या मतामतांचा आणि अस्मितेचा एवढा बाऊ करून गोवा महाराष्ट्रापासून वेगळा ठेवण्याचा हा अट्टाहास कशासाठी, कोणासाठी ? दमणगंगेलाच सीमा मानून दादरा-नगर हवेली यांचे उत्तर भाग गुजरातेत व दक्षिण भाग महाराष्ट्रात विलीन करून, दीव सरळ काठेवाडात देऊन ही गोव्याची त्रिस्थळी यात्रा का थांबवता येऊ नये ? आवळयाची मोट व कावळयाशी गाठ हा प्रकार किती दिवस चालू ठेवायचा ? यातून कोणते राष्ट्रीय हित साधणार ? लखदीव बेटांचा कारभार स्वातंत्र्यपूर्व काळात दक्षिण कनारा जिल्ह्यातील एका मामलेदाराकडे असे. आज तसे का करता येऊ नये ? देशाच्या प्रादेशिक जलविस्तारात सर्वच राज्यापासून बरीच लांब असल्यामुळे अंदमान-निकोबार बेटांनाच केन्द्रशासित ठेवणे आजच्या परि-

स्थितीत समर्थनीय ठरू शकेल. परंतु इतरांच्या बाबतीत तो नियम का ?

याच संदर्भात अत्यंत छोटे असे नागालॅण्ड निर्माण करण्याच्या सरकारी विचारसरणीचाही विचार केला पाहिजे. या राज्याचा संपूर्ण खर्च केन्द्र सरकार करते. म्हणजे केंद्रशासित प्रदेश नसला तरी नागालॅण्ड हे केन्द्रशासित राज्य आहे. म्हणजे केन्द्रशासित या विशेषणाच्या इंजिनाने ओढली जाणारी आमची आगगाडी सध्या अकरा डब्यांची आहे. म्हणजे स्वातंत्र्यानंतर ३५० संस्थाने या देशात होती. गेल्या अठरा वर्षांत ही संख्या आम्ही पुन्हा २६ वर आणून ठेविली आहे. १६ राज्ये नागालॅण्ड धरून, आणि १० केन्द्रशासित प्रदेश आताच झाले आहेत. आणखी भर पडणार नाही याची शाश्वती नाही. मग आपण चाललो आहोत तरी कुठे ?

## दुबळी केन्द्रसत्ता

आणि याच ठिकाणी गाम्याचा विचार येतो. तो असा की, समस्या सोडविता आली नाही की, करून टाक केन्द्रशासित प्रदेश ही विचारसरणी; हे केन्द्रीय सत्ता दुबळी होत चालल्याचे अभद्र लक्षण आहे. एकात्म, एकसंध भारत पुन्हा अनेक तुकड्यांत–डोईजड तुकड्यांत गोजिरवाण्या नामाभिधानाने विभाजित होण्याची ही नांदी आहे. राज्यातील शिलेदार शिरजोर होण्याचा पाया घातला जात आहे. इंदिरा गांधींचेच उदाहरण सांगतो. त्या संसदीय काँग्रेस पक्षाच्या नेत्या निवडल्या गेल्या. मंत्रिमंडळ बनवू लागल्या तेव्हाची गोष्ट आहे. एका व्यक्तीला त्यांनी आता परवाच सांगितले की, ' माझी इच्छा होती तुम्हाला उपमंत्री करावे अशी, पण काय करू, तुमच्या मुख्यमंत्र्यांनी नकार दिला ...' शिलेदार शिरजोर होत असल्याचे आणखी स्पष्टीकरण करण्याची गरज नाही.

काही हितसंबंधी लोक म्हणतात, हे लोकशाहीचे विकेन्द्रीकरण आहे, लोकशाहीची मुळे खोलवर रुजत चालल्याची लक्षणे आहेत. परंतु एका माजी कायदामंत्र्यांनी म्हटल्याप्रमाणे " विकेन्द्रीकरण प्रशासनाचे हवे, कारभाराचे हवे. राजकीय सत्तेचे विकेन्द्रीकरण म्हणजे विघटनेला निमंत्रणच..." मला वाटते, हाच विचार भारताच्या राजकीय रचनेतील मुख्य सूत्र असायला हवा आहे. लोकशाही संस्था हा अतिसमृद्ध राष्ट्रांना परवडणारा फार महाग खेळ आहे. विकासमान भारतासारख्या अवाढव्य देशाने त्या लोकशाही व्यवस्थेचे निर्बुद्ध विकेन्द्रीकरण केले तर त्याच्या अर्थव्यवस्थेला ते झेपणार नाही. आज होत आहे ते लोकशाहीचे नव्हे, लोकसत्तेचे विकेन्द्रीकरण आहे. यातून सत्ता चालवायला सर्वस्वी अपात्र असणाऱ्याच्या हाती सत्तेची कोलिते जात आहेत. भारताच्या पुनर्रचनाकारांना हे आव्हान आहे, घटनाकारांना दिलेली ही कालचक्राची हाक आहे.

ती हाक ऐकली पाहिजे. ते आव्हान स्वीकारले पाहिजे आणि ठिकठिकाणी राष्ट्रीय उद्याने वाढीस लावण्याची ही अत्यंत खर्चिक चटक तोडली पाहिजे, सोडली पाहिजे.

● ● ●

## ☐ देश-विदेश [ पान २ वरून चालू ]

डियम ' असे नवे नामकरण करण्यात आले होते. ही दोन्ही नावे पूर्ववत करण्याची ब्रेझनेवची सूचना मान्य झाली आहे. याचा अर्थ स्टालिनच्या पुनरुज्जीवनाकडे टाकलेले पहिले पाऊल असा करता येणार नाही. ही दोन्ही नावे स्टालिनची निगडीत झाल्याने त्या नावांची रशियन जनतेने धास्ती घेतली होती. म्हणून त्याच्या मृत्यूनंतर ती बदलून टाकण्यात आली. आता ती पुनरुज्जीवित करण्यात पक्षाचे कार्य पूर्ववत सुरळीत करण्याशिवाय दुसरा उद्देश नसावा.

हाती आलेल्या बातम्यांवरून क्रुश्चेव्हने ज्याप्रमाणे स्टालिनच्या ध्येयधोरणांवर आणि वागणुकीवर व चुकांवर हल्ला चढविला, तसाच हल्ला क्रुश्चेव्हवरही चढविण्याच्या बाबतीत रशियन नेत्यांवर दाब आला होता, असे दिसते. क्रुश्चेव्ह आंतरराष्ट्रीय राजकारणात जेवढा लोकप्रिय होता, तेवढा स्वतःच्या घरी नव्हता. बाहेरच्या जगात कल्पनाही येणार नाही, एवढे क्रुश्चेव्हविरोधी वातावरण रशियात आहे. परंतु अशा प्रकारच्या व्यक्तिगत हल्ल्याचे परिणाम काय होतात, याचा चांगलाच अनुभव रशियनांना असल्याने हाही विषय त्यांनी टाळला असावा.

परंतु एवढे असले तरी इतिहासाच्या समाधानासाठी रशियनांना या बाबतीत लवकरच काही तरी करणे भाग पडेल. त्या दृष्टीने पहिले पाऊल म्हणून स्टालिनविषयक आणि स्टालिनने लिहिलेली काही महत्त्वाची कागदपत्रे प्रसिद्ध करण्याचा रशियन कम्युनिस्ट पक्षाचा इरादा असल्याच्या बातम्या आहेत.

## जैसे थे....

चीन–रशियामधील तात्त्विक भांडणांचा एकदाचा कायमचा निकाल अधिवेशनात लागेल अशी जी अपेक्षा होती, ती चीनने अगोदरच अधिवेशनात भाग घेण्याचे नाकारून मोडून काढली. आश्चर्याची गोष्ट म्हणजे अधिवेशनात उपस्थित राहण्यास नकार देणाऱ्या पत्रात चीनने अत्यंत उर्मट भाषा वापरून रशियावर गंभीर आरोप केले असले तरी, रशियन नेत्यांनी त्याच शब्दांत चीनला उत्तर देण्याचे कटाक्षाने टाळले. एवढेच नव्हे तर ब्रेझनेव यांनी आपल्या भाषणात चिनी नेत्यांशी मॉस्को अथवा पेकिंग येथे बोलणी करण्याची तयारी दाखविली. जागतिक कम्युनिस्ट पक्षाची परिषद भरविण्याची तयारी असल्याचेही ब्रेझनेव यांनी सांगितले. उघड अधिवेशनात जरी रशियाने चीनविषयी सौम्य भाषा वापरली असली तरी अधिवेशन सुरू होण्यापूर्वी रशियन कम्युनिस्ट पक्षाने चीन–रशिया भांडणात आपली बाजू स्पष्ट करून सांगणारे एक गुप्त पत्रक जगातील सर्व कम्युनिस्ट पक्षांना पाठविले असल्याची बातमी आहे.

व्हिएटनाम प्रश्नाच्या बाबतीतही स्वच्छ निर्णय घेण्याऐवजी थोडयाफार प्रमाणात मौनच पाळण्याचे धोरण रशियन नेत्यांनी स्वीकारलेले दिसते. नेहमीप्रमाणे अमेरिकन साम्राज्यवाद्यांचा जागतिक शांततेला धोका वाढत असल्याचे त्यांनी रूढीनुसार नमूद केले असले तरी त्यात नवीन काही नाही. व्हिएटनामचा प्रश्नच एवढा मोठा आहे, की दुसऱ्याची पूर्ण बाजू कळल्याशिवाय नेमका निर्णय घ्यायचा नाही, असे ठरलेले दिसते. दरम्यान उत्तर व्हिएटनामी कम्युनिस्ट पक्षाच्या पाहुण्या प्रतिनिधीने अधिवेशनात रशियाने उत्तर व्हिएटनामला केलेल्या लष्करी व आर्थिक मदतीबद्दल रशियाचा गौरव करणारे भाषण करून चीनपासून उत्तर व्हिएटनामला आपणाकडे वळविण्याविषयीची आशा रशियन नेत्यांत निर्माण करून ठेवली आहे.

अधिवेशनास उपस्थित असलेल्या पाहुण्या-प्रतिनिधींपैकी बहुतेकांनी रशियन पक्षाच्या ध्येय–धोरणांना पाठिंबा दिला आणि चीनचा उल्लेख न करता पडद्याआडून चीनवर टीकास्त्रे सोडली. फक्त रुमानियन शिष्टमंडळाचा नेता स्यूसे स्कू याने वेगळी बाजू मांडली. कम्युनिस्ट चळवळीतील मतभेद दूर करावयाचे असतील, तर वेगवेगळया देशाच्या कम्युनिस्ट पक्षांनी एकमेकांचा मान राखला पाहिजे, असे तो म्हणाला. परंतु सध्याच्या परिस्थितीत तरी चीन आणि रशिया यांचे भांडण निकरावर आलेच तर रशियन कम्युनिस्ट पक्षामागे जगातील बहुसंख्य कम्युनिस्ट उभे राहतील, असा रोख दिसतो. चीनचा सगळयात जवळचा मित्र अल्बानिया आणि क्युबा. या दोन्ही देशांच्या कम्युनिस्ट पक्षाचे चिनी कम्युनिस्टांशी नव्याने सुरू झालेले भांडण पाहिले म्हणजे या तर्काला वळकटी येते.


या वेळच्या अधिवेशनात झालेल्या निवडणुकीतील थोडी नवलाची गोष्ट म्हणजे ७५ सभासदांच्या प्रेसिडियममध्ये यंदा मार्शल वोरोशिलोवची निवड करण्यात आली. १९६१ सालच्या अधिवेशनात क्रुश्चेव्हने वोरोशिलोवला प्रेसिडियममधून घालवून दिले होते.

आपल्याकडील ऑफिस–कर्मचाऱ्यांना आणि औद्योगिक कामगारांना हेवा वाटेल, अशी एक घोषणा ब्रेझनेवने आपल्या भाषणात केली. सोविएट रशियातील कामगारांना आणि ऑफिस–कर्मचाऱ्यांना यापुढे फक्त आठवडयातून पाचच दिवस काम करावे लागेल–आठवडयातून दोन दिवस हक्काची सुट्टी.

तेव्हा एकंदरीने जागतिक कम्युनिस्ट तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने या अधिवेशनातून विशेष निष्पन्न निघण्याचा संभव नाही. पुढच्या वर्षी म्हणजे १९६७ साली रशियन–क्रांतीचा सुवर्णमहोत्सव आहे. तोवर तरी आहे तीच परिस्थिती कायम ठेवण्याचा रशियन नेत्यांचा रोख दिसतो.

• • •


নাৎসী



# भस्मासुराचा उदयास्त

: लेखक :

रा. म. शास्त्री

पुस्तकरूपाने प्रसिद्ध होत आहे.

रॉयल आकार : पृष्ठसंख्या सुमारे पाचशे

भरपूर छायाचित्रे

**किंमत : अठरा रुपये**

प्रसिद्धिपूर्व सवलतीची किंमत

**रुपये बारा केवळ**

- *सवलतीची मुदत ३१ मे १९६६ पर्यंत*
- *रजिस्टर पोस्टाने ग्रंथ हवा असल्यास दोन रुपये टपालखर्च अधिक पडेल. ( १२ + २ = १४ रु. )*


**राजहंस प्रकाशन**

४१९ नारायण पेठ, पुणे २

MANOOS ( Fortnightly ) : 15 April 66 : 40 Paise : Regd. No. M H–649




राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे पाक्षिक, संस्थतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, यथे छापून, ४१९ नारायण पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. **सं. श्री. ग. माजगावकर**